# माणूस

शनिवार | ८ जून १९७४ | एक रुपया

आदर्श गृह निर्माण संस्थेच्या कारभाराची
सरकारी आदेशाप्रमाणे चौकशी झाली हे खरे आहे.
पण ही चौकशी निःपक्षपाती म्हणता येईल का ?

**जवाहरलाल दर्डा : प्रहार क्रमांक चार**

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ८ जून | अंक : दुसरा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


मुक्काम पुणे

## लोकशाही हक्क आणि रेल्वे संप

पुण्यामध्ये दि. २२ मे १९७४ रोजी 'लोकशाही हक्क सरक्षण समिती'च्या विद्यमाने 'लोकशाही हक्क, रेल्वे सप आणि ट्रेड युनियन चळवळ' या विषयावर एक परिसवाद आयोजित करण्यात आला होता.

स्थळ : श्रीशिवाजी मदिर, सायकाळचे ६-३० वाजलेले. हॉल भरलेला.

वक्ते : श्री. हरिभाऊ लिमये, प्रा. पी. एन. लिमये, प्रा. व्ही. वाय. कोल्हटकर, श्री. यदुनाथ थत्ते, प्रा. राम बापट. अध्यक्षस्थानी होते श्री. नानासाहेब गोरे.

लोकशाही हक्क सरक्षण समितीचे कार्यवाह श्री. रा. प. नेने यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात या परिसवादाचा हेतु विशद केला. ते म्हणाले,

'सहा महिन्यापूर्वी याच सभागृहामध्ये धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यामध्ये संघटित शेतमजुराच्या व भूमिहीनाच्या मागण्या दडपून टाकण्यासाठी तेथील जमीनदारानी खाजगी सशस्त्र सैन्य उभारण्याचा एक कट रचला होता. त्याचा निषेध करण्यात आला होता.

श्री. बुवा सामत या निष्ठावान कार्यकर्त्याचा--ठाणे जिल्ह्यामध्ये-- अमानुष खून करण्यात आला होता, त्याचाही निषेध करण्यात आला होता.

डॉ. पंढरीनाथ रानडे व डॉ. अनिल अवचट यानी स्वतत्र मत प्रतिपादन केल्याबरोबर डॉ. रानडधाना नोकरीचा राजिनामा द्यावा लागला आणि डॉ. अवचट यांचा वैद्यकीय प्रॅक्टीस करण्याचा अधिकार का काढून घेऊ नये अशी नोटीस 'ऑल इडिया मेडिकल कौन्सिल'ने बजावली होती. या असहिष्णु प्रवृत्तीचाही निषेध करण्यात आला होता.

त्या वेळेस सभेतील सर्वपक्षीय वक्त्यांनी लोकशाही हक्कावरील आक्रमण दिवसेदिवस वाढत जाण्याचा धोका दिसतो आहे, म्हणून प्रासगिक समिती स्थापन करून हक्क सरक्षणाला मदत करण्याऐवजी चिरस्थायी स्वरूपाची समिती स्थापून अधिक व्यापक कार्य करावे असे सुचविले होते. त्या सभेच्या सयोजकाच्या मनात घोळत असलेल्या कल्पनेला पाठिंबा मिळाल्यामुळे 'लोकशाही हक्क सरक्षण समिती' स्थापन करणे शक्य झाले.

तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी शांततामय आदोलने झाली. जगातील सर्वात मोठी लोकशाही असा गौरव ज्या भारताचा केला जातो तेथे या आदोलनांना सरकारी प्रतिसाद कोणता मिळाला? फैजपूर, वणी, अमळनेर, बसमत, औरंगाबाद, सोलापूर, मुबई व इतरत्र गोळीबार, अश्रुधूर, लाठीहल्ले, वरळीच्या चाळीचाळीमध्ये घुसून निर्दय पोलिसी मारहाण. लवकरच जनजागृती झाली नाही तर हे लोकशाही हक्कांवरील हल्ले परतवून लावणे कठीण जाईल. म्हणून ही समिती स्थापन करण्यात आली आहे असे श्री. रा. प. नेने म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, 'राजकीय लोकशाहीची त्या मानाने निकोप परपरा असलेल्या इग्लडमध्ये १९२६ ते १९३० च्या मदीमध्ये लोकानी निदर्शने केली. त्यावेळेस त्यांच्यावर घोडेस्वार घालण्यात आले परंतु तेथील जनतेने वेळीच प्रतिकार केला म्हणून लोकशाही हक्कांचे सरक्षण झाले. इग्लडमध्ये नुकताच कोळसा खाण कामगारानी प्रचड संप केला. परिणामत: तेथील सरकार कोसळले. परतु कामगारांचे हक्क सुरक्षित राहिले. म्हणून ही 'लोकशाही हक्क सरक्षण समिती' लोकजागृती करण्याकरिता १ : सबधित घटनाबाबत माहिती गोळा करील. २ : शक्य असेल तेथे प्रत्यक्ष चौकशी करील. ३ : निवेदने अथवा पत्रके प्रसिद्ध करील. ४ : सभा भरवील. ५ : कालपरिस्थितिनुरूप इतर योग्य कार्यक्रम विचारात घेईल.

यानतरचे वक्ते होते श्री. हरिभाऊ लिमये.

लोकशाही हक्क आणि कायदे या सदर्भात विश्लेषण करीत असता श्री. लिमये यांनी काही कायद्यांकरवी लोकशाही हक्क कसे हिरावले जात आहेत व लोकाची मुस्कटदाबी कशी पद्धतशीरपणे करण्यात येत आहे याचे साधार विवेचन केले. युद्धकाळात अतर्गत सुरक्षितता कायदा मजूर करण्यात आला. या कायद्याचा (राजकीय) दुरुपयोग करण्यात येणार नाही असे स्पष्ट आश्वासन लोकसभेत सरकारतर्फे देण्यात आले. पण प्रत्यक्षात हे सरकार अस्मानी सुलतानशाहीने या कायद्याचा दुरुपयोग जनतेचा आवाज दडपण्यासाठी करीत आहे. या प्रवृत्तीला वेळीच अंकुश लावला नाही तर लोकशाही रसातळाला जाईल.

प्रा. पी. एन. लिमये (संप आणि राजकारण) : सप करणे हा मूलभूत हक्क आहे का? याविषयी प्रामाणिक मतभेत होऊ शकतील. परतु कामगारांनी लढे उभारून, आदोलने करून संप हे एक

लखलखते आणि प्रभावशाली हत्यार कष्टाने मिळविलेले आहे. रेल्वे संपाच्या निमित्ताने या हत्याराचा संकोच करण्याचा सरकारी प्रयत्न उधळून लावला पाहिजे. रेल्वे कामगारांचा संप मोडून काढण्यासाठी सैन्यापासून नभोवाणीपर्यंत हाती असलेल्या सर्व साधनांचा दुरुपयोग करून हे सरकार लोकशाही संकेत पायदळी तुडवीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

लोकशाही संकेत हे नैतिकदृष्ट्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहेत या दृष्टिकोनातून त्यांचे पालन झाले पाहिजे ही अपेक्षा. सभ्यता, सुसंस्कृतता, लोकशाही संकेत यांचा बेदरकारपणे भंग करून सरकार दमनचक्राचा वापर करीत आहे. संपाचे दोन प्रकार–समाज परिवर्तनाचे अमोघ शस्त्र हा एक प्रकार आणि विशिष्ट मागण्यासाठी संप करणे हा दुसरा प्रकार.

समाजपरिवर्तनाचे सम्यक वाहन या जाणिवेने संप झाल्यास तो यशस्वी होऊन क्रांतिसन्मुख राहातो.

लोकशाही संकेताचा भंग करून संप दडपून टाकण्यात सरकार यशस्वी झाल्यास याचा दूरगामी परिणाम होणार आहे मुलभूत हक्काचा संकोच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारच्या भावी धोरणाची ही नांदी आहे. ही बाब अत्यंत भयावह आहे.

प्रा. कोल्हटकर (आर्थिक अरिष्ट व संप). संप हे आर्थिक कारणांसाठी होतात. गेल्या १०–१२ वर्षापासून बहुजन समाजाची परिस्थिती खालावतेय. विशेषत गेल्या २–३ वर्षापासून जीवन असह्य झालेय. विरुद्ध लढा देण्याशिवाय बहुजन समाजाला गत्यंतर नाही.

आम्ही शिकलेल्या अर्थशास्त्रात तेजी-मंदी, बेकारी, कमी उत्पादन ही अरिष्टे मानली जात. पण आता महागाईचे अरिष्ट, इंधन तेलाचे अरिष्ट निर्माण होऊन जुने अर्थशास्त्रीय नियम कोसळून पडत आहे.

नफ्याचे प्रमाण टिकविण्याच्या या भांडवलशाही प्रवृत्तीमुळे किंमती पुनः पुन्हा वाढताहेत आणि सरकार या विरुद्ध कृती करीत नाही. याचे उदाहरण म्हणजे गेल्या ४–६ महिन्यात सरकारने अनेक वस्तूंच्या किंमतीवरील नियंत्रणे उठविली. परिणामतः या वस्तूंच्या किंमती वाढल्या. याचाच अर्थ अगतिक होऊन सरकारने भांडवलदारांपुढे सपशेल शरणागती स्वीकारली आहे.

लवकरच ब्रेडची किंमत वाढणार असल्याचे आजच प्रसिद्ध झाले आहे. ब्रेडची किंमत वाटेल तशी वाढविण्याचा अधिकार जर संपत्ती केंद्रीत करणारांना व सत्ताधीशांना असेल तर ती कमी करवून घेण्याचा अधिकार बहुजन समाजाला आहे आणि संप हे त्यातील एक साधे, पहिले हत्यार असा आहे.

सरकार समाजवादाच्या घोषणा करते पण पावले भांडवलशाहीच्या दिशेने पडताहेत.

समाजवादाचे प्रमुख निकष काय आहेत? मालाच्या किंमती कमी, उत्पादन जास्त, श्रीमंती व गरीबी यांच्यातील तफावत कमी आणि बेकारीचे संपूर्ण निर्मूलन, ह्या समाजवादाच्या निकषावर हे सरकार टिकतच नाही.

एकीकडे आर्थिक सत्ता व राजकीय सत्तेचे वाटप झालेले आणि दुसरीकडे अगतिक बहुजन समाज हे देशाचे आजचे चित्र! अशा परिस्थितीत संप आणि लढे होणारच. रेल्वे कामगारांचा संप हा लढा नाही तर वर्गलढा आहे असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून प्रा. कोल्हटकरांनी आपले भाषण संपविले.

'साधना'चे संपादक श्री. यदुनाथ थत्ते (संप व पत्रकारांची भूमिका) यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपाला आपण संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला आणि पत्रकारांनी एक दिवस आपापली नियतकालिके बंद ठेवून रेल्वे कर्मचाऱ्यांच्या लढ्यातील आपला सहभाग, कर्तव्य सक्रिय बजावलेले आहे हे अभिमानाने सांगितले.

राष्ट्रीय वेतन धोरण ठरविणे हाच आजच्या गंभीर समस्येवर योग्य तोडगा आहे.

या योगे पंचवार्षिक योजना यशस्वी होऊन देशाच्या विकासाला हातभार लागेल रेल्वे संपाने ही बाब पुनश्च एकदा स्पष्ट केली आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग हे देशाच्या सर्वांगिण विकासाला साहाय्यभूत होण्यासाठी असतात. परंतु १४ पैकी ७ राष्ट्रीयीकृत बँका तोट्यात आहेत हा आमच्या समाजवादाचा पराक्रम!

'राष्ट्रीयीकरण म्हणजे समाजवादाला बदनाम करण्यासाठी नोकरशाहीच्या हाती दिलेले कोलीत!' असा स्पष्ट आरोप करून श्री. थत्ते यांनी राष्ट्रपती पासून पट्टेवाल्यापर्यंत समान वेतन धोरण आखण्याची अत्यावश्यकता प्रतिपादन केली!

सरकार पक्ष स्वतःचे पगार, भत्ते, सुखसोयी वाढवून घेताहेत पण संघटित कामगारांनी न्यायाची अपेक्षा करताच सरकार शहरी विरुद्ध ग्रामीण असा कृत्रीम झगडा उपस्थित करते. आमचे महाराष्ट्र सरकार 'रोजगार हमी योजने'ची फक्त घोषणा करते अमलबजावणी करण्याबाबत रेल्वे कर्मचारी काय अडथळा आणताहेत का?

जॉर्ज फर्नांडीसला अटक करताच सबंध भारतातील रेल्वे उत्स्फूर्तपणे बंद पडते हा रेल्वे कर्मचाऱ्यांचा प्रचंड नैतिक विजय आहे. जनतेचा संपूर्ण पाठिंबा रेल्वे कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे. हा स्वानुभव आहे.

सरकारने समाजवादाचे एक पाऊल पुढे टाकण्याची संधी गमावली आहे. सरकारने हा प्रश्न प्रतिष्ठेचा न करता लोकमताचा आदर करावा. सरकार मानत नसल्यास जनतेचे दडपणापुढे सरकारला नमावेच लागेल असा निर्वाळा देऊन श्री. थत्ते यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

प्रा. रा. म. बापट: देशाची स्थिती विचित्र आणि निराशाजनक आहे. घोषणा बडवताहेत कल्याणकारी राज्याच्या, आणि दलित, कामगार, शेतमजूर, बहुजन समाजाला खायला अन्न नाही! समाजाची सूत्रें काळाबाजारवाले, मक्तेदार, भांडवलदार, हातभट्टीवाले यांचे हाती जाऊन सगळा आर्थिक फायदा त्यांच्या तिजोरीत जातोय. गेल्या काही वर्षापासून या देशातील लोकशाहीचा भांडवलशाही आशय वाढतोय.

ही इंदिराजींची हार आहे.

निवडणुका जिंकण्यासाठी येथील लोकशाही शासन भांडवलदारांना विकावे लागतेय. परिणामत. लोकांना दडपणारी दमनशक्ती वाढतेय. सैन्य, सीमा सुरक्षा दल, राज्य राखीव दल, पोलीस यांचा उपयोग देशाच्या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी किंवा काळाबाजारवाले, मक्तेदार, भांडवलदार, हातभट्टीवाले आदी देशद्रोह्यांना ठेचण्यासाठी न करता दलितांना, कामगारांना, बहुजन समाजाला दडपून टाकण्या-

साठी होतोय. नजिकच्या फायद्यासाठी सरकार लोकशाही साधने उध्वस्त करीत आहे. जनता आणि सैन्य, पोलीस याचेतील दरी वाढवीत आहे. लोकशाही साधने नष्ट झाल्यामुळे निर्णायक क्षणी येथील लोकशाही वाचू शकणार नाही.

सरकार असे भासवतेय की सघटित कामगार समाजाची अडवणूक करीत आहेत. पण शेतमजुरांनी आंदोलन केले की हेच सरकार असा दुटप्पी वृत्तीने कांगावा करते की 'हा पहा पंचायत राज्य धोक्यात आणण्यासाठी लढा पेटवला जात आहे!' परतु संघटीत कामगार व शेतमजूर याना जर ते वेतन मिळाले नाही तर मक्तेदार, भांडवलदार, बडे बागायतदार व काळाबाजारवाले यांच्याच तिजोरीत जाणार आहे हे उघड नाही काय? तेव्हा सरकारची दुटप्पी आणि भाडवलशाहीवृत्ती गाडलीच पाहिजे.

येथील वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन, रेडिओ आणि सरकार हे भाडवलशाहीचे हस्तक असल्याने रेल्वे कामगाराचा लढा चिरडून टाकण्याचा अटोकाट प्रयत्न करीत आहे. परतु इतिहास असाच निर्वाळा देईल की रेल्वे कामगाराचा प्रचड विजय झाला!

भारतातील लोकशाही, सघटित कामगार सघटित शेतमजूर आणि सघटित जनता पुढे नेणार आहे. या देशातील विचारवत, बुद्धीजीवी, मध्यमवर्ग न्यायाच्या, लोकशाहीशक्तीच्या बाजूने उभे राहून जनतेचा आवाज बुलंद करतील हीच अपेक्षा!

रेल्वे कर्मचाऱ्यांची न्याय्य बाजू ससदेमध्ये, सरकार पक्षाशी वाटाघाटी करताना आणि जनतेसमोर व्याख्यानाद्वारा ठाम शब्दात सागणारे समाजवादी नेते श्री. नानासाहेब गोरे या परिसवादाच्या अध्यक्षस्थानी होते. नानासाहेबानी प्रारभीच स्पष्ट निर्वाळा दिला की 'रेल्वे कामगाराच्या मागणीत राजकीय काहीही नव्हते!'

आर्थिक मागण्या मान्य करणे हे विद्यमान सरकारला सध्याच्या चौकटीत शक्य नाही. त्यासाठी ही चौकट बदलली पाहिजे.

राष्ट्रीय वेतन धोरण ठरविणे हा मुद्दा विचारार्ह आहे. उत्पन्नाचे १ : ६ हे प्रमाण असावे. परतु विद्यमान सरकार हा प्रश्न सोडवू शकणार नाही.

हा संप चिरडून टाकायचाच याच एकमेव उद्देशाने सरकारची पावले प्रारंभापासून पडताहेत.

कामगारांकडे पाहाण्याचा भारत सरकार आणि ब्रिटिश सरकार यांच्या दृष्टिकोनात कसा मूलभूत फरक आहे याचे स्वत: पाहिलेले एक उदाहरण श्री नानासाहेब गोरे यानी सागितले 'इग्लडमध्ये एका कामगाराला अटक झाली. सदरहू कामगार आपल्या खासदाराकडे तक्रार सागण्यासाठी भेटण्यास जात असता खासदाराच्या घरासमोरच त्याला अटक करण्यात आली. त्या खासदाराने ब्रिटिश ससदेमध्ये हा प्रश्न उपस्थित केला. तेव्हा सरकारतर्फे असे सागण्यात आले, की सदरहू कामगारावर पोलिसाचे पकडवारंट असल्यामुळे अटक करण्यात आली आहे. अर्थात सन्मानीय खासदार महाशयाकडे तक्रार निवारण करण्यासाठी भेटीला जात असताना सदरहु कामगाराला पोलिसांनी अटक केली याबद्दल सरकार दिलगिरी व्यक्त करीत आहे.

इग्लडमध्ये ऐन थडीमध्ये ४ लाख कोळसा खाण कामगारांनी सप केला. परतु ब्रिटिश सरकारने एकादेखील कामगाराला अटक केली नाही. याउलट आमचे भारत सरकार कामगाराविरुद्ध युद्ध पुकारल्याच्या आविर्भावात सैन्य, सीमा सुरक्षा दल, राज्य राखीव दल, पोलीस यांच्या सहाय्याने कामगाराना तुरुंगात डांबणे, नोकरीवरून काढणे, रेडिओ, वर्तमानपत्रातून खोटा प्रचार करणे असे कठोर उपाय योजून सप चिरडून टाकण्याचा अट्टाहास करीत आहे. ज्या लाठ्याबदुका परकीय शत्रू, देशद्रोही यांच्याविरुद्ध वापरायच्या त्या कामगाराविरुद्ध वापरीत आहेत.

या सपाने हिंदुस्थानचे चित्र पालटणार आहे. सरकार यशस्वी झाल्यास दडपशाही वाढणार आहे. कामगार विजयी झाल्यास त्याचे वरील जबाबदारी वाढणार आहे.

श्री. रा. प. नेने यानी अध्यक्ष व वक्त्याचे आणि पाऊस असताना देखील मोठ्या सख्येने उपस्थित राहिलेल्या श्रोत्याचे आभार मानले व परिसवादाच्या कार्यक्रमाचा समारोप केला.

—दत्ता काळेबेरे

---


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्ग)

पंचावन्न रुपये

# अणुमंडळात प्रवेश : आणखी एक प्रतिक्रिया

सु. ल. सोमण

१९४७ साली स्वातंत्र्य संपादन केल्यानंतर, राष्ट्र म्हणून अभिमान वाटण्याजोग्या काही मोजक्याच घटना ह्या देशात घडल्या. १९६५ व १९७१ च्या पाकविरुद्धच्या युद्धातल्या देदिप्यमान विजयांचा प्रत्येक भारतीयाला सार्थ अभिमान वाटतो. तेल उत्खननामध्ये अक्षम्य दिरगाई आणि इतर गैरप्रकार झाले, तरी खबायतच्या आखातात तेल सापडले म्हटल्यावर भारतीयाना आनद होणे साहाजिक आहे. क्रिकेटमधल्या काही आतरराष्ट्रीय विजयानी देश म्हणून भारताची मान ताठ झाली. परतु गेल्या आठवडयातल्या भारताच्या अणुमडळातल्या प्रवेशाने राष्ट्र म्हणून भारताच्या वरील साऱ्या पराक्रमावर कडी केली आहे. भारताच्या पहिल्या वहिल्या अणुस्फोटाने, देशात चैतन्याची नवीनच लाट उसळली. भारतातल्या ह्या अणुस्फोटाने जग हादरले. अमेरिकादी भल्याभल्यांची झोप उडवली. पाकिस्तान नखशिखान्त हादरले. चीन, रशियाला अवाक् केले. ४७ पासून ज्या राष्ट्राची जागतिक मंचावर सतत हेटाळणीच होत गेली. ज्याच्या अलिप्ततावादाची टरच उडवली गेली; ज्याला अमेरिका-रशियाचे अंकित राष्ट्र म्हणूनच सतत विविध गटानी मानले, त्या राष्ट्राने आपल्या सामर्थ्यप्रदर्शनाने जगभर खळबळ उडवून दिली ही घटनाच मुळी रोमहर्षक आहे ! आणि त्यासाठी ज्या ज्या लोकाचे हातभार लागले आहेत, त्या सर्वाचेच भारतीय जनता, उत्स्फूर्त अभिनदन करीत आहे. स्वत. हाल अपेष्टा सोशीत असूनही, ह्या घटनेचे उत्स्फूर्त स्वागत करीत आहे. ती घटनाच मुळी तशी आहे !

अणुमंडळाचे आतापर्यंत पाचच सदस्य होते. अमेरिका, रशिया, इंग्लड, फ्रान्स आणि चीन. हीच ती पाच राष्ट्रे. त्यातही अमेरिका-रशिया ह्या दोन महासत्ता. ह्या पाच राष्ट्राकडे व विशेषत: दोन महासत्तांकडे जागतिक राजकारणाला वळण लावण्याचा जणू मक्ता आहे. ही राष्ट्रे, आपल्या पक्षपाती राष्ट्रांना अणूछत्र्या पुरवितात, पण त्या राष्ट्रानी स्वत: अण्वस्त्र सज्ज व्हावे ह्याला विरोध करतात. ही मक्तेदारी आज भारताने संपवली आहे, आणि अणूमंडळात प्रवेश केला आहे. ह्या अणूस्फोटाचे समर्थन भारत सरकारने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात केले आहेच, पण त्याचबरोबर, पुढील अणूस्फोटाचा अधिकार बजावण्याचेही ठोसपणे सांगितले आहे. जागतिक टीकेला भीक न घालता, शेजाऱ्यांना विश्वासात घेऊन, प्रत्यक्ष अणूस्फोटापेक्षाही हे निर्भिड पाऊल मला महत्त्वाचे वाटते. इतरेजनाची फारशी भीडमुखत न बाळगता, जागतिक शाततेच्या स्वप्नील गप्पा न मारता, निखळ राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून उचललेले हे पाऊल निश्चित स्वागतार्ह आहे !

आज आम्ही अणूस्फोट शातिकार्यासाठी व विकासकार्यासाठीच करू असे आश्वासन देत आहोत. हरकत नाही. पण तरीसुद्धा अणूस्फोटाचे तंत्र आम्ही आत्मसात केले आहे हे काही कमी महत्त्वाचे नाही. अण्वस्त्रे बनवून त्याचा विवक्षित ठिकाणी शत्रूविरुद्ध स्फोट करणे ही त्या मानाने सोपी क्रीया आहे. व तेही तंत्रज्ञान भारतीय शास्त्रज्ञाना अवगत आहे. विकास कार्ये आज ह्या देशात ढीगभर पडली आहे. अणुस्फोटाद्वारे ती जलदरित्या होऊ शकली तर ते हवेच आहे. पण त्याचवेळी गभीर असा धोका देशाच्या स्वातंत्र्यालाच निर्माण झाला तर त्यावेळी स्वत:जवळ अणुशक्ती उपलब्ध असण्याचे, त्यावर निर्भर राहाण्याचे समाधान फार मोठे आहे ! आजच्या अणुस्फोटाने तीच निर्भरता भारतीयाना लाभली आहे. त्यामुळेच भारत, वेळप्रसग पाहून अण्वस्त्रे बनवीलच अशी खात्री जनतेच्या मनात आहे, भले मग नेते काहीही म्हणोत !

भारताच्या अणुस्फोटाने सर्वात जास्त कुणी बावचळल असेल, त्यामुळे चिडले असेल तर ते पाकिस्तान होय ! पाकचे सर्वसत्ताधीश भुत्तो हल्ली ज्याप्रमाणे बेफाट वक्तव्ये करीत आहेत, त्यावरून हेच सिद्ध होत आहे. अणुस्फोटाचे निमित्त करून पाक अधिकाधिक शस्त्रास्त्रे मिळवण्याचा प्रयत्न करील. नव्हे चीन, अमेरिका ह्यांच्याकडे आपले खास दूत पाठवून त्यांनी तसा प्रयत्न सुरूही केला आहे. पाकिस्तानचे अशा तऱ्हेने वाढलेले सैनिकी बळ अर्थातच भारतावर दबाव ठेवण्यासाठीच राहील. वेळप्रसगी भारतावर पाकिस्तान पुन्हा युद्धही लादील अशीही शक्यता आहे. दुसऱ्या सीमेवर अण्वस्त्र सज्ज चीनच्या देखील जोरदार सैनिकी हालचाली चालू आहेत अशी बातमी आहे. अणूस्फोटापूर्वीच, काही दिवस आधी दिल्लीतले अतिशय वरिष्ठ अधिकारी तातडीने चिनी सीमेला भेट देऊन आले; ही गोष्ट अत्यत गुप्त ठेवली गेली अशा आतल्या गोटातल्या बातम्या आहेत. ह्याच सूत्राने, ओघातच पुढे असेही सांगितले की, ह्याच सुमारास उच्च श्रेणीचा रशियन सेनाधिकारी दिल्लीला अत्यत तातडीची व गुप्त भेट देऊन गेला. सीमेवर काही घडत असल्याच्या, त्याविषयी देशातले सैनिकी नेतृत्व जागरूक असल्याच्या ह्या घटना द्योतक आहेत ! खाली, हिंदी महासागरही सुरक्षित नाही. दिगो गार्शियाचा इंग्लड-अमेरिकेचा सयुक्त तळ भारताला आव्हान देत उभा राहात आहे. सेंटो ही सघटना गेल्या काही वर्षात निर्माल्यवत झालेली आहे. १९७१ च्या भारत-पाक युद्धात पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली तरी सेंटो-राष्ट्राना पाकिस्तान हलवू शकले नाही. आज पुन्हा पाकिस्तानचे, सेंटो पुनरुज्जिवीत करायचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचा रोख भारताविरुद्धच असणार हे उघड आहे. धोका असा चोहोबाजूनी आपल्याला वेढीत असताना, भारताची सर्व मदत तोडण्याच्या वल्गना रशिया वगळून इतर पाश्चात्य राष्ट्रे करीत आहे. लष्करीदृष्टया, अण्वस्त्रासहीत भारत स्वयंपूर्ण झाल्याचे ह्या बडया राष्ट्रांना नको आहे. शांततेसाठी असला तरी, भारताच्या अणुस्फोटाचे भांडवल करून आजच ह्या मदत बदीच्या दिशेने सूचक हालचाली सुरू झाल्या असाव्यात असा सशय येण्यास जागा आहे. प्रत्यक्ष आक्रमणाच्या धोक्याबरोबर हेही महत्त्वाचे धोके आहेत.

पहिल्या अणुस्फोटाने राष्ट्र म्हणून जी प्रतिष्ठा भारताने मिळवली ती टिकवायची असेल तर ह्याही धोक्यांना तोड दिले पाहिजे. त्या दृष्टीनेही, अण्वस्त्रांसहित सर्वच बाबतीत भारताने स्वयंपूर्ण होणे आता निकडीचे ठरू पाहात आहे. आमचे अणू तज्ञ ह्या बाबतीतही मागे राहाणार नाहीत अशी आशा, नव्हे खात्री वाटते !

भारताच्या पहिल्या वहिल्या अणुस्फोटाचे असे दिलखुलास स्वागत करीत असताना उगाचच मनात शका डोकावत राहातात. कुठेतरी पाल चुकचुकत असल्याचं राहून राहून वाटत राहाते. आमचे जवान, सेनानी रणांगणावर विजय मिळवतात. जगात भारताची प्रतिष्ठा उचावतात. पण आमचे राजकारणी त्या मानाने, मिळवलेली प्रतिष्ठा पेलायला तोकडे पडतात. मिळवलेलं सारं ते वाटाघाटीच्या टेबलावर सोडून देतात नतर मिळवलेल्या सैनिकी विजयाचे राजकीय भांडवल करून स्वतःची सत्तेवरील पकड घट्ट करतात. पकड घट्ट करताच बजबजपुरी माजवून ठेवतात. देशातल्या सर्वसामान्य नागरिकाना अन्नालाही मोताद करतात. देशात मुबलक पिकत असतानाही भिकेची करवंटी घेऊन निर्लज्जपणे जगभर हिंडतात. सैनिकानी मर्दुमकी गाजवून देशाची वाढवलेली प्रतिष्ठा, शान हे राजकारणी पार धुळीला मिळवून टाकतात ! भारताचा अणूस्फोट, तोही, राजकारण्यांनी निर्मिलेल्या भयानक आर्थिक डबघाईच्या परिस्थितीत ! काळाबाजार, स्मगलिंग, महागाई, दुर्भिक्ष, वगैरेनी समाज पोखरला जात असताना देशात सर्वत्र काँग्रेसी पोळ ह्या समाजाकडे चक्क पाठ फिरवून खुर्चीच्या स्वार्थांध स्पर्धेत मश्गूल होताहेत. अशा अवस्थेत हा स्फोट झाला आहे ! ! हा स्फोट होत असतानाच भारतीय राजकारणी येन, मार्क, डॉलर, रूबलसाठी जगभर झोळी घेऊन फिरत होते.

अणुस्फोट यशस्वीरित्या घडवून आणून आमच्या शास्त्रज्ञांनी देशाची मान ताठ केली यात वादच नाही. अणुशास्त्रज्ञावर त्यासाठी अभिनदनाचा भडिमार करावा तेवढा थोडाच आहे. डॉ. भाभा, डॉ. साराभाई, ह्यानी उभी हयात अणुशक्तीत भारताला स्वावलंबी करण्यासाठी वेचली. त्याची स्वप्ने पुरी होण्याचा योग आज जुळून आला आहे. पण तो अशा वेळी जुळून आला आहे, की ज्यावेळी देशात अक्षरशः आर्थिक दाणादाण उडालेली आहे. लोकाना दैनंदिन जीवन अक्षरशः नकोस झाल आहे. त्यातून बिहार, गुजराथ, मराठवाडा, रेल्वे सप असे स्फोट होताहेत. अशा भयानक अवस्थेतून देश जात असताना गफूर की एल्. एन. मिश्रा, चिमणभाई की ओझा, वसतराव की शकरराव असल्या वादातच, काँग्रेसच्या सत्ताध लोकाना जास्त रस आहे. ह्यातून विरोधाची जी देशव्यापी लाट उसळू पाहात आहे. तिला थोपवून धरण्यासाठी ह्या अणूस्फोटाचा उपयोग सत्ताधारी पक्ष करील ही फार मोठी शक्यता आहे. अशा तऱ्हेने, अणूशास्त्रज्ञानी भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जे उच उच नेऊन बसवले आहे, त्याचा राजकीय स्वार्थासाठी उपयोग करून घेऊन जागतिक प्रतिष्ठा धुळीला मिळवली जाईल की काय अशी शका वाटते.

अणुस्फोटामुळे, भारत सरकारची व पर्यायाने ह्या देशातल्या सत्ताधारी पक्षाची जबाबदारी फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अणूशास्त्रज्ञानी प्राप्त करून दिलेली प्रतिष्ठा, जगभर अन्नासाठी दाही दिशा फिरून जोपासता येणार नाही. येन, मार्क, डॉलर, रुबलसाठी वणवण फिरण्याऐवजी रुपयाला येन-मार्कच्या तोडीला नेऊन बसवण्यातच ही प्रतिष्ठा उंचावू शकेल. पण त्यासाठी आधी देशांतर्गत शांतता, सुस्थिरता आवश्यक आहे. उपलब्ध साधन सपत्तीचे, अन्न-धान्याचे सर्व थरात प्रामाणिक समतोल राखून वाटप झाले पाहिजे काळा पैसा बाहेर काढला पाहिजे. काळ्या पैशाच्या समांतर अर्थव्यवस्थेला रोखले पाहिजे. नष्ट केले पाहिजे. स्वार्थांध सत्तास्पर्धा थाबवली पाहिजे. लोकशाहीचा जो बाजार विशेषतः काँग्रेसने चालवला आहे तो थाबवला पाहिजे. श्रमिकांच्या आर्थिक स्थैर्याकडे लक्ष देऊन उत्पादन वाढवले पाहिजे. नुसत्या सप बद बंदीच्या निरर्थक घोषणांनी ते वाढणार नाही. सामान्य जनतेला वेळोवेळी विश्वासात घेऊन तिची दैना, उपासमार थाबवली पाहिजे. महागाई रोखली पाहिजे. जनतेत स्वावलंबनाचा, स्वदेशीचा पुरस्कार करून, तिचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे. पाश्चात्य मदत तोडली जाण्यापूर्वीच, ती घेणे आपण बंद केले पाहिजे...

देशात प्रबळ विरोधी पक्ष अस्तित्वात नसल्याने व लोकशाहीचे नाटक चालू असल्याने, सरकार व काँग्रेस पक्ष ह्यांच्यावर ह्या दृष्टीने फार मोठी जबाबदारी येऊन पडते. पण सत्तास्थानासाठीच केवळ धडपडत असणाऱ्या काँग्रेस जनाकडून, त्यांच्या पक्षाकडून ह्या अपेक्षा पूर्ण होतील का ह्याविषयी शका वाटते. बांगला देश विजय हा खरा राष्ट्राचा, शूर वीर जवानांचा. पण त्याचे राजकीय भांडवल करून काँग्रेसने देशात आपली घडी व्यवस्थित बसवून घेतली व जनतेला नतर वाऱ्यावर सोडून दिले. स्वार्थापुढे देशही फिका मानला. बेसुमार भाववाढ होऊ दिली. लोकाची अन्नान्न दशा केली. आणि स्वतः खुशालचेंडूसारखे जगभर झोळ्या पसरवीत हिंडू लागले. बांगला देश युद्धात मिळवलेली अब्रू पारवार घालवून घेतली. आज पर्यंतची काँग्रेस पक्षाची: त्याच्या सरकारची वाटचाल अशीच आहे. तिची परिसीमा गेल्या ५–७ वर्षात अधिकच वाढली आहे. त्याचे कारण मग काहीही असो. काही इदिरा भक्त म्हणतात त्याप्रमाणे इंदिराजींच्या काँग्रेस पक्षातर्गत विरोधकानी, विरोधी पक्षांशी: भांडवलदारांशी, काळाबाजारवाल्यांशी संगनमत करून इंदिराहटाव कारस्थानांमुळे देशात आज अराजक सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. असेलही कदाचित. पण बांगला देश विजयानतर, वरील परिस्थिती निर्माण होऊन त्या विजयाने मिळवलेले सारे काही गमावले गेले आहे ह्यात वाद नाही. ह्या वस्तुस्थितीला काँग्रेसच जबाबदार आहे हेही वादातीत आहे. आणि ही काँग्रेस इंदिराजींचीच काँग्रेस आहे, हेही नाकारून चालणार नाही.


तेव्हा अणुस्फोटानतर जी परिस्थिती उद्भवणार आहे तिला तोड देण्याची कुवत काँग्रेस पक्षात आहे का हा मुख्य प्रश्न आहे. त्यासाठी वर उल्लेखिलेल्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी काँग्रेस स्वत.ची जबाबदारी ओळखून, बद्धपरिकर होईल का? परखड आत्मपरिक्षणाद्वारे स्वतःमध्ये बदल करणे तिला जमेल का ? ह्या प्रश्नांच्या उत्तरातच, अणुस्फोटाने मिळवून दिलेली प्रतिष्ठा आमचे राजकारणी वाढवणार, उंचावणार की बांगला देश विजयानंतर जसे वागले तसेच वागून ह्या ताज्या प्रतिष्ठेची वासलात लावणार ह्या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. ह्या प्रश्नांची उत्तरे मिळायला काही काळ जावा लागेल.

तो पर्यंत मध्यतरीच्या काळात आम्ही आमचा तेल उत्खननाचा कार्यक्रम अमेरिकेवर सोपवीतच आहोत...

शिवाय ह्या काळात, अणुशास्त्रज्ञांच्या सत्कारांबरोबरच राजकारणी मडळी स्वतःचेही सत्कार घडवून आणायचे मनसुबे रचते आहेच... ☐ ☐

भारतकुमार राऊत

# लता गाते



वीर सावरकर हे आधीच माझं आराध्य दैवत. परवा म्हणजे दिनांक अठ्ठावीसला सावरकर जयंतीनिमित्त टेलिव्हिजनवर लता मंगेशकर यांचं गाणं आहे, हे जेव्हा समजलं तेव्हा पहिल्यांदा आश्चर्याचा प्रचंड धक्काच बसला. कारण सावरकरांचं आणि सरकारचं नातं एकूण अवर्णनीयच. ज्या सावरकरांची ब्रिटीश सरकारनं बळकावलेली जमीन त्यांच्या जवळ जवळ अंतापर्यंत आमच्या मायबाप सरकारनं परत करण्याची तसदी घेतली नव्हती, त्या सावरकरांच्या जयंती निमित्त टेलिव्हिजनवर आणि तोही चक्क लता बाईंच्या गायनाचा कार्यक्रम ठेवायचा म्हणजे... असो.

तर दिनांक अठ्ठावीस. वेळ रात्री साडे-आठची. टी. व्ही. च्या भुरकट पांढऱ्या पडद्यावर वीर सावरकरांचा फोटो उमटतो. त्याच्या मागोमाग श्री. शंकर वैद्य यांनी घेतलेली हृदयनाथ आणि लता मंगेशकरांची मुलाखत सुरू होते. मंगेशकर घराण्याचा आणि तात्यारावांचा संबंध तसा सर्वश्रुतच आहे. शंकर वैद्यांबरोबर तात्यांबद्दल बोलताना हृदयनाथ आणि लताबाई दोघंही भारावल्याचं स्पष्ट जाणवत होतं. या अनौपचारीक पद्धतीच्या चर्चेत तात्यांच्या कवितेबद्दल आणि एकंदरच जीवनाबद्दल बराच ऊहापोह झाला.

लता बाईंनी शंकररावांना विचारलं की, केशवसुत, भा. रा. तांबे यांच्या कविता महाराष्ट्रात घराघरात पोहोचल्या आहेत, असं असताना तात्यांना महाकवी का म्हणतात ? यावर शंकररावांचं उत्तर समर्पक होतं. ते म्हणाले की, केवळ कवी म्हणून तात्यांचं लिखाण थोडं कमी असेल, पण त्यातली ओजस्विता आणि स्फूर्ती ही निश्चितच महाकवीच्या तोडीची आहेत. शिवाय स्वातंत्र्य प्राप्तीसाठी क्रान्ती करण्याचं कंकण त्यांनी बांधलं होतं. हे निश्चितच महाकार्य होतं. म्हणून सावरकर महाकवी बनले.

लताबाईंनी सावरकरांच्या साहित्याचा खास अभ्यास केला आहे. त्या म्हणाल्या की, सावरकरांची कविता ही तत्कालीन कवींच्या कवितापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. सावरकरांच्या कवितेशी जर कुणाचं साम्यच जोडायचं झालं तर ते स्वामी समर्थ रामदासांशी जोडता येईल. दोघेही कर्मवादाला जास्त महत्त्व देत होते.

तात्यांच्या कवितेचं गुणग्रहण करताना हृदयनाथ म्हणाले की, मला श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर सावरकर यांच्यामध्ये एक सूत्र आढळतं. शंकररावांनी याला दुजोरा देऊन सांगितलं की, सावरकरांच्या कवितेत कृष्ण आणि शिवाजी महाराज यांचा वारंवार उल्लेख झालेला आढळतो.

असो. तर एकूण चर्चा ही अशी झाली. थोडीशी कंटाळवाणी पण बरीचशी बोधप्रद. लताबाई आणि हृदयनाथ या दोघांनीही सावरकरांच्या चांगल्या आठवणी सांगितल्या. शंकररावांनी एक कविताही म्हणून दाखवली पण ते पान खाऊन बोलत होते की, काय असा उगीचच संशय आला.

तर या कार्यक्रमाचं मुख्य वैशिष्टच म्हणजे, लताबाईंचं गायन. पहिलं गाणं झालं, 'ने मजसी ने परत मातृभूमीला'. दुसरे गायक होते, हृदयनाथ आणि अरुण दाते. लता मंगेशकरांच्या या गाण्याचं काय वर्णन करावं. फक्त इतकंच सांगता येईल की, त्या गाण्याच्या वेळी मी आणि बाकी सगळेच भारावून गेलो.

दुसरं गाणं 'हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा.' हे गाणं सुरू झालं आणि आम्ही धुंद झालो. खरं म्हणजे महाराजांचं नाव घेताच गहिवरण्याच्या वयाचा किंवा पंथाचा मी नाही. पण तरीही सावरकरांच्या लेखणीतून उतरलेले शब्द घणाघातासारखे लताबाईंच्या

तोंडून कानावर आदळत होते. त्यातला जोश वगैरे ऐकून हाताच्या मुठी उगाचच वळत होत्या.

कार्यक्रम सपला. मी मात्र धुंदच राहिलो. वाटत होत, देवाला सांगाव, आम्ही कायमचे मुके बनो पण लताबाईना कायम गात राहू दे ! ☐

## भारतानं म्हणे अणुस्फोट केला

एक दिवस सुदर पहाटे (म्हणजे जिला इग्रजीत वन फाईन मॉर्निंग.) आम्ही वर्तमान पत्र उघडलं. उघडल आणि चक्क हादरलो. इतका हादरलो की, हातातल वर्तमानपत्र गळून पडलं. पुन्हा हातात घेऊन वाचलं. पुन: पुन्हा वाचलं. हाताला चिमटा घेऊन पाहिला. कळ आली. म्हणजे मी जागा होतो याची खात्री पटली. भारतान अणुस्फोट केल्याची बातमी होती. आमच्याकडच वर्तमान पण 'अव्वल' दर्जाचं असल्यानं शेजाऱ्यांकडे जाऊन आणखी वर्तमानपत्र वाचली. 'टाईम्स ऑफ इडिया' सुद्धा पाहिला. पण सगळीकडे एकच बातमी होती. 'भारतान अणुस्फोट केला.'

झालं, तर भारतानं अणुस्फोट केला. इदिराबाई आणि सेठना साहेब त्याला 'शाततेकरता अणुचाचणी प्रयोग' असं सावधगिरीन म्हणतात. हे म्हणे काही प्रचड होत. भारतीय शास्त्रज्ञाच्या डोकेबाजीची कमाल होती. भारतान म्हणे, अणुशक्तीच्या क्षेत्रातल्या पाच बडया राष्ट्रांची मक्तेदारी मोडून काढली. या चाचणीमुळे म्हणे भारताची मान अलम दुनियेत ताठ झाली.

तर अस बरच काही म्हणे, म्हणे वाचलं. भारतात एक गंमत असते की, एखादी गोष्ट झाली की, तिच कौतुक किंवा टिंगल इतकी करायची की, त्यामुळ मूळ गोष्टीचही महत्त्व कमी व्हावं. तर त्याच प्रमाणे या अणुस्फोटाविषयी सर्वच जण काहीना काही म्हणायला लागले. काहींनी टीका केली तर काहींनी ताशेरे झाडले. काहीनी हे केलं म्हणून काहीनी ते केल. जनसघाध्यक्ष श्री. अडवानी यांनी अणुस्फोटाचं स्वागत केलं म्हणून सघाच्या लव्हग्रोव्ह शाखेच्या कार्यालय मंत्र्यांनीही एक पत्रक प्रसिद्ध केलं म्हणे. असो.

तर मला असं म्हणायचं होतं की मला स्फोटामुळ विशेष काहीच वाटल नाही. कारण, या दैदीप्यमान् शास्त्रीय यशामुळे भाववाढ कमी होईल, अस मला वाटत नाही. या सशोधनामुळे देशातलं दारिद्र्य कमी होईल, यावर माझा विश्वास नाही. या स्फोटामुळे भ्रष्टाचार नष्ट होईल, अशी मला मुळीच आशा नाही. या वैज्ञानिक यशामुळे मंत्र्याची शब्दबबाळी भाषण बंद होतील अस मला वाटत नाही. शिवाय मुख्य म्हणजे कॅन्टीनचे दर कमी होतील, अशी मला काडीमात्र आशा नाही.

एकूण या स्फोटाच एक हेड लाईन या खेरीज मला बिल्कुल कौतुक नाही, ☐

## घाशीरामांचे आगमन

आणि वर का मडळी ! जे हृत्ते कालाचे ठायी घाशीराम कोतवालाचे मुबापुरीत आगमन झाले. पुण्यपत्तन आणि अवघ्या महाराष्ट्रात ज्यानं हलचल माजवली त्या घाशीराम महाशयांच दर्शन घेण्यास आम्ही उत्सुक होतो. हाऊस फुल्ल गर्दीत घाशीराम आपलं दर्शन देत होते. त्या गर्दीत आम्हीसुद्धा सामील झालो.

घाशीराम कोतवाल हे नाटकवजा–नमनवजा–तमाशा वजा–दशावतार वजा... वजा... असं बरच काही, आम्ही पाहिल. आवडलं सुद्धा. आता घाशीराम कोतवाल या नाटकात नाना फडणीस यांच्या लैंगिक जीवनाची बाजू माडलेली आहे वगैरे माहिती देणं म्हणजे शिळया कढीला ऊत आणण्या सारखच. तर असो.

घाशीरामबद्दल हजारो वाद झाले. ज्याला ज्याला जमल, त्यान, त्यान याबाबत आपलं मत जमेल त्या स्वरूपात मांडल. अगदी विधानभवनापासून ते पान गल्लीपर्यंत सर्वत्र घाशीरामची चविष्ट चर्चा झाली. वर्तमानपत्राना काय ? विषय हवेच असतात. त्यांनीसुद्धा या निमित्तानं रकाने भरले. या नाटकामुळे पुण्याच्या तमाम ब्राह्मण समाजात म्हणे बोब झाली. अब्रह्मण्यम्चा गजर झाला. कसल्यातरी निर्मूलन संघटनेन प्रयोग बद पाडण्याचा घाट घातला. तसं केलंही. तर ते असो.

नंतर पी. डी. ए. नामक महान नाटक संस्थेत या घाशीरामन वाद निर्माण केल्याचं वाचल. घाशीराम तमाम तरुण मंडळीना घेऊन पी. डी. ए. सोडून बाहेर पडल्याचंही कळलं सध्या पी. डी. ए. म्हणे म्हाताऱ्या रिटायर्ड लोकांचा गप्पांचा अड्डा बनला आहे. असो.

तर असा हा प्रसिद्धीच्या झोतात असलेला घाशीराम वर्षभर पडद्याआड होता. तो पडदा उघडला गेला आणि घाशीरामान पुन्हा एकदा रगमच गाजवला. पुण्याच्या बामण हरींनी पुन्हा एकदा नर्तन केलं. बावन्नखणीमधला घुगराचा नाद पुन्हा एकदा कानी पडला. नाना फडणीसाच्या सातव्या लग्नाला उपस्थित राहाण्याचा पुन्हा एकदा योग आला.

आम्ही घाशीराम पाहिला. आम्हाला त्यात विवाद्य वगैरे अस फारसं काहीच वाटल नाही. नाना फडणीसाबद्दल मत वाईट व्हाव असं हे नाटक आहे. पण मराठी रगभूमीवर हे काही नवीन नाही. इतर अनेक नाटकात ऐतिहासिक पुरुषाचा असाच फडशा पाडल्याचं उदाहरणांनी दाखवता येईल. असो. पण घाशीराम पाहताना आम्ही सुखावलो. साडे सत्तावीस बामण बावन्नखणीत जाताना पाहून धन्य झालो. हे सारं कवित्व पाहताना काळजात चर्र झाल. बाहेर आलो तेव्हा गुणगुणत होतो.

श्री गणनायक नर्तन करी।<br>आम्ही पुण्याचे बामण हरी॥

☐ ☐

# नवे फ्रेंच अध्यक्ष जिस्कार देस्तँ

वा. दा. रानडे

फ्रान्समध्ये द गॉल पक्षाची लोकप्रियता घसरली तरी अटीतटीच्या अध्यक्षीय निवडणुकीत सत्ता उजव्याकडेच राहिली. डाव्या आघाडीचे उमेदवार मितेरा विजयी होऊ शकले नाहीत. द गॉल पक्षीयांचा पाठिंबा असलेले इडिपेंडट रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार अर्थमंत्री जिस्कार देस्तँ अवघी दीड टक्का अधिक मते मिळवून निवडून आले. फ्रान्सच्या अध्यक्षीय निवडणुकात एवढी चुरशीची विवडणूक यापूर्वी कधी झाली नव्हती.

जिस्कार देस्तँ गेल्या पाऊणशे वर्षांतील फ्रान्सचे सर्वात तरुण अध्यक्ष आहेत. त्याचे वय ४८ आहे. आतापर्यंतच्या अध्यक्षात ते सर्वात तरुण असले तरी ज्यांच्या पाठिंब्याने ते निवडून आले ते वृद्ध आहेत. वृद्धांनी निवडलेला तरुण अध्यक्ष असे त्याचे वर्णन करणे अधिक यथार्थ होईल. त्याचे प्रतिस्पर्धी मितेरा याना पुरुष मतदाराची बहुसख्य मते मिळाली. त्यातही ३५ पेक्षा कमी वयाचे मतदार बहुसख्य होते. पचाहत्तर टक्के कामगार वर्गाचा पाठिंबा त्यानी मिळविला. फ्रान्समध्ये २१ वर्षावरील प्रौढांना मतदानाचा हक्क आहे. अठरावर्षे पुरी झालेल्याना मताचा हक्क असता तर मितेरा निवडून येण्याचा बराच संभव होता. जिस्कार देस्तँ याना बहुसख्य स्त्रियानी व पन्नास वर्षावरील बहुसंख्य प्रौढानी मते दिली.

जिस्कार देस्तँ याना राजकारणाचा व मत्रिपदाचा प्रदीर्घ अनुभव आहे. ते १९५९ साली वयाच्या ३३ व्या वर्षी प्रथम मत्री झाले. त्यावेळच्या सरकारमधील ते सर्वात तरुण मत्री होते. तेव्हापासून १९६६ ते १९६९ ही तीन वर्षे वगळता ते सतत मत्रिपदावरच होते. गेली बारा वर्षे त्यानी सतत अर्थमत्रिपद सभाळले. कर बसविणारा मंत्री म्हणून अर्थमंत्र्यास लोकप्रियता मिळणे कठीण असते पण देस्तँ यांचे वैशिष्टय हे की राजकीय नेत्यांच्या लोकप्रियतेच्या कौलात अलीकडच्या काही वर्षात ते नेहमी आघाडीवर होते. त्यांची स्मृती अत्यंत तल्लख आहे. अंदाज पत्रकावर दोन तास अस्खलीत भाषण-त्यातील किचकट तपशील व आकडेवारीसह ते करतात. आठवणीसाठी काही महत्त्वाचे मुद्दे किंवा आकडे लिहिलेला कागदाचा एखादा कपटा जवळ ठेवण्याची आवश्यकताही त्यांना वाटत नाही. "त्याचे भाषण नुसते ऐकत बसले तरी त्यांची बुद्धिमत्ता जाणवते" असे एका पार्लमेंट सभासदाने त्यांच्याबद्दल म्हटले आहे.

भाववाढ कमी करण्यासाठी योजलेल्या उपायांमुळे सरकार अप्रिय झाले व त्याचे खापर जिस्कार देस्तँ यांच्यावर फोडण्यात येऊन त्यांना मत्रिपदावरून १९६६ मध्ये दूर करण्यात आले. "एखाद्या नोकराला बडतर्फ करावे तसे आपणास बडतर्फ केले." असे या घटनेचे वर्णन त्यानी स्वतःच केले आहे. पण या कटु अनुभवाने ते खचले नाहीत. मंत्रिपदापासून दूर असलेल्या या काळाचा उपयोग त्यांनी आपला राजकीय अनुभव संपन्न करण्यासाठी केला. याचकाळात इंडिपेंडंट रिपब्लिकन्स हा छोटा पक्ष त्यानी स्थापन केला आणि राजकीय नेते म्हणून स्वत.चे स्वतंत्र स्थान निर्माण केले. द गॉल पक्षास न मिळालेले सर्व उजवे गट या पक्षात एकत्र आले. द गॉल पक्षाचा सावध मित्र आणि सरकारचा जागरूक टीकाकार अशी आपली प्रतिमा त्यांनी जनमानसात निर्माण केली पंतप्रधान पाँपीदूच्या काही धोरणाबाबत त्यांचे मतभेद होत पण ते तुटण्याइतके त्यानी कधीच ताणले नाहीत. द गॉल यानी १९६९ साली घेतलेल्या सार्वमतात त्यांनी द गॉल विरोधी भूमिका घेतली सार्वमताचा कौल द गॉल यांच्याविरुद्ध गेल्यावर त्यांनी त्यागपत्र दिले. या भूमिकेमुळे द गॉल पक्षात ते काही काळ अत्यत अप्रिय झाले. पण पुढे अध्यक्ष पाँपीदूशी त्यांनी महकार्य केले. अर्थमत्री म्हणून त्यांची पुन: नेमणूक झाली. व अध्यक्ष पदी निवड होईपर्यंत ते या पदावर होते.

जिस्कार थड वृत्तीचे असल्याची टीका केली जाते. या टीकेला उत्तर देताना जिस्कार स्वतःच एका निवडणूक प्रचार सभेच्या भाषणात म्हणाले, 'माझ्यावरचा हा आरोप खरा नाही. मी कमी बोलतो, कारण माझा तो स्वभाव आहे मला प्रदर्शन करणे आवडत नाही. पण मोकळेपणाने न बोलणाऱ्या किंवा कमी बोलणाऱ्या लोकांच्या भावनाही इतरां इतक्याच तीव्र असतात. मला फ्रेंच जनतेच्या केवळ बुद्धीलाच नव्हे तर हृदयालाही आवाहन करावयाचे आहे'

फ्रेंच अध्यक्षीय निवडणूक म्हणजे दोन व्यक्तींमधला नव्हे तर दोन भिन्न राजकीय विचारप्रणाली मधला लढा होता. मितेरां कामगार व गरीब वर्गाचे उमेदवार होते. ते निवडून आले असते तर गेली सोळा वर्षे फ्रान्सवर सत्ता गाजविणाऱ्या द गॉल पक्षीय राजवटीशी पूर्ण फारकत झाली असती. समाजवादी समाजाची स्थापना हे आपले दूरचे उद्दिष्ट असून नजीकचे उद्दिष्ट मोठ्या देशी-परदेशी कपन्यांचे राष्ट्रीयीकरण करणे हे असल्याचे मितेरांनी स्पष्ट केले होते. त्यांच्या राजवटीत कामगार सघटनांची सत्ता बरीच वाढली असती. जिस्कार देस्तँ याना पाठिंबा देणारांनाही बदल नको होता. समाजवादी धोरणाने फ्रान्सचा विकास होण्याऐवजी त्याचे राहणीमाना खाली येईल. असे त्याना वाटत होते. उलट जिस्कार देस्तँ यानी आपल्या अर्थमत्रीपदाच्या काळात फ्रान्सची आर्थिक स्थिती चांगली सुधारली. आज विकसित अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीने पश्चिम युरोपात पश्चिम जर्मनीच्या खालोखाल दुसरा क्रम फ्रान्सचा आहे. तेथील नागरिकांचा राहणीमानाचा दर्जा ब्रिटनपेक्षा चागला आहे. मितेरां यानी कम्युनिस्टाबरोबर आघाडी केल्याने मध्यम वर्गाची मते त्यानी गमावली. फ्रान्समधील कम्युनिस्ट पक्षावर अजून स्टॅलिन वादाचा पगडा आहे. त्यामुळे कम्युनिस्ट ज्यात सहभागी आहेत अशा डाव्या आघाडीचा अध्यक्ष नको असे बहुसंख्य फ्रेंच मतदाराना वाटत असल्याचे या निवडणुकीवरून दिसून आले. पण मितेरा याना असलेला पाठिंबाही फार कमी नाही. अवघी दीड टक्का मते त्याना कमी पडली. याचा अर्थ फ्रेंच जनतेची जवळ जवळ दोन सारख्या गटात विभागणी झालेली आहे. अध्यक्षीय निवडणूक हरली म्हणून डाव्या आघाडीने निराश होण्याचे कारण नाही. द गॉल पक्षाबद्दल फ्रेंच जनतेचा जसा भ्रमनिरास झाला तसा काही वर्षांनी जिस्कार देस्तँ यांच्याबद्दलही होईल. अर्थात त्यासाठी डाव्या पक्षांनाही समाजवादाची आपली मूलभूत बैठक न सोडता कार्यपद्धतीत बदल करावा लागेल. □ □

# सोलकढी

□ चि. सौ. कां. काजळमाया
बी. ए. (ऑनर्स)

केवळ पैशाच्या लालचीने लिहिणारा माझ्यासारखा दुसरा कोणी मराठी साहित्य-प्रांगणात असेल, असे दिसत नाही. कारण मराठी साहित्यिक म्हटला म्हणजे एक तर तो स्वत:साठी नाहीतर आपल्या प्रिय वाचकांसाठी लिहितो. लिहिणे हा त्याचा धंदा नसतो; धर्म असतो. लिहिले नाही तर न थांबणारी उचकी लागेल म्हणून तो लिहितो लिहिण्यापूर्वी, लिहिताना, आणि लिहिल्यानंतर मोबदला, मानधन, अनुदान, पुरस्कार, पारितोषिक, शिष्यवृत्ती यातले काही त्याच्या व्रतस्थ मनाला मोहवत नाही. याचा अर्थ असा नव्हे की या गोष्टी त्याला ठाऊकच नाहीत. तसे बिलकूल नाही. या साहित्यसंबंधीत सगळ्या गोष्टी त्याला चांगल्या ठाऊक आहेत; पण त्याचबरोबर त्याची कस्पटकिंमतही तो ओळखून आहे.

आता तुम्ही विचाराल की असे जर आहे तर महाराष्ट्र राज्य पुरस्काराच्या वेळी सगळे चेकुट्रगुट्रम होते कसे ? : तुमचा प्रश्न खरा असला तरी निरुत्तर करणारा नव्हे. हो. पुरस्कारप्राप्त मोजकी लेखकमंडळी सोडता असंख्य पुरस्कारअप्राप्त लेखकमंडळी दरवर्षी काही काळ सुतकात असतात हे खरे आहे; पुस्तक विशिष्ट वार्षिक कालकक्षेत येण्यासाठी त्याच्या प्रकाशनाचा काळ चलाखीने मागेपुढे केला जातो हे खरे आहे; आपल्याला ज्या वाङ्मयप्रकारासाठी पुरस्कार मिळाला त्या वाङ्मय प्रकाराला दुसऱ्या वाङ्मय-प्रकारापेक्षा कमी रकमेचा पुरस्कार आहे म्हणून तो निषेधपूर्वक नाकारला जातो हे खरे आहे. आपल्याला पुरस्कार मिळावा म्हणून सुसंस्कृत समाजात (म्हणजे उदाहरणार्थ आपल्या समाजात) मान्यता पावलेले शंभर आणि एक उपाय सहज योजले जातात हे खरे आहे. हे सारे खरे असले तरी मराठी साहित्यिकाच्या व्रतस्थ वृत्तीला त्यामुळे बट्टा का लागावा ते मला तरी समजत नाही. कारण या सगळ्या गोष्टी उच्चतर तत्त्वांसाठी केल्या जातात. महाराष्ट्रात सगळेच तत्त्वासाठी केले जाते. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास म्हणजे अशा अगणित तात्त्विक संघर्षांची उदात्त उदात्त कहाणी होय !

यंदाच्या राज्य पुरस्काराच्या वेळीही गतवर्षापेक्षा वेगळे काही घडले नाही तपशील वेगळा असेल; पण वाद-करवादणे तात्त्विकच.

कथाविभागात, या वर्षी, 'अनोळखी' (विजया राजाध्यक्ष) आणि 'पाठमोरी' (अच्युत बर्वे) या कथासंग्रहांना राज्य-पुरस्कार मिळाला. (अभिनंदन). 'काजळ माया' (जी. ए. कुळकर्णी) या कथासंग्रहाला पुरस्कार मिळाला नाही, याचे साहित्यिक कोंडाळ्यात आश्चर्य आश्चर्य झाले. 'काजळ माया' हे अत्यंत थोर पुस्तक आहे आणि त्या विभागात परीक्षकांना पुरस्कारपात्र द्वितीय कथासंग्रह तेवढाच निवडावा लागेल, असा बहुतेकांचा होरा होता. त्यातून 'काजळ माया' या कथासंग्रहाला विभागातीत केंद्रीय पातळीवरचा साहित्य अकादमीचा अव्वल पुरस्कार आधीच लाभलेला होता. त्यामुळे राज्य पुरस्कार परीक्षक मंडळाने, परंपरेला जागण्यासाठी, काहीतरी गंमत केली असली पाहिजे, असे सर्वांना वाटू लागले.

अशा प्रकारच्या गुप्त गमती बाहेर काढायची एक टवाळ खोड त्या माधव मनोहरांना जडलेली आहे. त्यांनी 'महाराष्ट्र-टाईम्स'मध्ये एक पत्र लिहून 'काजळ माया' या पुस्तकाला राज्य पुरस्कार का मिळाला नाही असे विचारले, आणि 'अन्याय अन्याय' अशी आरोळी ठोकली. कोठे अन्याय झाला की महाराष्ट्रातली जनता एकदम चवताळून उठते. महाराष्ट्राचे उभे आयुष्यच अन्यायाविरूद्ध लढण्यात गेलेले आहे. त्यामुळे झाले असे की ज्यांनी खरोखर त्या माधव मनोहरांच्या त्या पत्राकडे कानाडोळा करायचा त्यांनीच पत्रातल्या आरोपाबद्दल खरमरीत खुलासा केला. ती एक रम्य कथा असल्यामुळे थोडक्यात सविस्तरपणे सांगतो : राज्य पुस्तकपुरस्कार समारंभ नेहमी गुढीपाडव्याला होतो. या वर्षी गुढीपाडवा लौकर आला. त्यामुळे पुरस्काराची यादी वेळेवर पक्की झाली नाही. म्हणून समारंभ राज्यगुढीपाडव्याच्या म्हणजे महाराष्ट्र स्थापनेच्या मंगलदिनी योजण्यात आला. त्या आधी पुरस्काराची यादी पक्की होऊन जाहीर झाली होती. (जाहीर झालेल्या अधिकृत आणि पक्क्या यादीत व आगाऊ कानावर आलेल्या अनधिकृत पण पक्क्याच यादीत काही लक्षणीय फरक जाणवला.) इतकेच नव्हे तर माधवमनोहरांचे खोडसाळ पत्रसुद्धा प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे परीक्षक मंडळाचे वतीने होणारे नेहमीचे भाषण नेहमीसारखे झाले नाही हे भाषण मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रभारी प्रमुख प्रा. व दि. कुळकर्णी यांनी वास्तविक परीक्षक मंडळाचे अध्यक्ष ग. त्र्य. माडखोलकर यांनी वडिलकीच्या नात्याने हे भाषण करायचे. पण प्रकृतिअस्वास्थ्यामुळे ते गैरहजर होते; म्हणून व. दि. लकीच्या नात्याने व. दि. कुळकर्ण्यांनी हे भाषण केले असावे. मात्र माडखोलकरांच्या वडीलकीच्या नात्याचा व. दि ना थोडासुद्धा विसर पडला नव्हता. 'काजळमाया'चा विषय निघालाच. त्यावेळी, या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार अगोदरच मिळालेला असल्यामुळे राज्यपातळीवर त्याला पुरस्कार देण्यात काय हशील आहे; हे म्हणजे एम् ए. झालेल्या विद्यार्थ्याला बी ए. च्या परीक्षेला बसवण्यासारखे आहे, असा विचार परीक्षकमंडळाने केला, असा खुलासा, परीक्षकमंडळाच्या वतीने, व. दि. नी केला. (एम् ए. – बी ए. चा हा आरस्पानी युक्तिवाद माडखोलकरांनी केला; आणि तो परीक्षकमंडळाच्या विवेकी व विद्वान सदस्यांना माना डोलावण्याएवढा पटला. त्यांनी माना डोलावल्या. त्यामुळे 'काजळमाया' बी. ए. ला बसू शकली नाही !) त्या व्यासपीठावरून बोलताना व. दि ना दातृत्वाचा ज्वर चढला असावा; कारण वर्गव्यवस्थेत बसवता न आल्यामुळे काही पुस्तकांना पुरस्कार देता आला नाही. एरवी ती पुस्तके बी. ए. होण्याच्या लायकीची होती, असे अतिकथन त्यांनी केले.

व. दि कुळकर्णींच्या मुखाने प्रकट झालेल्या माडखोलकरी खुलाशाने आमचे पूर्ण समाधान झाले होते. मुख एकाचे,

खुलासा दुसऱ्याचा, ही कार्यपद्धतीदेखील मला उत्तेजनार्ह आणि अनुकरणार्ह वाटली, हे येथे मनमोकळेपणाने सांगून टाकतो. आमचे जसे पूर्ण समाधान झाले तसेच सकलसज्जनाचे झाले असेल, अशी आमची धारणा होती.

पण तसे घडले नाही. ८ मे रोजीच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये मुबई विद्यापीठाचे नवे मराठी विभागप्रमुख जुनेच वा. ल. कुलकर्णी आणि एक्केचाळीस वर्षे तोटयात चालण्याचे भाग्य लाभलेल्या (अहाहा!) 'सत्यकथा' मासिकाचे कार्यकारी संपादक राम पटवर्धन याची पत्रे प्रसिद्ध झाली. ''काजळमाया' हे पुस्तक जणू अखिल मानवजातीची कथा व व्यथा समर्थपणे व्यक्त करीत आहे' असा निर्वाळा देऊन राज्य पुस्तकपुरस्कार परीक्षकमडळाने या पुस्तकाला पुरस्कार न देण्याचा घेतलेला निर्णय नियमाविरुद्ध आहे, असे वा ल. चे म्हणणे. 'वृत्तपत्रातील टीकेची दखल घेऊन प्रांजळपणे आपली भूमिका रसिकापुढे माडण्याच्या या लोकशाही प्रथेबद्दल प्रा. व. दि. कुळकर्णी याचे व पर्यायाने परीक्षक मडळाचे अभिनदन' करून झाल्यावर (हे आम्हाला का सुचले नाही ?) माडखोलकरप्रणीत बी. ए.–एम. ए. चा दृष्टात कसा गैरलागू आहे हे राम पटवर्धन सागतात.

वा. ल. कुलकर्णी आणि राम पटवर्धन याच्या प्रभावी प्रतिपादनामुळे आमचे पुन्हा एकदा पूर्ण समाधान झाले. आमचे जसे पूर्ण समाधान झाले तसे सकलसज्जनांचे झाले असेल, अशी आमची धारणा होती.

पण तसे घडले नाही. एक साहित्यप्रेमी सज्जन ज्ञानेश्वर नाडकर्णी यानी लगोलग महाराष्ट्र टाईम्समध्ये एक मिनी-पत्रप्रबध लिहून राज्यपुस्तकपुरस्कारयत्रणेत कोणते बदल करणे इष्ट आहे ते खुलासेवार सांगितले. आपल्या पत्रप्रबधाच्या अखेरीस, जाता जाता, ज्ञानेश्वर नाडकर्णींनी वा. ल. कुळकर्णींच्या पत्राची हजेरी घेतली. त्यात ते सागतात : वा. ल. कुळकर्णींच्या पत्रात मूलतः आक्षेपार्ह असे काहीही नसले तरी जेव्हा जेव्हा ते स्वत.च परीक्षक होते तेव्हा तेव्हा सरकारी नियमांना प्रमाण मानूनसुद्धा काही पुस्तकावर अन्याय करण्यास त्यानी हातभार लावला असेच इतिहास सागतो ! आता ते व्यक्तिगत दृष्टीकोनातून यंदाच्या परीक्षकाच्या नियमविषयक कसोटया दूषित मानीत असले तरी त्यानी स्वतः परीक्षक असताना अन्य प्रकारच्या अन्यायाकडे दुर्लक्ष केलेले आहे. आणि म्हणूनच यदाच्या परीक्षकावर टीका करण्याचा नैतिक अधिकार त्यांना कसा काय प्राप्त होतो हे ह्या पामराला समजलेले नाही ! !

नाडकर्णींच्या या पामर ज्ञानेश्वराचे मी एक पाहून ठेवले आहे : त्याचा इतिहास पहिल्यापासून पक्का. आपण स्वत. सोडून इतरजणांनी मागे काय काय केले आहे ते अगदी तारीखवार त्याच्या डोक्यात व्यवस्थित चोदलेले असते. पुन्हा त्याची नको तेव्हा नेमकी याद करून देण्याची समयसूचकता त्याच्याकडे आहे. कोणाच्याही नैतिक अधिकाराला हात घालणाऱ्याचे म्हणणे मला पटायला लागून तात्पुरते तरी माझे पूर्ण समाधान होते. आतासुद्धा तसेच झाले. आमचे जसे पूर्ण समाधान झाले तसे सकलसज्जनाचे झाले असेल, अशी आमची धारणा होती.

पण तसे घडले नाही. वा. ल. कुलकर्णींचे ज्ञानेश्वर नाडकर्णींच्या ऐतिहारिक विवेचनाने समाधान झाले नाही. त्यानी आणखी एक पत्र लिहिले. त्यात, आपण परीक्षक असताना प्रसगी वाङ्मयमूल्यमापनाचे निर्णय आक्षेपार्ह ठरले आहेत असे कबूल करून वा. ल. ठामपणे म्हणतात की 'काजळमाया' पुस्तकाच्या बाबतीतला प्रश्न चुकीच्या निर्णयाचा नसून नियमबाह्य निर्णयाचा आहे व म्हणूनच तो बदलणे आवश्यक आहे.

वा. लं. च्या या पत्राबरोबर, त्याच अकात (महाराष्ट्र टाईम्स : १४ मे १९७४), आणखी दोन पत्रे आहेत. दोन्ही स्वतत्रपणे मौलिक आहेत. पहिले पत्र आहे माधवमनोहराचे. या प्रकरणाला वाचा त्यानीच फोडली होती. या टप्प्यावर त्यांनी प्रस्तुत प्रकरणाबद्दल काही मनोरजक माहिती या पत्रातून सादर केली. परीक्षकसमितीला 'काजळमाया' पुस्तक पुरस्कार देण्याच्या लायकीचेच वाटत नव्हते, पण तसे जाहिरपणे सांगणे तिला गैरसोयीचे झाले; म्हणून ते पुस्तक स्पर्धेसाठी सादर करण्यात आल्यावरही मागे घेण्यात यावे असे लेखक-प्रकाशकाना सुचवण्यात आले, लेखक-प्रकाशक हावरट असल्यामुळे त्यानी पुस्तक मागे घ्यायचे नाकारले; तेव्हा माडखोलकरांना बी. ए. एम. ए. च्या दृष्टांताचे प्रतिभाशाली स्फुरण होऊन 'काजळमाया' पुरस्कारप्राप्त ग्रथातून सन्मानपूर्वक वगळण्यात आले. याशिवाय केंद्र व राज्य असे दोन्ही पुरस्कार मिळणाऱ्या मराठी ग्रथांची उदाहरणे देऊन यदाच्याच वर्षी राजा मगळवेढेकरांच्या 'मुक्या' या पुस्तकाच्या बाबतीत तसे घडल्याचे माधव मनोहरानी जनतेच्या निदर्शनास आणून दिले.

दुसरे मौलिक पत्र होते मुबई ४ चे सर्वविदित साहित्यिक राजा राजवाडे यांचे. 'राजा राजवाडे' हे कोणा माणसाचे टोपण नाव आहे असे वाटते. पण तसे ते नाही. राजा राजवाड हे नाव खरेच आहे; राजा राजवाडे हा माणूस टोपण आहे. असो. राजा राजवाडे यदाच्या राज्य पुरस्कारांवर खुश आहेत. गेली काही वर्षे राज्य पुस्तक पुरस्कार ही काही ठराविक लेखक व प्रकाशकाची मक्तेदारी होऊन बसली होती यदा, वसंत सावंत, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, प्र. श्री नेरूरकर, आनदीबाई विजापुरे, वासू देशपाडे, वा. रा. सोनार या बिनप्रस्थापिताना पुरस्कार मिळाल्यामुळे निकाल जास्त व्यापक आणि न्यायी आहे, असे भाऊराजांचे म्हणणे. जी. ए. कुलकर्ण्याला एक मोठे बक्षीस मिळाले पुष्कळ झाले; सगळी बक्षिसे त्यांना देत बसल्यास नवीनांना उत्तेजन कसे मिळणार? असे मराठी घरदाज कौटुबिक नाटकातल्या वहिनीच्या समजुतदारपणे त्यांनी विचारले आहे.

राजाभाऊच्या या वेगळया विचाराने पुन्हा एकदा आमचे पूर्ण समाधान झाले. आमचे जसे पूर्ण समाधान झाले तसे सकलसज्जनांचे झाले असेल अशी आमची धारणा होती. आणि तसेच घडले. लॉटरी सोडतीच्या पद्धतीने पुस्तकांना पुरस्कार देण्याची योजना, राजा राजवाडयाच्या पत्रामुळे सरकारने विचाराधीन केली आहे, अशी सबधित गोटतली बातमी आमच्या कानावर आली आहे. असो.

काही पुस्तके पुरस्कार मिळाल्यामुळे वाचकाच्या लक्षात येतात; काही पुस्तके पुरस्कार न मिळाल्यामुळे वाचकाच्या लक्षात येतात. 'काजळमाया' हे दुसऱ्या प्रकारचे पुस्तक आहे. त्याचबरोबर हेदेखील लक्षात घेतले पाहिजे की बहुतेकांना ते पुस्तक थोर वाटते आहे. थोर पुस्तकाचे दोन प्रकार असतात. एक वाचली जाणारी थोर पुस्तके. दोन, वाचली न जाणारी थोर पुस्तके.

'काजळमाया' हे दुसऱ्या प्रकारात जाईल की काय अशी भीती मला वाटू लागली आहे. कारण वर्तमानपत्रातले हे वादवादग वाचताना 'काजळमाया' हे नाव डोक्यात गेले आहे; त्यामुळे न वाचतासुद्धा ते आपण वाचलेच आहे, असा भास कित्येक साक्षेपी वाचकानाही होतो आहे. माझी गोष्ट वेगळी आहे वीस रुपये किंमतीच्या कोणत्याही पुस्तकाबद्दल मला तसाच भास होत असतो.

—अनंतराव

# सामुदायिक (सामुहिक) विहिरी : एक पाहाणी

# तालुका शिरूर

एम. बी. जगताप

महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांपैकी नऊ-दहा जिल्ह्यांच्या काही भागात १९७०-७१, १९७१-७२ व १९७२-७३ या तीन वर्षात सतत दुष्काळी परिस्थिती होती. या सतत तीन वर्षे पडलेल्या दुष्काळाची पहिली दोन वर्षे तेथील जनतेला फारशी जाणवली नाहीत, कारण या दोन वर्षात थोडा तरी पाऊस झाला होता. पण तिसऱ्या वर्षी म्हणजे १९७२-७३ साली अवर्षणच झाल्यामुळे दुष्काळी चटके जाणवू लागले. यानतर दुष्काळाकडे व दुष्काळी भागातील जनतेकडे महाराष्ट्र शासन, निरनिराळे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते गंभीरपणे पाहू लागले.

दुष्काळ पीडित जनतेला रोजगार देण्यासाठी शासनामार्फत दुष्काळी कामे सुरू करण्यात आली. महाराष्ट्र शासनाचे या दुष्काळी कामासाठी १९७२-७३ साली ७५ कोटी रुपये आणि १९७३-७४ साली १३६ कोटी रुपये मिळून २११ कोटी रुपये खर्च झाले आवेत, असे कळते. याचबरोबर राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या सघटना उभारल्यामुळे त्यांचेमार्फत इतर भागातून मदत येण्यास सुरुवात झाली होती.

शासनामार्फत, सुरुवातीला नवीन रस्त्यांची कामे, जुन्या रस्त्यांची रुदी वाढविणे व दुरुस्ती, खडी केंद्रे या प्रकारची शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनुत्पादक कामे सुरू करण्यात आली होती. घाईगर्दीने सुरू केलेल्या या कामामुळे दुष्काळ पीडित जनतेला काम व रोजगार मिळण्यास मदत झाली. यासाठी दुष्काळ पीडित जनता शासनाला धन्यवाद देत आहे. अशा वेळी परकीय सरकार असते तर बगालच्या दुष्काळाप्रमाणे येथे परिस्थिती निर्माण झाली असती असे बोलतानाही लोक आढळले.

शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या या उत्पादक दुष्काळी कामामुळे, दुष्काळी भागाचा कायमचा किंवा अंशतः कायापालट होण्याच्या दृष्टीने उपयोग होणारा नव्हता, तेव्हा आलेल्या दुष्काळी सकटाचा एक सधी म्हणून उपयोग करून घेण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरवून, जेणे करून दुष्काळी भागात पाणी पुरवठ्याची साधने वाढविता येतील अशी कामे सुरू करावयाची असे सप्टेंबर १९७२ मध्ये ठरविले आणि त्यादृष्टीने हालचाली सुरू झाल्या. त्यासाठी पाझर तलाव, गावतळी, इरिगेशन टँक यासारखी पावसाचे पाणी साठविणारी कामे सुरू झाली आणि रस्त्याची कामे, खडी केंद्रे या प्रकारची अनुत्पादक कामे बद करण्यात आली.

या योजनेमधून, महाराष्ट्रामध्ये, १९७२-७३ च्या दुष्काळात ४७९२ पाझर तलाव, इरिगेशन टँकसारखी कामे सुरू झाली आणि यातील सुमारे $\frac{1}{3}$ म्हणजे १५३५ कामे पूर्णही झाली. या योजनेखाली झालेल्या इरिगेशन टँकचा फायदा काही थोड्या गावांनाच होणार आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने विशेषत दुष्काळी भागाचा विचार करता, या भागात पाणी पुरवठ्याची साधने वाढणे आवश्यक होते. पाझर तलाव, गावतळी यासारखी कामे बहुतेक प्रत्येक गावी चालू होती. यात साठणाऱ्या पाण्याचा फायदा तेथील जनतेलाच जास्त करून घेता यावा यासाठी त्याखाली विहिरी असणे आवश्यक होते, त्या तशा नव्हत्या, त्यासाठी नवीन विहिरी पाडणे दुष्काळी भागातील शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या अशक्य झाले होते. याही बाबीचा शासनाने विचार करून सामुदायिक विहिरीची योजना सुरू केली.

ही सामुदायिक विहिरीची योजना कलेक्टरांचेमार्फत तहशिलदार, तलाठी याच्याकडे ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७२ मध्ये आली व त्यादृष्टीने कार्यवाही सुरू झाली. डिसेंबर १९७२ मध्ये तलाठ्यानी आपापल्या गावातील पुढारी मंडळींशी चर्चा करून, तर काही ठिकाणी चौकशी करून सामुदायिक विहिरीस योग्य ठिकाणे ठरवून घेऊन तसे अहवाल तहशिलदारांच्याकडे पाठविले.

तलाठ्याकडून आलेल्या अहवालावर निर्णय घेण्यासाठी प्रारभी तालुका पातळीवर तहशिलदार, गटविकास अधिकारी आणि एक इजिनिअरच्या दर्जाचा अधिकारी अशा तिघाची एक कमिटी निर्माण करण्यात आली होती या कमिटीमध्ये सामुदायिक विहीर कोठे खोदावयाची हे ठरविले जाऊ लागले. पण या कमिटीमार्फत सामुदायिक विहिरीसबधाचे निर्णय लवकर घेण्यात अडचणी येऊ लागल्याचे आढळून येताच याबाबतचे सर्वाधिकार तहशिलदाराना देण्यात आले.

तहशिलदारामार्फत, हे सामुदायिक विहिरीचे सर्व अहवाल कलेक्टरांच्याकडे मान्यतेसाठी पाठविले जाऊ लागले. यास कलेक्टराची मान्यता मिळताच काही सामुदायिक विहिरीच्या कामास सुरुवात झाली.

यानतर सामुदायिक विहिरीच्या ठिकाणाबाबत म्हणजे येथे विहीर नको, दुसऱ्या ठिकाणी पाहिजे अशा प्रकारच्या गावकऱ्यांच्या तक्रारी येण्यास सुरुवात झाली. तेव्हा सामुदायिक विहिरी कोठे खोदावयाच्या हे ग्रामपंचायतीचे ठराव घेऊन गट विकास अधिकाऱ्यांना कळवावे व गट विकास अधिकाऱ्यांनी तहशिलदारांना कळवावे असे

ठरविण्यात आले व याप्रमाणे कार्यवाही जानेवारी १९७३ पासून सुरू झाली. शेवटी कलेक्टरांची मजुरी मिळाली म्हणजेच सामुदायिक विहिरीच्या खणतीच्या कामास सुरुवात होत होती. सामुदायिक विहिरीच्या योजनेची कार्यवाही कशा प्रकारे होते आहे हे पाहण्यासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेमार्फत डिसेंबर १९७३ मध्ये एक पाहाणी करण्याचे ठरले. त्यासाठी पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्याची निवड करण्यात आली. पाहणीसाठी घेतलेल्या शिरूर तालुक्यातील १३ गावामधील सामुदायिक विहिरींपैकी बहुतेक विहिरींच्या कामास फेब्रुवारी १९७३ मध्ये सुरुवात झालेली होती.

पाहाणीच्या गावामधील सामुदायिक विहिरी केव्हा सुरू झाल्या त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| कामाची सुरुवात फेब्रुवारी १९७३ मध्ये | | १८ | विहिरींची |
| मार्च | ,, | ५ | ,, |
| एप्रिल | ,, | ६ | ,, |
| मे | ,, | १० | ,, |
| जून | ,, | १२ | ,, |
| जुलै | ,, | ४ | ,, |
| ऑगस्ट | ,, | ६ | ,, |
| सप्टेंबर | ,, | २ | ,, |
| माहिती मिळाली नाही अशा विहिरी | | ३ | ,, |
| | एकूण | ६६ | विहिरी |

या ठिकाणी एक बाब नमूद करण्यासारखी आहे, ती अशी की, खरीप, हगामी भागातील दुष्काळी कामे सप्टेंबर १९७३ अखेर बंद करावयाची असे शासनाचे धोरण ठरले होते. तरीही सामुदायिक विहिरींची कामे शेवटपर्यंत नव्याने सुरू होत होती असेही आढळले.

सामुदायिक विहिरी ज्यांच्या शेतामध्ये खणल्या आहेत त्या खातेदाराने विहिरीसाठी लागणारी ३ गुंठे क्षेत्राची जमीन सरकारला 'दान' द्यावयाची असून अशी दानपत्रे साडेतीन रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करून घेण्यास डिसेंबर १९७३ मध्ये सुरुवात झाली असल्याचे दिसून आले. ज्यावेळी विहिरीच्या खणतीच्या कामास सुरुवात केली त्यावेळी खातेदाराचे फक्त कबुली जबाब घेऊन ठेवले होते व त्यावर खणतीच्या कामास सुरुवात झाली होती. पुऱ्या करण्यात आलेल्या दानपत्राची संख्या अगदी कमी होती. बहुतेक जागेची दानपत्रे व्हावयाची होती.

प्रत्येक सामुदायिक विहिरीसाठी—खणतीच्या कामाकरिता ३० हजार रुपयापर्यंत खर्च करण्याची शासनाची तयारी होती असे दिनांक ७–१०–१९७२ च्या परिपत्रकावरून दिसते. सामुदायिक विहिरीसाठी लागणारा पैसा कलेक्टर याचे मार्फत पुरवविला गेला व विहिरीच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम पचायत समितीच्या मार्फत ग्रामसेवक करीत होते.

सामुदायिक विहिरीवर काम करणाऱ्या मजुराना दर १२–१५ दिवसानी मजुरी देण्यात येत होती. ही मजुरी, मजुरानी केलेल्या कामावर अवलबून असे. मजुरांनी केलेल्या खणतीच्या कामाला, ठरलेल्या दराने (यासंबंधीची माहिती दिनांक ९–१–१९७३ च्या परिपत्रकामध्ये आहे) मातीकाम, मुरूम काम व खडक काम अशा निरनिराळ्या दरान आकारणी करीत व ते पैसे मजुराना विभागून देत असत. ही मजुरीची विभागणी करताना ४ पुरुषाबरोबर ५ स्त्रियाना मजुरी देण्यात येत होती. अशा पद्धतीने मजुरीची विभागणी एप्रिल १९७३ पर्यंत करण्यात येत होती. यानतर शासनाच्या आदेशानुसार स्त्री-पुरुषाना समान मजुरीचा दर देण्यात येऊ लागला. यामुळे मजुरीतील स्त्री-पुरुष हा भेद नष्ट झाला. शिरूर तालुक्यात पाहाणी केलेल्या १३ गावामध्ये, सामुदायिक विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांना मजुरीचा दर ६० पैशापासून २ रुपयापर्यंत मिळाला असल्याचे आढळून आले. पाहणीच्या एका गावी तर एका मजुरीचे वाटप ३० पैसे रोजाने झाल्याचे सांगण्यात आले तर दुसऱ्या ठिकाणी जास्तीत जास्त २॥ रुपये रोज दिल्याचे सागण्यात आले. याचवेळी पाझर तलाव, गावतळी असलेल्या दुष्काळी कामावर २ ते २॥ रुपये रोज पडत होता. या दरापेक्षा सामुदायिक विहिरीवरील कामाचा मजुरीचा दर कमी पडत होता. अशा प्रकारे सामुदायिक विहिरीवरील मजुराना आधीच कमी मजुरी मिळत असता, या मजुरीतूनच हत्यारे शेवटणीचा खर्च मजुरानाच करावा लागत होता. (मात्र खडक फोडण्यासाठी लागणारी सुरुगाची दारू-बत्ती हा खर्च सरकारी असे) य मुळे हा मजुरीचा दर आणखीच कमी होत असे. या कारणाने विहिरीवर काम करण्यास मजूर मिळत नसत.

सर्वसाधारणपणे प्रत्येक सामुदायिक विहिरीवर १५ ते २५ माणसे खणतीच्या कामास असत यात सर्वसाधारणपणे निम्मे पुरुष व निम्या स्त्रिया असत हे स्त्री पुरुषसुद्धा ज्याची जमीन या विहिरीच्या पाण्याने भिजू शकणारी असेल अशा खातेदाराच्या कुटुबातील असत. हे लोक मजरीचा दर कमी मिळाला तरी पुढे फायदा होईल म्हणून कामावर येत असत. जे लोक निव्वळ मजूर म्हणून या कामावर येत होते, त्याना येथील मजुरीचा दर फारच कमी वाटू लागल्याने, त्यानी सामुदायिक विहिरीवर काम करण्याचे सोडून दिलेले आढळले. निव्वळ मजुरी करणारे लोक, पाझर तलाव, गावतळी या ठिकाणी मजुरी बरी मिळते म्हणून तिकडे कामास जात असत.

सामुदायिक विहिरीवर कामाचा मजुरीचा दर कमी मिळतो म्हणून काही विहिरीवर काम करण्यास माणसे मिळाली नाहीत. ज्या कुटुबाना विहिरीचा उपयोग होणार होता अशा पैकी काहीनी त्यात लक्ष घातले नाही. जास्त मजुरी कोठे मिळेल, तिकडेच कामावर जाऊ लागल्याने अशा विहिरीची कामे, काहीची थोडीफार सुरुवात होऊन बद पडलेली तर काही विहिरीच्या कामास सुरुवात ही न झालेली आढळली.

## सामुदायिक विहिरींची संख्या

महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने पाहता, १९७३ सालामध्ये एकूण ५६६८० सामुदायिक विहिरीच्या खणती कामास सुरुवात झाली होती असे डिसेंबर १९७३ मध्ये निघालेल्या सरकारी परिपत्रकावरून दिसते. या ५६६८० सामुदायिक विहिरीमध्ये निम्म्यापेक्षा विहिरी म्हणजे ३१५८६ विहिरी औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नगर, पुणे व सोलापूर या सहा जिल्ह्यामध्ये आहेत. या सामुदायिक विहिरीची जिल्हेवार आकडेवारी पुढे दिली आहे.

### महाराष्ट्रातील सामुदायिक विहिरी
### (१५ डिसेंबर १९७३ ची स्थिती)

| क्र. जिल्हा | सुरू केलेल्या विहिरीची सख्या | पैकी पाणी लागलेल्या विहिरी | जिल्ह्यातील गावे | सरासरीने प्रत्येक गावी विहिरी | |
|---|---|---|---|---|---|
| **नागपूर विभाग** | | | | | |
| १ अकोला | ८१० | ४२१ | १५०८ | ·५ | |
| २ अमरावती | ३४३ | १७४ | १६०९ | ·२ | |
| ३ भडारा | ९८ | ८० | १४८६ | ·७ | |
| ४ बुलढाणा | १२३९ | २४० | १२२५ | १·० | ०·४ |
| ५ चद्रपूर | ६३५ | ११३ | २७५५ | ·२ | |
| ६ नागपूर | ९७२ | ६१२ | १६५३ | ·६ | |
| ७ वर्धा | ४१० | ११३ | ९७२ | ·४ | |
| ८ यवतमाळ | ८४३ | २७९ | १६२९ | ·५ | |
| **औरंगाबाद विभाग** | | | | | |
| ९ औरगाबाद | ४३१३ | ११०५ | १८७९ | २·३ | |
| १० बीड | ७८०१ | २३१९ | १०३१ | ७·६ | |
| ११ नांदेड | १३४९ | २९३ | १३२५ | १·० | ३ ० |
| १२ उस्मानाबाद | ६०६८ | २२१८ | १३८८ | ४·४ | |
| १३ परभणी | १९०० | ६८७ | १५१७ | १·३ | |
| **पुणे विभाग** | | | | | |
| १४ अहमदनगर | ३१४२ | १२२२ | १३१८ | २ ४ | |
| १५ पुणे | २९१० | ८७५ | १४९८ | १·९ | |
| १६ सागली | ६६९० | २४५८ | ५२६ | १२ ७ | ३ ७ |
| १७ सातारा | २१८५ | ७६३ | ११६० | १·९ | |
| १८ सोलापूर | ७३५२ | ३०२३ | ९४७ | ७·८ | |
| १९ कोल्हापूर | १६४१ | १०२ | १०८६ | १·५ | |
| **मुंबई विभाग** | | | | | |
| २० घुळे | १५२१ | ६५० | १३६० | १ १ | |
| २१ जळगाव | ७५१ | २२५ | १४३५ | ५ | |
| २२ कुलाबा | १२ | १ | १७७८ | — | |
| २३ नासिक | ३०९१ | ७४१ | १६५२ | १·९ | ०·७ |
| रत्नागिरी | ६४ | ३३ | १५१६ | ·४ | |
| २५ ठाणा | ७८६ | ३५४ | १४९९ | ·४ | |
| एकूण | ४६६८० | १८९११ | ३५८५१ | १·६ | |

महाराष्ट्र राज्यामध्ये सुरू करण्यात आलेल्या सामुदायिक विहिरींच्या सख्येकडे पाहता असे दिसते की, राज्यातील प्रत्येक गावो सरासरीने १ ६ सामुदायिक विहीरी खणतीस सुरुवात झाली होती. आणि यातील ०·५ सामुदायिक विहिरीस पाणी लागले आहे असे सरकारी कागदपत्रावरून दिसून येते.

राज्याच्या विभागवार असणारे सामुदायिक विहिरीचे आकडे पाहिल्यास पुणे आणि औरगाबाद विभागात सरासरीने प्रत्येक गावी ३·७ व ३·० सामुदायिक विहिरी खणतीस-सुरुवात झाली होती. या विभागात दुष्काळी परिस्थिती विशेषत्वाने असल्यामुळे आणि येथील लोकाना काम देण्यासाठी म्हणून ह्या सामुदायिक विहिरी जास्त प्रमाणात सुरू करण्यात आल्या असाव्यात.

जिल्हेवार आकड्यांकडे पाहिल्यास सामुदायिक विहिरींची कामे सुरू करण्यात सांगली जिल्ह्याचा क्रमांक पहिला लागतो तेथे सरासरीने प्रत्येक गावी १२·७ सामुदायिक विहिरीच्या खणतीच्या कामास सुरुवात झाली होती या यानंतर सोलापूर व बीड या जिल्ह्याचा क्रमांक लागतो, तेथे प्रत्येक गावी सरासरीने ७·८ व ७·६ सामुदायिक विहिरी खणतीच्या कामास सुरुवात झाली होती. या खालोखाल उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ४·४, नगर जिल्ह्यात २·४, औरगाबाद जिल्ह्यात २·३, पुणे जिल्ह्यात १·९, सातारा जिल्ह्यात १·९, कोल्हापूर जिल्ह्यात १·५, परभणी जिल्ह्यात १·३, आणि नांदेड जिल्ह्यात १·० अशा प्रमाणात प्रत्येक गावी सरासरीने सामुदायिक विहिरी खणल्या गेल्या आहेत.

सरकारी कागदोपत्री ५६६८० सामुदायिक विहिरी सुरू झाल्या होत्या म्हणून जे दाखविले आहे ते तसे नसून इतक्या विहिरीना कलेक्टर साहेबानी मंजुरी दिली होती असे आहे. यातील १० ते १५ टक्के विहिरी सुरुच होऊ शकल्या नाहीत. सस्थेने दुष्काळी पाहणीसाठी घेतलेल्या पुणे, सोलापूर, नगर, औरंगाबाद, बीड व उस्मानाबाद या सहा जिल्ह्यांच्या कलेक्टराकडून सामुदायिक विहिरीबाबत मागणी केलेल्या माहितीपैकी पुणे, औरगाबाद, बीड आणि नगर येथील माहिती आली आहे. त्यावरून हे एकूण विहिरीचे आकडे मजूर विहिरीचे आहेत हे स्पष्ट होते तसेच आलेल्या या माहितीवरून असेहा दिसते की, मजूर केलेल्या विहिरीपैकी पुणे जिल्ह्यामध्ये १६ टक्के, औरगाबाद जिल्ह्यामध्ये १३ टक्के आणि बीड व अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रत्येकी ९ टक्के विहिरी सुरू होऊ शकल्या नाहीत. याला कारण बहुतेक ठिकाणी असे सागण्यात आले की, विहीर खोदण्यासाठी मजूर मिळाले नाहीत.

खणतीच्या कामास सुरुवात केलेल्या सामुदायिक विहिरीपैकी, १८९११ विहिरीना पाणी लागल्याचे शासनाच्या परिपत्रकावरून दिसते म्हणजे कामास सुरुवात झालेल्या विहिरींपैकी ३५ टक्के विहिरी 'यशस्वी' ठरल्या

या सबधी अधिक माहिती मिळविण्यासाठी शिरूर तालुक्याची पाहणी केली, तेव्हा तालुका पातळीवर मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की, शिरूर तालुक्यामध्ये एकूण ३८६ सामुदायिक विहिरीसाठी कलेक्टरसाहेबाची मजूरी मिळाली होती यातील ३६७ विहिरीच्या खणतीच्या कामास सुरुवात झाली. यातील ९१ विहिरीना पाणी लागले असून यापैकी ८२ विहिरीना भूजल सर्वेक्षण व विकास यत्रणा खात्यामार्फत भरपूर पाण्याची यशस्वी विहीर' म्हणून प्रमाणपत्रे मिळाली आहेत. व बाकीच्या ९ विहिरीना 'कमी पाण्याची विहीर म्हणून प्रमाणपत्रे दिली आहेत. या माहितीवरून शिरूर तालुक्यात सामुदायिक विहिरी म्हणून सुरू करण्यात आलेल्या विहिरीमध्ये सुमारे २५ टक्के विहिरी 'यशस्वी' झाल्या आहेत असे दिसते. महाराष्ट्रातील यशस्वी विहिरींच्या टक्केवारीच्या मानाने ही टक्केवारी कमी आहे.

तपशीलवार माहितीसाठी शिरूर तालुक्यातील निवडक १३ गावामध्ये दुष्काळी पाहाणीच्या कामाबरोबर तेथील सामुदायिक विहिरीची पाहणी करण्यात आली. त्यावेळी या गावातून एकूण १५ पाझर तलाव, ५६ गावतळी या कामाबरोबर ६६ सामुदायिक

विहिरींची कामे चालू होती असे आढळून आले. या कामाचा गाववार तपशील,

| गाव | पाझर तलाव | गावतळी | सामु विहिरी | पैकी पाणी लागलेल्या विहिरी |
|---|---|---|---|---|
| १ मलठण | १ | ६ | ६ | १ |
| २ कवठे | ३ | ५ | ६ | ६ |
| ३ ढोक सागवी | २ | १ | ३ | १ |
| ४ केंदूर | २ | १९ | १५ | ११ |
| ५ धामारी | — | ७ | ७ | २ |
| ६ हिवरे | १ | २ | १ | — |
| ७ मुरवई | — | २ | ६ | १ |
| ८ जातेगाव खुर्द | १ | २ | ५ | — |
| ९ करडी | १ | १ | ५ | ३ |
| १० राजण गाव (गणपती) | १ | ५ | २ | २ |
| ११ निमगाव (महाळुगी) | १ | ३ | ३ | १ |
| १२ आंबळे | १ | २ | ३ | १ |
| १३ निमोणे | १ | १ | ४ | १ |
| एकूण | १५ | ५६ | ६६ | ३० |

यावरून प्रत्येक गावी सरासरीने १ पाझर तलाव, ४ गावतळी व ५ सामुदायिक विहिरींची कामे चालू होती. यातील काही गावातून तालुक्याचे पुढारीपण असल्यामुळे किंवा ती गावे मोठी असल्यामुळे अशा गावातून मोठ्या संख्येने दुष्काळी कामे झाली असावीत.

सामुदायिक विहिरींच्या झालेल्या खोदकामामध्ये सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, पहिल्या ५ फुटापर्यंत मातीचे खोदकाम, नंतरच्या पाच फुटात मुरुमाचे खोदकाम आणि त्यानतर काळ्या खडकाचे खोदकाम आहे. सर्व सामुदायिक विहिरींचा गाळा ३६ फूट व्यासाचा ठेवला आहे.

पाहणी केलेल्या सामुदायिक विहिरींचे झालेल्या खोदकामावरून वर्गीकरण :

| झालेले खोदकाम | झालेल्या सामु. विहिरी | पैकी पाणी लागलेल्या विहिरी | भूजल सर्वेक्षण खात्याचे प्रमाणपत्र मिळालेल्या |
|---|---|---|---|
| ५ फुटापर्यंत | ३ | — | — |
| ५ ते १० फुटापर्यंत | १५ | ४ | — |
| १५ ,, | १७ | ६ | १ |
| २० ,, | १२ | ६ | १ |
| २४ ,, | ८ | ४ | १ |
| ३० ,, | ८ | ७ | ६ |
| ३४ ,, | १ | १ | — |
| ४० ,, | १ | १ | १ |
| ४४ ,, | १ | १ | १ |
| एकूण | ६६ | ३० | ११ |

या ६६ सामुदायिक विहिरींपैकी, ३० विहिरींना पाणी लागले आहे असे तेथील गावकऱ्यानी सांगितले. या पाणी लागलेल्या विहिरीपैकी ११ विहिरींना डिसेंबर अखेर 'यशस्वी विहीर' म्हणून भूजल सर्वेक्षण व विकासयंत्रणा खात्याची प्रमाणपत्रे मिळाली होती. याशिवाय आणखी ४ विहिरींची भूजल सर्वेक्षण खात्यामार्फत पाहाणी झालेली आहे. त्या विहिरींना प्रमाणपत्रे मिळतील असे धरल्यास पाहाणी केलेल्या विहिरींमध्ये सुमारे २३ टक्के विहिरी 'यशस्वी' झाल्या आहेत.

शेतकऱ्यांनी सांगितलेल्या माहितीवरून या पाणी लागलेल्या विहिरींसुद्धा पाण्याचा साठा होण्यासाठी आणखी खोदाव्या लागणार आहेत. या विहिरींपैकी फक्त एका विहिरीचे खोदकाम पूर्ण झाले आहे सामुदायिक विहिरींना पाणी लागले म्हणून त्या पूर्ण झाल्या असे म्हणता येणार नाही. कारण पाणी लागले तेव्हा पावसाळा होता. हिवाळ्यात, विशेषत उन्हाळ्यात विहिरीला पाणी असावे लागते.

पाहाणी केलेल्या सामुदायिक विहिरींची खोदकामे किती दिवस चालली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे—

| तपशील | सामुदायिक विहिरी | पैकी पाणी लागले अशा विहिरी |
|---|---|---|
| १ महिना काम चालले | १३ | ५ |
| २ महिने ,, | १८ | १२ |
| ३ महिने ,, | ८ | २ |
| ४ महिने ,, | १० | २ |
| ५ महिने ,, | ७ | ६ |
| ६ महिने ,, | ४ | १ |
| ७ महिने व त्यापेक्षा जास्त दिवस काम चालले. | ६ | २ |
| एकूण | ६६ | ३० |

ही विहीर खोदाईची कामे काहीना काही कारणाने अधूनमधून बंद पडत. आलेली अडचण दूर झाली की खोदाईच्या कामास पुन: सुरुवात होत असे. या अडचणीमध्ये मुख्य अडचण म्हणजे मजूर कामाला येईनासे होत. त्यांना मजुरी कमी मिळत होती. याचबरोबर झालेल्या कामाची मजुरी वेळेवर मिळत नसे. यामुळे मजूर विहिरीचे कामावर येईनासे होत. याशिवाय सुरुग लावण्यासाठी दारू-बत्ती मिळाली नाही, विहिरीतील पाणी उपसण्यासाठी ऑईल इंजिन मिळाले नाही असल्या अडचणी आल्याने विहिरींच्या चालू कामात खंड पडत असे.

या सामुदायिक विहिरींची खणतीची कामे केव्हा कायमची बंद झाली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

पृष्ठ २२ वर

ती कृश बांध्याची तरुणी उंच होती. त्यामुळे ती इतर स्त्रियांहून चटकन नजरेत भरे. तिचे केस सोनेरी आणि पिवळा रंग यांच्या मधल्या रंगाचे होते. आणि तिचे डोळे चकाकणारे हाते. तेजस्वी होते. तिचे पातळ आणि गुलाबी ओठ कुणालाही मोह घालीत. तिचं नाव सुंदरी होतं ते सार्थच होतं नाही का? तिचं शिक्षण फारसं झालं नव्हतं तरी ती आदर्श गृहिणीसारखी निष्पाप आणि सुहास्यवदनी होती.

तिच्या या गुणसमुच्चयामुळे तिच्या पतीचं सकाळच्या चहापानाच्यावेळी कॉफी किंचित कडवट आहे या गोष्टीकडे लक्ष गेलं नाही. वृत्तपत्राकडेही त्याचं फारसं लक्ष नव्हतं. तो आपल्या सहधर्मचारिणीमध्ये रमून गेला होता.

'प्रिया' ती त्याला म्हणाली 'तू डिटेक्टिव्ह झाला नसतास तर फार बरं झालं असतं.' डिटेक्टिव्ह लक्ष्मणदास कपूरला आपल्या व्यवसायाचा फार अभिमान होता. तो आपल्या व्यवसायात झप झप वर चढत गेला. इतर कुणी हे विधान केलं असतं तर तो रागावला असता, पण आता हे विधान त्याच्या लाडक्या पत्नीने केलेलं होतं. त्यामुळे तो हसला.

'का ग बाई?' त्याने तिला विचारलं.

तिने त्याच्या केसावरून हात फिरविले व म्हणाली 'तुझा हा व्यवसाय फार चांगला आहे असं मला वाटत नाही. आणि आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांनादेखील तू हा व्यवसाय करतोस ते आवडतं असं मला वाटत नाही.'

'पोरी माझा हा व्यवसाय धोक्यानी भरलेला आहे. याची मला जाणीव आहे. पण तू काळजी करू नकोस. शिवाय या व्यवसायात फार मजा आहे! तो म्हणाला.

मग सुंदरीनं विषय बदलला व त्याला म्हणाली 'आज रात्रौ आपण मोती टॉकीजला सिनेमा पहायला जाऊ या का?'

'आनंदानं. मीही तुला तेच सांगणार होतो. मोती टाकीजला खटघाळ वैजयंतीमालाचं साधना पिक्चर लागलय. आपण ते पाहू. या'

मोती टॉकीजमध्ये साधना बोलपट दाखविला जात होता. प्रेक्षक शांतपणे चित्रपट पहात होते. सिगारेटचे धूर हवेत विरत होते.

आणि एवढ्यात अनपेक्षितपणे एक किंकाळी ऐकू आली. कुणातरी माणसानं भयंकर भीतीने किंवा असह्य वेदनेने ती किंकाळी मारली असावी. या किंकाळीने प्रत्येकाचं अंग शहारून गेलं. सुंदरीने आपल्या पतीच्या गळ्याभोवती हात टाकले आणि त्याला विचारलं 'प्रिया काय हे?' त्यानं तिचा हात घट्ट धरला. इतरांप्रमाणे तोही उठून उभाराहिला होता व जिथून किंकाळी आली होती तिकडे पाहू लागला. त्यांच्यामागे थोड्या अंतरावर स्टॉलकडून ती किंकाळी आली होती. प्रेक्षक टॉर्चचा उजेड फेकून काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न करीत होते. ती आरोळी परत काही ऐकू आली नाही. सिनेमा दाखवणं बंद केलं. थिएटरमधले दिवे लागले, व आता सारेचजण आपापल्या जागेवर उभे राहून काय आहे ते पाहू लागले. प्रेक्षकांना काय घडलं असावं ते कळणं कठीण होतं. पण लक्ष्मणदास कपूरला मात्र कल्पना आली. कारण त्याचा व्यवसाय असल्या गोष्टींशी निगडीत होता.

'काय झालय्?' सुंदरीने त्याचा हात घट्ट पकडून विचारलं.

'मला वाटतं कुणालातरी दुखापत झाली. त्याला फार गंभीर दुखापत झाली असावी,



# सिनेमा थिएटरमध्ये खून!

**अलाहाबाद येथील मोती थिएटर मध्ये घडलेली सत्य घटना. रूपकिशोरच्या पाठीत सुरा खुपसून त्याचा खून केला गेला. रूपकिशोर तत्काळ मरण पावला. त्याच्या दोन बाजूचे दोन पुरुष आणि त्याच्या पाठीमागच्या सीटवर बसलेला तरुण यांच्यावर खुनाचा वहीम होता.**

**पण खुनी व्यक्ति निराळीच होती–रूपकिशोरची प्रेयसी–**

**त्या घटनेची ही सत्यकथा–**

● **श्रीकृष्ण ठाकूर** ●

---

किंवा तो एकाएकी आजारी झाला असावा.' तो म्हणाला.

'कुणी आजारी पडला तर अशा तऱ्हेनं ओरडेल असं मला नाही वाटत.' ती हळूच आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'कुणाचा तरी खून झाला असावा असं वाटतं.'

'तसंच असेल असं मलाही वाटतं.' तो तिला म्हणाला, 'ते बघ लोक त्याला उचलून नेताहेत.'

एका स्ट्रेचरवरून एका माणसाला नेत होते. त्याचा संपूर्ण देह कपड्याने आच्छादिलेला होता. पोलीस तिथे आलेले होते. तिथल्या जागेचा ताबा पोलिसांनी घेतला होता. व तिथल्या काही माणसांना पोलिसांनी थांबवलं होतं.

ज्या माणसाचा खून झाला होता त्याच्या दोन्ही बाजूच्या माणसांना व त्याच्या मागच्या सीटवरच्या माणसाला पोलिसांनी थांबावयास लावलं. मग त्या तिघांना पोलीसस्टेशनवर नेलं. पोलीस कस्टडीत ठेवलं व दुसऱ्या दिवशी सकाळी जामिनावर त्यांची मुक्तता केली. डिटेक्टिव्ह कपूर व त्याची पत्नी विमनस्क स्थितीत घरी परतली. सुंदरीनं घरी गेल्यावर पतीच्या खुर्चीजवळ बसत विचारलं, 'प्रिया ! तू एवढ्या विचारात गर्क का ? तुला काही संगती लागते का ?'

'तसंच काही नाही. पण ज्या तिघांना पोलिसांनी पकडून नेलं त्यांचे चेहेरे आठवण्याचा प्रयत्न करतोय्.'

'ते तिघेहीजण गरीब बिचारे सर्वसामान्य असे आहेत असं मला वाटतं' ती त्याला म्हणाली.

'होय. त्या तिघांपैकी कुणीही गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध नाही.' तो म्हणाला.

'पण मग हे कृत्य कुणी केलं ? ते तिघेही जण तर साफ घाबरलेले दिसले.' ती म्हणाली.

'एवढ्यातच तू आपले मत बनवणं योग्य नाही.' तो तिला म्हणाला. 'पण एक गोष्ट लक्षात ठेव की खून झालेल्या व्यक्तीच्या पाठीमागच्या सीटवर जो बसला होता त्याला हे कृत्य करायला सर्वांत जास्त संधी होती. त्याच्या आजूबाजूच्या दहाबारा सीटवर कुणीही नव्हतं. मग त्यानं तीच सीट का स्वीकारावी ? खरं बोलायचं तर रिकाम्या रांगेमध्ये मनुष्य टोकाची सीट तरी पकडतो किंवा मधली.'

'पण तो खुनी असेल असं मला वाटत नाही. ती म्हणाली. 'त्याचा चेहरा इतका सोज्वळ होता – तो घाबरला होता हे खरं. त्यानं असलं कृत्य केलं असेल यावर माझा विश्वास नाही.'

'बरोबर आहे. शिवाय आपलं मन आपणाला काय सांगतं ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. मी आपल्या या मनावर फार विश्वास ठेवतो. वाटल्यास आपण त्याला आतला आवाज म्हण. पण काय ग, त्या तरुण माणसाची एखादी चमत्कारीक गोष्ट तुझ्या लक्षात आली का ?'

'चमत्कारीक ? कोणत्या अर्थी ?' तिनं विचारलं.

'त्याचं दिसणं, कपडे किंवा असंच काहीतरी ?'

'होय. एक चमत्कारीक गोष्ट होती. त्यानं हातमोजे घातले होते.' ती म्हणाली.

तेव्हा त्यानं सुंदरीच्या पाठीवर थोपटलं व म्हणाला, छान, छान. हे त्याचे हातमोजे त्याला फासाचा दोर दाखवतील.'

एखाद्या गल्लीच्या तोंडावर कुणीतरी एखाद्याचा खून करून काळोखात पळून गेला अशा स्वरूपाचा हा खून नव्हता. या खुनामध्ये चित्तथरारकता होती, नाट्य होतं. जिवाच्या आकांताने ठोकलेल्या त्या किंकाळीला जबाबदार कोणीही असो ती किंकाळी ज्यांनी ऐकली असेल ते ती मरेपर्यंत विसरणार नाहीत. ज्या सुरीनं खून केला ती सुरी त्या खुनीनं एका झटक्यात खुपसली होती व मरणारा तत्काळ मेला होता. या खुनाच्या बातम्या जसजशा वृत्तपत्रांत येऊ लागल्या

तशा त्या जास्त जास्त अशक्य कोटीतील आहेत असं वाचकाना वाटू लागलं.

मृत मनुष्याची तात्काळ ओळख पटली. त्याच नाव रूपकिशोर सिंगल. अलाहाबादचा तो व्यापारी होता. त्याच्या उजवीकडे बसलेला राधामोहन हा कापडाचा व्यापारी होता. त्याचे व रूपकिशोरचे सबध आपुलकीचे होते. त्या दोघामध्ये वाकडेपणा आल्याचा यत्किंचीतही पुरावा नव्हता. रूपकिशोरच्या डावीकडे बसलेला मनुष्य हा परकी होता. त्यानं आपल नाव बन्सीलाल कपूर अस सागितल. शहरामध्ये त्याच घड्याळ दुरुस्तीच दुकान होत. रूपकिशोरशी आपण कधी बोललो नव्हतो. किंवा त्याचा आपला कोणत्याच तऱ्हेचा सबध नव्हता असे त्याने सागितले. रूपकिशोरच्या मागे बसलेल्याचे नाव वरदराज सिंग. 'तू बसण्यासाठी हीच जागा का निवडलीस?' असं त्याला विचारल त्यावर तो म्हणाला, 'मी आजारी आहे व या सीटच्या दोन्हीकडच्या सीटस् रिकाम्या आहेत म्हणून मी ही सीट पसत केली.' तो रूपकिशोरशी कधी बोलल्याचा पुरावा मिळाला नाही.

दुसऱ्या दिवशी वरदराज सिंग हा, डिटेक्टिव्ह लक्ष्मणदास कपूर याना भेटावयास आला. कपूर त्याला म्हणाले, 'बसा. बोला मी आपणासाठी काय करू?'

तेव्हा वरदराजसिंग त्याना म्हणाला, 'त्या रात्री मोती सिनेमामध्ये रूपकिशोरचा खून झाला. ज्या तिघाचा पोलिसाना सशय आला त्यापैकी मी एक आहे. तुम्ही हे सारं वाचल असेलच.'

'होय मी वाचलय. तुम्ही रूपकिशोरला यापूर्वी कधी पाहिल नव्हत, त्याच्याशी बोलला नव्हता. त्या सीटवर तुम्ही बसला ते योगायोगाने. थोडक्यात तुमचा या खुनाशी काही सबध नाही. तुम्ही पूर्ण निर्दोषी आहात अस तुम्ही सांगितलेत.'

'होय–'

'तुम्ही सागितलेत ते सार सत्यच सागितलत. होय ना?' कपूरनी त्याला सहज विचारल.

तो क्षणभर गप्प राहिला. खाली कार्पेटकडे तो पहात होता. आपली हॅट त्याने आपल्या हातात घेतली. तो ती चुरगळीत होता. मग म्हणाला, कपूरसाहेब सारी परिस्थिती नीट आकलन करण्याचा तुम्ही प्रयत्न केलेला नाही असं मला वाटत? मग थोडा थाबला व म्हणाला, 'खून झालेल्या व्यक्तीच्या एक सीट पलीकडे एक स्त्री होती. पुरावा अस म्हणतो की खून झालेल्या व्यक्तीच्या पाठीत सुरा खुपसण त्या स्त्रीला अशक्य होत. तेव्हा पोलिसानी त्या स्त्रीचा विचार मनावाहेर काढलेला आहे. म्हणजे मग सशयीत असे आम्ही तिघेजण उरतो. रूपकिशोरच्या दोन बाजूचे दोघेजण व पाठीमागचा मी. एक त्याचा भागीदार, दुसऱ्या माणसाचं नाव मी विसरलो व तिसरा मी तेव्हा आम्ही तिघापैकी कुणाचाही त्याला मारण्याचा हेतू पोलिसाच्या नजरेत भरला की आमच्यापैकी कुणीतरी गुन्हेगार ठरणार.'

ही परिस्थिती फार चमत्कारिक आहे हे खर आहे.' कपूर म्हणाले.

'का कोण जाणे, पण पोलीस माझ्याच जास्त पाठी मागे आहेत असं मला वाटतं. मी कुठेही गेलो तरी माझ्यामागे गुप्त पोलीस असतात. माझा पाठलाग होत आहे. माझ्या भूतकाळाविषयी मला वाटेल तसले प्रश्न विचारले जातात. माझ्या परोक्ष माझ्या खोलीची दोनदा झडती घेतली याबद्दल माझी खात्री आहे.'

कपूर त्याला म्हणाले, 'तुझी हकीगत जर सत्य असेल तर मग पोलिसाना त्यात काही आढळणार नाही. पोलीस यत्रणेत कमिजास्त दोष आहेत हे खरं असल तरी ते निर्दोष माणसाला मुद्दाम दोषी समजून गुन्ह्यात गोवणार नाहीत.'

मग वरदराज म्हणाला, 'साहेब मी तुम्हाला आता एक महत्त्वाची गोष्ट सागतो. मृत माणसाच्या पाठीत जो सुरा सापडला तो माझा होता.'

हे ऐकताच डिटेक्टिव्ह कपूर झटकन् मागे झाले. 'बापरे!' ते म्हणाले. 'तुमची ही कबुली फार भयकर आहे!'

'साहेब तो सुरा मी चार वर्षापूर्वी विकत घेतला होता. गेल्या वर्षी मी आपली जागा बदलली तेव्हा हा सुरा कुठे आढळेना. त्यानतर तो सुरा मला दिसलाच नव्हता. दिसला तो रूपकिशोरच्या पाठीत. कोर्टात तो सुरा मी परत नीट पाहिला. तो तोच आहे खास. कपूरसाहेब तो सुरा माझा आहे.'

'तो सुरा तुझाच आहे हे ओळखणारे कुणी आहेत का?' कपूरनी त्याला विचारल

'ते कस सागू?' वरदराज म्हणाला, 'तो सुरा माझ्याकडे निदान दोन वर्षं होता. पोलिसाच्या हातात माझ्याविरुद्ध हा सज्जड पुरावा आहे. माझ्या परिचयातला कुणीतरी त्यांना मिळाला आणि त्याने हा सुरा माझा आहे अस सागितलं की माझ्या मानेभोवतीचा फाशीचा दोर कायम. तो सुरा माझाच आहे असे सागणारे कितीतरी भेटतील.'

'तस झाल तर तुझी स्थिती फार वाईट होईल.' कपूर म्हणाले.

'खर आहे. पण हा खून मात्र मी केलेला नाही' वरदराज म्हणाला, 'या रूपकिशोरच नाव मी कधी ऐकलच नव्हत. तो जगला की मेला याचही मला सुख–दुःख नाही. कपूरसाहेब मी तुमच्याकडे आशेन आलो आहे तुम्ही मला मदत कराल का? मला तीन जिवलग मित्र आहेत. ते माझ्याकडे नेहमी यायचे. आपण कृपया माझ्यासाठी त्याच्याकडे जा व त्यांना सागा की जर पोलिसानी त्याना या सुऱ्याविषयी विचारलं तर तो सुरा आपल्या ओळखीचा नाही अस त्यानी सांगाव. आपण कृपया एवढ करावच...मी काय कराव ते माझ मलाच कळत नाही.'

'वरदराज मी प्रथम तुला काही प्रश्न विचारतो. त्यांची उत्तर दे? डिटेक्टिव्ह कपूर त्याला म्हणाले. 'त्या रात्री तू सिनेमाला गेला असताना तू सतत हातमोजे घालून होतास. ते का? आतासुद्धा तू हातमोजे घाललेले आहेस. तू ते इथ काढ असं मी सागत नाही पण सिनेमा थिएटरमध्ये कोणी हातमोजे घालून बसत नाहा.'

तेव्हा वरदराजने हातमोजे काढले. त्याच्या दोन्ही हातावर ताबडेलाल डाग होते. 'सिट्रिक ॲसीड' तो म्हणाला 'माझ्या लॅबोरेटरीत माझ्या हातून एक बाटली फुटली. म्हणून मी हे हातमोजे घालतो.'

त्यावर कपूर लगेच काही बोलले नाहीत.

त्या तरुणाच्या डोळ्यात एकाएकी भीती दिसू लागली. तो थरथरत उभा राहिला व म्हणाला, 'तुम्हाला वाटत की...'

'होय. मला वाटल की आपल्या बोटाचे ठसे सुऱ्यावर राहू नयेत म्हणून तू ही दक्षता

घेतलीस. मला जसं वाटलं तसंच पोलिसांनाही वाटणार. तुझा संशय यायला ही गोष्ट जास्त कारणीभूत झालेली आहे.'

वरदराज जवळजवळ खलास झाला होता. त्याने फार मोठा प्रयत्न केला व मग ते हातमोजे घातले. गळलेल्या चेहऱ्यानं त्यानं डिटेक्टिव्ह कपूरकडे पाहिलं.

'मी–मी गुन्हेगार आहे असं तुम्हाला वाटतं, होय ना?' त्याने कपूरना विचारलं.

'मला तसं वाटलं तरी त्याने तुझं नुकसान होणार नाही.' शांतपणे कपूर म्हणाले, 'परिस्थितीजन्य पुराव्याच्या कितीतरी गोष्टी मला माहीत आहेत. मी आपलं मन स्वच्छ ठेवीन. मी तुला तसं वचन देतो. आता मघा तू जे सांगितलस त्या बाबतीत मी काही करणार नाही. तूपण त्या दृष्टीने काही हालचाल करू नकोस. तो सुरा ओळखण्यासाठी पोलीस कुणाला बोलावतील असं मला वाटत नाही. कदाचित् पोलीस तुलाच ते विचारतील आणि पोलिसानी तुला तस विचारलं तर तू खरं तेच सांग.'

'जर काही वाईट घडू लागलं तर तुम्ही मला मदत कराल?

'खात्रीने' कपूर त्याला आश्वासन देत म्हणाले, 'तुझा सध्याचा पत्ता मला देऊन ठेव. तसंच पूर्वी तू ज्या घरी रहात होतास तिथं आता जो कोणी रहावयास आला आहे त्याचाही पत्ता दे.'

तेव्हा वरदराजने कागद घेतला न त्यावर दोन्ही पत्ते लिहून तो कागद कपूरकडे दिला.

कपूरनी त्याला विचारलं, 'तू मघा म्हणालास की खून झालेल्या माणसाची–रूप किशोरची–तुला काही माहिती नाही, खरं ना?'

'खरं. मी त्याला यापूर्वी कधी पाहिलं नव्हत की त्याचं नावही ऐकलं नव्हतं.'

'त्याच्या बाजूला जी तीन माणसं होती, त्यांनाही तू ओळखीत नाहीस हे खरं?' डिटेक्टिव्हनी विचारलं.

'संपूर्ण खरं. माझ्या दृष्टीने सिनेमाला आलेली ती इतर माणसांसारखी माणसं होती. मी फार थकलेला होतो. मी त्या माणसाकडे फार पाहिलंही नाही.'

'दुसरं असं पहा' कपूर त्याला म्हणाले 'हा खून तुझ्या नजरेसमोर झालेला आहे. तो तू पाहिला नाहीस असं म्हणालास तर त्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही.'

'दुर्दैवाने खरं आहे.' तो तरुण म्हणला, 'पण मी खरंच सांगतो मी फार थकलेला होतो. वातावरणही कुंद होतं. त्यामुळे मला झुलकी लागली. सिनेमा सुरू होण्यापूर्वी मी दोन डुलक्या काढल्या आणि जेव्हा माझ्यासमोरचा मनुष्य किंचाळला तेव्हा मी त्या आवाजाने जागा झालो.'

'मी तुला काही प्रश्न विचारले तर त्याचा तुला राग यायचा नाही ना? नाहीतर पोलीस तुला हे प्रश्न विचारणारच.' कपूर म्हणाले तेव्हा तो थरथरू लागला.

'तुम्हाला आवश्यकता वाटत असेल तर विचारा. कारण तुम्ही काही पोलीस नाही. तेव्हा तुम्हाला खोटं उत्तर देण्याएवढा मी काही मूर्ख नाही.' तो तरुण कपूरना म्हणला.

'तुला एवढं कळतंय् ही आनंदाची गोष्ट आहे.' कपूर म्हणाले. 'उद्या तू किती वाजता येणार?'

'केव्हाही येईन. माझं माझ्या कामावर लक्ष लागत नाही. मी काहीच करू शकत नाही. मी नुसता बसून असतो आणि जेव्हा माझ्या दरवाजाची बेल वाजते तेव्हा मी भीतीने थरथरतो. टेलिफोनवर उत्तर द्यायलाही मी टरकतो.'

'एक लक्षात ठेव.' कपूर त्याला म्हणाले, 'सध्याच्या आमच्या पद्धतीप्रमाणे निर्दोषी




मनुष्य अगदी क्वचितच शिक्षेला जातो. तू हे पाठ कर. निर्दोषी मनुष्य कधीही फाशी जात नाही.'

'मी प्रयत्न करीन,' तो तरुण कसबस म्हणाला व दरवाजाकडे जावयास निघाला. 'साहेब भित्री भागूबाईसुद्धा माझ्यापेक्षा जास्त धैर्यवान असेल.' ¤

'साहेब, बाहेर वेटिंगरूममध्ये एक मनुष्य बसला आहे. त्याला तुम्हाला भेटायच आहे.' ऑफीस बॉय लक्ष्मणदास कपूरना म्हणाला. 'तो आणखी काहीतरी सागतो आहे पण मला ते काही कळल नाही. त्याच्याकडे कार्ड नाही.'

तेवढ्यात तो मनुष्य आत आला, तेव्हा डिटेक्टिव्ह कपूर त्याला म्हणाले, 'बन्वारीलाल मी आपणासाठी काय करू ?'

'म्हणजे मी कोण आहे हे आपण ओळखल तर!' बन्वारीलाल कपूरना म्हणाला, 'त्या दिवशी तुम्ही सिनेमाला आला होता. साहेब मला तुमचा सल्ला हवा आहे त्यासाठी मी किती फी देऊ ?'

'काही नको' कपूर त्याला म्हणाले. 'मलासुद्धा या केसमध्ये उत्सुकता आहे.'

'आणि त्या दिवसापासून आतापर्यंत मी एक दिडकीही कमावलेली नाही.'

'कारण ?'

'माझ्या दुकानावर कुणी यायलाच पहात नाही.' बन्वारीलाल म्हणाला, 'इकडची तिकडची पोर खिडकीच्या काचेतून माझ्याकडे पहातात, काहीतरी पुटपुटतात. 'तोच तो' अस त्याना म्हणताना मी कितीतरी वेळा ऐकलेल आहे, 'खून झाला त्याच्या शेजारी हाच होता.' ते म्हणातात. मग दुसरा कुणोतरी म्हणतो 'याचाच हात त्याच्या पाठीपर्यंत पोचला असणार. दुसऱ्या कुणाला ते शक्य होत ?' मग ते सारेजण दूर जातात आणि माझ्याकडे पहात रहातात. एखादा मनुष्य वेडा व्हायला हे एवढ पुरे नाही का ?'

'हे सहन करण कठीण आहे.' कपूर म्हणाले, 'तुम्ही सुरुवातीपासून सार नीटपणे सांगा पाहू. म्हणजे काही घोटाळा व्हायला नको. मला वाटत तुम्ही तो खून केलेला नाही, खर ना!'

तिथं क्षणभर शातता होती. बन्वारीलालच्या चेहऱ्यावर थोडी मुरड पडली. तो दिसायला कुरूप होता.

'मी त्याला ठार मारल का?...कपूरसाहेब मी इथ प्रश्नाचो उत्तर द्यायला आलेलो नाही.'

''ठीक आहे. काही हरकत नाही. मग आपणाला काय हव आहे? डिटेक्टिव्हनी त्याला विचारले.

वॉचमेकर बन्वारीलाल म्हणाला 'या केसचे कागद मी वाचीत होतो. आम्हा तिघांपैकी कुणीतरी एकजण खुनी आहेच असा पोलिसानी पक्का ग्रह करून घेतलेला आहे. एक मो, दुसरा खून झालेल्या माणसाच्या मागे बसलेला व हातमोजे घातलेला मनुष्य, आणि तिसरा खून झालेल्याच्या पलोकडे बसलेला त्याचा भागीदार. आता खून करायला उद्देश काय एवढंच पोलिसाना शोधून काढायच आहे......डिटेक्टीव्हसाहेब आता मी आपणाला एक प्रश्न विचारतो. आपण त्याच उत्तर दिलत तर फार आभार होतील. समजा माझी व या रूपकिशोरची जुनी ओळख आहे, त्यावेळी त्याच व माझ काही कारणाने बिनसल आणि त्याने काहीना काही करून मला तुरुगात पाठवल—हे सार समजा ह—म्हणून मग योग्य असो की अयोग्य असो मला त्याचा सूड उगवायचा आहे आणि समजा पोलिसाना हे कळल तर मग माझ काय होईल ?

'आता तू जे सांगितलस ते सारं पोलिसांना कळल तर तुझ्यावर सक्त नजर ठेवण्यात येईल' डिटेक्टिव्ह कपूर त्याला म्हणाले. 'व मग काहीना काही परिस्थितीजन्य पुरावा मिळविण्याचा प्रयत्न होईल. तो सुरा, किंवा तू धमकी दिली असशील तर ता किंवा तसच इतर काही. आणि पोलिसांना अस काही मिळालं तर ते नक्की तुला पकडतील व तुझ्यावर खुनाचा आरोप ठेवून केस सुरू होईल.'

हे ऐकून बन्वारीलालला काही फारस बरं वाटल नाही तो खुर्चीत चुळबूळ करीत बसला होता 'त्या सिनेमाला जायची मला काय दुर्बुद्धी सुचली!' तो पुटपुटला. सिनेमाला गेलो आणि बसलो तोही त्याच्या शेजारी...'

कपूर त्याला म्हणाले 'मी तुला काही उपदेश करतो आणि तोही पैसे न घेता. तुझा जो व्यवसाय आहे तो तू करीत रहा' जर तू बावरल्यासारखा दिसलास तर पोलीस ते न्याहळतील व खणावयास सुरुवात करतील. जर तुझ्यामध्ये व रूपकिशोरमधे भूतकाळामधे काही गोष्टी घडल्या असतील तर पोलीस त्या शोधण्याच्या मागे लागतील. मला वाटते यावेळी सुद्धा पोलीस तुझ्या मागावर असतील'

बन्वारीलालने आपली हॅट उचलली. 'शक्य आहे' तो म्हणाला. मला घरी बसलं पाहिजे उपाशी राहिल पाहिजे व शेवटी फाशी गेलं पाहिजे ..तुमच्या उपदेशाचा काही उपयोग होईल अस मला वाटत नाही.'

'त्याबद्दल तुला काही द्याव लागलेल नाही.' ¤

पोलिसानी आपल्या नेहमीच्या पद्धतीने वागायच काही काळ तरी सोडलं असावं ह्याविषयाची गरमागरम चर्चा शहरात चालू होती. पोलीस स्टेशनकडे लोकाचे डोळे लागून राहिले होते. आज काय नवीन बातमी? त्यासाठी लोक पोलीस स्टेशनकडे चक्कर मारीत. कोणी सब्‌इन्स्पेक्टर्सना चाचपून पाही, कुणी इन्स्पेक्टरपर्यंत पोचे, आणि एखाद दुसऱ्यान पोलीस सुपरिटेंडेंटपर्यंत मजल मारली होती.

डिटेक्टिव्ह लक्ष्मणदास कपूरना पोलीस स्टेशनचे दरवाजे सदैव मुक्त असत. पोलीस सुपरिटेंडेंट ओंकारनाथ टंडन यांना कपूराच्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल आदर होता.

पोलीस सुपरिटेंडेंट कामात व्यग्र असताना डिटेक्टिव्ह कपूर आले, 'हॅलो कपूर, आलात? रूपकिशोर खुनासंबधी का?'

कपूरनी मान हलविली. 'टंडनसाहेब या केसमधला गुन्हेगार कोण याचा जर मला माझ्या आयुष्यभर सुगावा लागला नाही तर मग हा पेशा करण्यापेक्षा मी हमाली करीन.'

'लक्ष्मणदास काळजी करू नका.' टंडन म्हणाले. 'आम्ही काही स्वस्थ बसणार नाही. पण इथे खुनाच्या उद्देशाचाच पत्ता नाही. जोपर्यंत तो उद्देश सापडत नाही तोपर्यंत—' एवढ्यात टेलिफोन वाजला. वाक्य अर्धं सोडून टंडननी टेलिफोन घेतला. त्यानी क्षणभर फोनवरच बोलणं ऐकलं व मग म्हणाले, 'तिला इकडे येऊ द्या.'

मग त्यानी रिसीव्हर खाली ठेवला व कपूरकडे पाहिलं. 'या खुनाच्या केसमध्ये काहीतरी गूढ आहे हे तुमच म्हणणं मला पटतं 'कपूर' टंडन म्हणाले 'आता इथं ही बाई येते आहे. काय बरं तिच नाव?— हा सौ. राधा मोहन. तिला मला भेटायचं आहे. तिला भेटायला मी तसा उत्सूक नाही. तिच्या नवऱ्याविरुद्ध साक्ष दे अस काही आपण तिला सांगू शकत नाही.'

मग ते झटकन् आपल्या सेक्रेटरीकडे वळले व म्हणाले, 'त्या पडद्यामागे जा. आणि ही बाई जे काही सांगेल ते टिपून घे. कपूर तुम्ही जाऊ नका. त्या इन्स्पेक्टर्स चेंबरमध्ये बसा क्षणभर तुम्ही आमचे स्टाफ आहात अस समजा.' त्याप्रमाणे इन्स्पेक्टरच्या खुर्चीत कपूर बसले.

दरवाजा उघडला तेव्हा प्रथम सुवासाचा भपका व नतर सौ. राधामोहन आली. टडन उठून उभे राहिले व म्हणाले, 'गुड आफ्टरनून मदाम. आपण या खुर्चीवर बसता का? बोला मी आपली काय सेवा करू.?'

'आपणच पोलीस सुपरिटेंटेट का?' तिने विचारल.

'होय—'

'त्या भयंकर रात्री रूपकिशोरच्या पलीकडे एक खुर्ची सोडून मी बसले होते. रूपकिशोरचा खून कोणी केला ते मी तुम्हाला सांगायला आले आहे.' मग तिथे क्षणभर शातता होती. कपूरनी आपल्या खुर्चीचे हात घट्ट पकडले. पोलीस सुपरिटेंडेट पुढे झुकले.

'बाईसाहेब' ते म्हणाले 'तुम्ही बोलण्यापूर्वी पूर्ण विचार करा. कारण हा फार गभीर मामला आहे'

'मी मूर्ख नाही.' ती म्हणाली व आपली बॅग उघडून एक पत्र काढल व म्हणाली, 'हे वाचा. मोठ्याने वाचा म्हणजे मग त्या दुसऱ्या व्यक्तीलाही कळेल.'

टडननी ते पत्र सावकाशपणे वाचल व पडद्याआड बसलेल्या सेक्रेटरीच्या दिशेनं पाहिलं.

माझ्या लाडक्या प्रिये,

हा वेडेपणा आता पुष्कळ झाला. आता तुला हे कळलं पाहिजे. पुढच्या आठवड्यात मी परदेशी जात आहे. आपण दोघानी पुष्कळ काळ एकत्र मजा केली. तू व राधामोहन सुखात रहा. जर माझं काही बरं वाईट झालं तर माझे विम्याचे दहा हजार रुपये तुला मिळतील. मी राधामोहनला वचन दिलं आहे की आज रात्री शेवटचं एकत्र जेवण घेऊ या व मग सिनेमाला जाऊ या आपण तिघही. मी परदेशातून तुला पत्र लिहीन. आपण मित्र म्हणूनच विभक्त होऊ या.

तुझाच
रूपकिशोर

टडननी पत्र वाचून सपवल व वर पाहिलं. तिच्याकडे. तिनं त्याच्या चौकस नजरेकडे पाहिल. म्हणाली, 'होय' एखाद्या स्त्रीचा सहा वर्षं प्रेयसी म्हणून उपयोग करून मग एखादा पुरुष तिला असा धुडकावून लावू पहातो. आता रूपकिशोरचा खून कोणी केला हे समजावून घ्यायच असेल. सुपरिटेंड साहेब तर तो खून मी केला'

डिटेक्टिव्ह कपूरची अपेक्षा, पोलीस सुपरिटेंडेट याचा अदाज हे सारे या कबुलीजबावाने कोसळून पडले ते दोघेही आश्चर्यचकीत झाले. तिचा हा कबुलीजबाब खरा नसावा अशी टडनना शका आली. ते तिला म्हणाले, 'बाईसाहेब तुम्ही आता जे काही सागितलत ते अशक्य आहे'

तेव्हा तिन हसून विचारल, 'का?'

'पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही रूपकिशोरच्या बाजूला बसला नव्हता. दुसरी गोष्ट म्हणजे निश्चित अमक्या जागी सुरा खुपसला तर माणसाला तत्काळ मृत्यू येईल हे कळायला सर्जनच हवा. तिसरी गोष्ट म्हणजे तो सुरा इतक्या जोरान खुपसायला पुरुषाचीच ताकद हवी.

'आता मी काय उत्तर देते ते नीट ऐका. पहिली गोष्ट म्हणजे माझा पती हा बारीक व सडपातळ मनुष्य आहे. त्यामुळे मी व रूपकिशोर याच्यामध्ये तस फारस अतर नव्हत. व माझा उद्देश साधायला काही अडचण आली नाही. आणि तिने आपल्या अंगावरचा कोट काढून स्वतःचा धष्टपुष्ट हात बाहेर काढला, व टडनची खात्री पटवली. आपला हात तिनं हसत हसत सरळ केला. तो पुरुषाच्या हातासारखा लाब होता. 'सिनेमामध्ये माझा हात मी माझ्या पतीच्या गळ्याभोवती टाकला होता. माझी इच्छा असती तर मी माझा हात रूपकिशोरच्या गळ्याभोवती टाकू शकले असते. तुमच्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर तुम्हाला मिळालं. आता दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर द्यायच — साहेब मी क्वालिफाईड नर्स आहे. एखाद्या सर्जनइतकं माझं ॲनाटमीचं ज्ञान आहे. आता तिसऱ्या प्रश्नाचं उत्तर अस— मला एक चाकू द्या. मी तो चाकू तुमच्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये सहजरित्या खुपशीन. किंवा तुमचा हात द्या. तुम्ही सागाल तर चाकू मारून मी तो सहज मोडीन.'

'आणि चाकू? टडननी विचारलं.

'एका सेकंडहॅंड दुकानात मी तो विकत घेतला. कुणीतरी जागा बदलताना तिथेच विसरलेला तो चाकू होता. रात्री सिनेमाला येताना तो चाकू मी हेतुपुरस्सर बरोबर घेतला; आणि मला जे करायचं ते केल. माझ्या अपेक्षेपेक्षाही ते करण सोप होतं. रूपकिशोरच्या मागच्या सीटवरचा हातमोजे घातलेला मनुष्य चक्क झोपलेला होता. तेव्हा माझं हे कृत्य कोणी पाहिलेल नाही.'

कपूर टडनकडे हेतुपुरस्सर पहात होते. टडननी तिला विचारल, 'तुमची ही कैफीयत खरी मानून चालू ना? कारण रूपकिशोरचा खून झालेला आहे.'

'मग मी इथं कशासाठी आले आहे?'

'तुमचा सशय कुणालाच आला नव्हता. बर तुम्ही ही कैफीयत द्यायला इथ आलात ते कसं काय?'

'माझा पती वेडा होऊ नये म्हणून.' ती म्हणाली, 'सशयाची तलवार त्याच्या मानेवर टांगती आहे. व त्यामुळे तो अर्धमेला झाला आहे. शिवाय रूपकिशोरचा दहा हजाराचा विमा उतरवलेला आहे व ते पैसे आम्हाला मिळणार आहेत. शिवाय तो रूपकिशोरच्या शेजारी बसलेला होता. या साऱ्यामुळे तो पार कातावून गेलेला आहे. या साऱ्यातून त्याची सुटका व्हावी म्हणून मी ही कैफीयत देत आहे. शिवाय मी काही एकनिष्ठ पत्नी नाही, म्हणून—'

'बाई, आता मला तुम्हाला पकडाव लागेल. व रात्रभर तुम्हाला पोलीस कोठडीत रहावं लागेल. उद्या तुम्हाला मॅजिस्ट्रेटपुढे उभं करण्यात येईल.' आणि टंडननी बेल दाबली.

'थाबा. माझ्यासाठी बेल दावू नका. फार तर बेल वाजवून तुम्ही डॉक्टराना बोलवा. काय काय घडेल याची मला पूर्ण कल्पना होती. मी आता फार तर अर्ध्या तासाची सोबतीण आहे. माझ सागणं सपल...'

आणि तिचं डोक खुर्चीच्या मागच्या बाजूला कलडलं. तिचा चेहरा काळानिळा होत होता. डिटेक्टिव्ह कपूर व सुपरिटेंडेंट टडन यांनी ते पाहिल. डॉक्टर येण्यापूर्वीच ती बेशुद्ध पडली व डॉक्टरी तपासणी सरण्यापूर्वीच तिनं या जगाचा निरोप घेतला. पडद्यामागे सुपरिटेंडेंटचा सेक्रेटरी सारं काही लिहून घेत होता! □ □

# तालुका शिरूर

पृष्ठ १५ वरून

| तपशील | सामु. विहिरी | पैकी पाणी लागलेल्या | पाणी न लागलेल्या |
|---|---|---|---|
| मे १९७३ मध्ये | ७ | ३ | ४ |
| जून १९७३ „ | ६ | ३ | ३ |
| जुलै १९७३ „ | १३ | ५ | ८ |
| ऑगस्ट १९७३ „ | ७ | ७ | – |
| सप्टेंबर १९७३ „ | ३२ | १२ | २० |
| माहिती मिळाली नाही. | १ | ० | १ |
| एकूण | ६६ | ३० | ३६ |

१९७३–७४ सालात खरीप हंगामात चागला पाऊस झाल्यामुळे दुष्काळ सपला. तेव्हा महाराष्ट्र शासनाने खरीप भागातील दुष्काळी कामे सप्टेंबर १९७३ अखेर आणि रब्बी भागातील दुष्काळी कामे डिसेंबर १९७३ अखेर बद करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शिरूर तालुका खरीप भागात असल्यामुळे पाहाणीच्या गावातील निम्म्या सामुदायिक विहिरीची कामे सप्टेंबर १९७३ अखेर बद झाली. बाकीच्या विहिरीची कामे तत्पूर्वीच बंद झालेली होती. ही कामे बद का पडली होती याची निश्चित कारणे कळू शकली नाहीत. तसेच ज्या सामुदायिक विहिरीना पाणी लागले नाही अशा ३६ विहिरीपैकी १५ विहिरी, सप्टेंबर १९७३ पूर्वी बंद पडल्या आहेत. त्या का बद ठेवल्या होत्या त्यांचीही कारणे कळू शकली नाहीत.

या झालेल्या सामुदायिक विहिरी ज्या खातेदारांच्या शेतात खणल्या आहेत त्या खातेदारांना त्या गावी असणाऱ्या मालकीच्या जमिनीवरून वर्गीकरण केले असता पुढीलप्रमाणे होते. तुलनेसाठी पाहाणीच्या सर्व गावामध्ये असणाऱ्या एकूण खातेदाराची टक्केवारी दिली आहे.

मालकीच्या जमिनीप्रमाणे वर्गीकरण :

| मालकीच्या जमिनीचा गट | सामु. विहिरी ज्याचे शेतात खणल्या आहेत त्यांची सख्या | शेकडा प्रमाण | पाहाणीच्या गावातील खातेदारांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ १० एकराचे आतील | ५ | ७॥ | ५९ |
| २ १० ते २४ एकराचे | १८ | २७ | २९ |
| ३ २५ ते ४९ एकराचे | १७ | २६ | १० |
| ४ ५० एकराचे वरील | ५ | ७॥ | २ |
| ५ क्षेत्र माहीत नाही | ४ | ६ | |
| ६ सरकारी अगर सामु. जागेत | १७ | २६ | |
| एकूण | ६६ | १०० | १०० |

या आकडेवारीवरून असे दिसून येते की, लहान खातेदारांची सख्या ५९ टक्के असता त्याना ७॥ टक्के विहिरी मिळाल्या आहेत. या उलट २५ एकराचे वर जमीन असणाऱ्या मोठ्या खातेदारांची सख्या १२ टक्के असताना, त्यांना ३३ टक्के सामुदायिक विहिरी मिळाल्या आहेत. तर १० ते २४ एकर जमीन असणाऱ्या मध्यम खातेदारांना त्यांच्या प्रमाणात विहिरी मिळाल्या आहेत. या मोठ्या व मध्यम खातेदाराच्या आसपास लहान खातेदार असण्याची शक्यता आहे व त्यांना सामु. विहिरीचा फायदा होणे शक्य आहे. या उलट सामुदायिक विहीर खणलेल्या लहान खातेदाराच्या शेताजवळ मोठे व मध्यम खातेदार असण्याची शक्यता असून त्यानाही या विहिरीचा फायदा मिळणे शक्य आहे. तूर्त या सबधी अधिक सागता येत नाही. कारण सामुदायिक विहिरीचा वापर सुरू नाही. या कारणाने ही सामुदायिक विहिरीची योजना लहान व मध्यम शेतकऱ्यासाठी की मोठ्या शेतकऱ्यासाठी आहे हे स्पष्ट होत नाही.

ज्यांना १२ एकरापेक्षा अधिक जमीन नसेल अशा खातेदारांच्या शेतात सामुदायिक विहिर खणावयाची हे बंधन बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामधील काही ग्रामपचायतीनी स्वत.वर लादून घेतल्याचे कळते. पण तसा सरकारी आदेश नसावा. तसा आदेश असता तर मध्यम व मोठ्या खातेदाराच्या शेतामध्ये अधिक प्रमाणात सामु. विहिरी दिसल्या नसत्या. यामुळेच सामुदायिक विहिरीचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांना, स्थानिक पदाधिकाऱ्यांना होणार आहे असे दिसते.

## विहिरीसाठी झालेला खर्च

शिरूर तालुक्यात सुरू करण्यात आलेल्या ३६७ सामुदायिक विहिरीसाठी शासनाने ८२६०१८ रुपये खर्च केलेले आहेत. यावरून सरासरीने प्रत्येक विहिरीसाठी २२५१ रुपये खर्च झालेले आहेत. तर पाहाणी केलेल्या १३ गावातील ६६ सामुदायिक विहिरीपैकी ४७ सामुदायिक विहिरीचे खर्चाचे आकडे मिळाले असून तो खर्च १३५१८४ रुपये आहे. यावरून या गावातील सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च २८७६ रुपये आलेला आहे. तर पुणे जिल्ह्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ३४०५ रुपये आहे.

इतर जिल्ह्यापैकी बीड जिल्ह्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ५५२८ रुपये आहे. नगर जिल्ह्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ३९९० रुपये आहे. तर औरंगाबाद जिल्ह्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ४६८७ रुपये आहे. तालुक्यातून आलेल्या माहिती वरून औरगाबाद जिल्ह्यांतील वैजापूर तालुक्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ४६०५ रुपये आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील पराडा तालुक्याचा सामुदायिक विहिरीचा सरासरी खर्च ८४४४ रुपये आहे.

यावरून महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या ५६६८० सामुदायिक विहिरी खणल्या गेल्या आहेत, त्यासाठी शासनाचा (सरासरी खर्च ४००० ते ४५०० रुपये धरल्यास) २२ ते २५ कोटी रुपये खर्च झाला असावा. म्हणजेच महाराष्ट्र शासनाने ऐकूण दुष्काळासाठी म्हणून जी रक्कम खर्च केली त्याचे १० टक्के रक्कम सामुदायिक विहिरीवर खर्च झाली असावी.

शिरूर तालूक्यातील ज्या १३ गावी सामुदायिक विहिरीसबधीची

पाहाणी केली, त्या गावी ६६ सामुदायिक विहिरी खोदण्यात आल्या आहेत. या ६६ विहिरीपैकी ४७ विहिरीचे खर्चाचे आकडे मिळू शकले. बाकीच्या विहिरी ज्या ग्रामसेवकाच्या देखरेखीखाली होत्या, त्यांची भेट न झाल्यामुळे त्या विहिरीचे खर्चाचे आकडे मिळू शकले नाहीत. ज्या विहिरीच्या खर्चाचे आकडे मिळू शकले त्या विहिरीना आलेल्या खर्चावरून वर्गीकरण पुढीलप्रमाणे :

| विहिरीच्या खणतीसाठी आलेल्या खर्चाची गटवारी | एकूण विहिरीची सख्या | प्रत्यक्षात झालेला खर्च रु. | पैकी प्रमाणपत्र मिळालेल्या विहिरी | प्रमाणपत्र मिळालेल्या विहिरीचा खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| ५०० रु. पर्यंत | ४ | १५२३ | – | – |
| ५०१ ते १००० रु. पर्यंत | १२ | ८१२१ | – | – |
| – १५०० रु. पर्यंत | ३ | ३९६० | – | – |
| – २००० रु पर्यंत | ५ | ९८८० | – | – |
| – २५०० रु. पर्यंत | ५ | ११५६२ | १ | २३१५ |
| – ३००० रु. पर्यंत | ३ | ८७५९ | – | – |
| – ४००० रु पर्यंत | ५ | १६५८३ | १ | ३५०० |
| – ५००० रु पर्यंत | ३ | १३८६९ | १ | ४७४० |
| – ७५०० रु. पर्यंत | २ | १३३५६ | १ | ६०७१ |
| – १०००० रु पर्यंत | ३ | २६३३६ | १ | ८६०२ |
| – १०००१ रु चे वर | २ | २१२३५ | २ | २१२३५ |
| एकूण | ४७ | १३५१७४ | ७ | ४६४६३ |

सामुदायिक विहिरीसाठी झालेल्या खर्चाच्या आकड्याकडे पाहाला जास्तीत जास्त १०,८१८ रुपये व कमीत कमी २७५ रुपये एका विहिरीसाठी खणतीचा खर्च आलेला आहे. ज्या ४७ सामुदायिक विहिरीचे खर्चाचे आकडे मिळाले आहेत. त्या विहिरीपैकी ७ विहिरी, भूजल सर्वेक्षण व विकास यत्रणा खात्याच्या दृष्टीने यशस्वी विहिरी आहेत आणि त्यावर ४६४६३ रुपये खर्च झालेला आहे. यावरून सामुदायिक, विहिरीवर झालेल्या खर्चाच्या १–३ खर्च 'उपयोगी खर्च' म्हणता येण्यासारखा आहे बाकीचा खर्च उपयोगी की निरुपयोगी हे शासनाचे पुढील धोरणावर अवलबून आहे. जर शासनाने सुरू केलेली सामुदायिक विहिरीची सर्व कामे पुरी केली तर खर्च उपयोगी होणार आहे आणि कामे पुरी केली नाहीत तर विहिरीसाठी पाडलेले खड्डे पावसाळ्यात पाण्याबरोबर माती येऊन बुजून जातील आणि झालेला खर्च निरुपयोगी होईल. म्हणजे केवळ दुष्काळाचे काळामध्ये लोकांना रोजगार मिळाला एवढाच या योजनेचा फायदा झाला असा त्याचा अर्थ होईल

सप्टेंबर १९७३ पासून सर्वच सामुदायिक विहिरीची खणतीची कामे बंद आहेत. यातील काही विहिरीची कामे येत्या उन्हाळ्यात पुन्हा सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे असे कळते.

## भिजलेले क्षेत्र

पाहाणी केलेल्या १३ गावातील, पाणी लागलेल्या ३० विहिरीपैकी १२ विहिरीतील पाण्याने सुमारे ८४ एकर क्षेत्र १९७३–७४ च्या रब्बी हगामात भिजविले गेले. या १२ विहिरीपैकी ६ विहिरी प्रमाणपत्रे मिळालेल्या, ११ विहिरीपैकी असून, या विहिरीवर १० खातेदारांना आपली २५ एकर जमीन भिजविली. बाकीच्या ६ विहिरी प्रमाणपत्र न मिळालेल्या १९ विहिरीपैकी असून त्या विहिरीत असलेल्या पाण्याने २६ लोकानी ५९ एकर क्षेत्र भिजविले.

या जमीन भिजविण्यासाठी शेतकऱ्यांना स्वतःची अगर भाड्याची ऑईल इंजिने वापरावी लागली. सर्वसाधारणपणे हे शेतकरी बऱ्यापैकी आहेत. ज्यानी या सामुदायिक विहिरीचा फायदा घेतला आहे, त्यांनी ज्वारी, गहू, हरभरा, मिरची, भाजीपाला असली पिके घेतलेली आढळून आली. या सामुदायिक विहिरीतील पाण्याचा उपयोग आणखीही काही लोकांना करून घेता आला असता, पण ते त्याना शक्य झाले नसावे.

खणती झालेल्या सामुदायिक विहिरीपैकी बहुतेक सर्वच विहिरी (पाणी लागलेल्या विहिरीसह) आणखी खाली खोदाव्या लागणार आहेत. तसेच या विहिरीची आवश्यक तेवढी बाधकामेही करावी लागतील. यानतर पाणी वर उपसण्यासाठी ऑईल इंजिने अगर वीज मोटारीची तरतूद करावी लागेल. यासाठी शासनाची सूचना अशी की, सामुदायिक विहिरीने ज्याच्या जमिनी भिजू शकत असतील अशा खातेदाराची, एका विहिरीसाठी एका सहकारी सोसायटी निर्माण करावी व अशा सहकारी सोसायटी मार्फत वरील कामाच्या खर्चासाठी कर्जाची मागणी करावी आणि राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकानी ही कर्जाची मागणी पुरी करावी. अशा प्रकारे हा सामुदायिक विहिरीचा प्रश्न राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकाकडे सोपविण्याचा शासनाचा विचार आहे.

या दृष्टीने शिरूर तालुक्यात महाराष्ट्र बँकेने सामुदायिक विहिरीची पाहाणी करण्याचे काम सुरू केल्याचे कळते. पण यातही अडचणी निर्माण होणार आहेत. पहिली मुख्य अडचण बँकेकडे द्यावयाच्या तारणाची येणार आहे. सामुदायिक कार्यासाठी कोणीही शेतकरी आपली जमीन तारण देण्यास तयार नाही तसेच बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनी को-ऑप. क्रेडिट सोसायटी, भू–विकास बँक, सरकारी तगाई व राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका यापैकी कोठे तरी पूर्वीच तारण दिलेल्या आहेत. आता तारण देण्यास जमिनी शिल्लक राहिलेल्या नाहीत. यावर शासनाचे म्हणणे असे की, राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकानी सामुदायिक विहिरीच्या झालेल्या खोद कामाच्या तारणावर कर्जे देऊन, पुढील सर्व जबाबदारी घ्यावी. अशा प्रकारे हा प्रश्न तूर्त तरी विचाराधीन आहे.

या पाहाणीच्या कामाच्या निमित्ताने गावोगाव फिरत असता, काही ठिकाणी सांगण्यात आलेल्या तक्रारी पुढीलप्रमाणे :

१ : कामावरील मजुराची हजेरीपत्रके भरताना कामावर नसणाऱ्या काही व्यक्तीची हजेरी लावण्यात येत होती. यामुळे प्रत्यक्ष काम करणारांना कमी दराने मजुरी मिळत होती.

२ : मजुरीचे वाटप करताना, मजुराच्या हातात पैसे कमी देण्यात येत होते.

३ : सामुदायिक विहिरीची कामे सप्टेंबर १९७३ अखेर बद झाली. पण मजुरांची शेवटच्या हप्त्याची मजुरी – डिसेंबर १९७३ अखेरही देण्यात आली नव्हती

४ : सामुदायिक विहिरीतील खडक खोदाईकरिता लागणारी

दारू-बत्ती घेण्यासाठी स्वतंत्र रक्कम मिळत असे. ही रक्कम गरज नसताही काही ठिकाणी खर्च पडली आहे.

अशा प्रकारच्या लबाड्या किंवा पैशाची उधळपट्टी झाल्याचे ऐकू येत असले तरी हे शोधून काढणे अवघड आहे. कारण लबाडी करणाराने ती व्यवस्थीत केली असणार. तरीपण सामुदायिक विहिरीचे झालेले काम, त्यासाठी दिलेला दर व विहिरीसाठी झालेला खर्च याचा मेळ कितपत बसतो हे एकाद्या एंजिनिअरामार्फत पहाता येण्यासारखा विषय आहे. तूर्त एवढे म्हणता येईल की, या बाबतीत शासनाकडून देखरेख ठेवण्यास समाधानकारक व्यवस्था झाली नाही.

याचबरोबर सामुदायिक विहिरीचा फायदा कोणास होणार आहे हे पाहिले गेले नाही. यामुळे शासकीय इतर योजनेप्रमाणे याही योजनेचा फायदा काही निवडक लोकांनाच होणार आहे.

या सामुदायिक विहिरीच्या निमित्ताने निर्माण होणारे काही प्रश्न पुढीलप्रमाणे राहतील :

१ : या विहिरीचे पाणी कोणी किती वापरावयाचे हे ठरवून द्यावे लागेल. आज खेडे गावातून सामाजिक मालकीच्या जुन्या विहिरी आहेत. त्या ठिकाणी विहिरीच्या वापरावरून भांडणे, मारामाऱ्या कोर्टकचेऱ्या होतात हे शासनास माहीत आहे. मग ही तर सरकारी मदतीची सामुदायिक विहीर. तिच्यावर आडदाड, बलदड व पुढारी मंडळीचा हक्क अधिक राहाणार. यासाठी विहिरीच्या वापराबद्दल काही नियम ठरवून द्यावे लागतील.

२ : यानतर विहिरीवर कोणती पिके, किती क्षेत्रावर काढावयाची, यात अन्नधान्यांची पिके किती क्षेत्रावर व नगदी पिके किती क्षेत्रावर, तसेच जास्त मुदतीची किती क्षेत्रावर व अल्प मुदतीची किती क्षेत्रावर काढावयाची हे ठरवून द्यावे लागेल.

३ : तसेच पाण्याचे पाट काढण्यावरून शेतकऱ्यात वाद होतील. त्याची तरतूद करावी लागणार आहे.

४ : विहिरीच्या दुरुस्तीची, ऑईल इंजिनाच्या किंवा वीज मोटारीच्या दुरुस्तीची, नेहमीचा पाट दुरुस्तीची कामे करावयाची हे ठरवून द्यावे लागेल.

५ : बँकेच्या कर्जफेडीची तरतूद करण्यासाठी नियम करावे लागतील. ही कर्जफेड भिजलेल्या क्षेत्रावर की केलेल्या पिकावर वसूल करावयाची हे ठरवावे लागेल.

६ : वीज मोटारीचे कोणी किती युनिट वापरले याची नोद ठेवून त्याप्रमाणे विजेच्या बिलाची मागणी करावी लागेल. आणि वीज बिल वेळेवर भरावे लागेल.

ही सर्व व्यवस्था, निर्माण करण्यात येणाऱ्या सहकारी सोसायटीच्या सेक्रेटरीकडे सोपवावी लागणार आहे. मात्र या सेक्रेटरीवर राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकेची देखरेख असावी किंवा तो बँकेचाच नोकर असावा की ज्यामुळे तो बँकेच्या अधिकारात राहील व त्यावर स्थानिक लोकांचा दबाव येणार नाही याचा विचार करावा लागेल.

या सर्व प्रश्नांचा शासनास विचार करून जरूर तर सामुदायिक विहिरीसाठी एकादा कायदा करावा लागेल असे वाटते. □ □

---

दर्डा प्रकरण : प्रहार क्र. ४

# चौकशीची न्यारी तऱ्हा

यवतमाळ येथील आदर्श गृह निर्माण सहकारी सस्थेच्या सपूर्ण कारभाराची सहकारी कायद्याच्या कलम ८३ खाली चौकशी करण्याची सस्थेच्या चोवीस सदस्यानी केलेली मागणी मजूर झाली तेव्हाच ही चौकशी कितपत नि:पक्षपातीपणे केली जाईल याबाबत अनेकानी सशय व्यक्त केला होता. मला स्वत:लाही तसा सशय थोडाफार येत होताच. नाही असे नाही. पण तसा उल्लेख कधीच नि कोठेच मी केला नाही. उलट चौकशीची मागणी करणाऱ्या चोवीस सदस्यांपैकी मीही एक असल्यामुळे चौकशी विनाविलंब व नि:पक्षपातीपणे कशी पार पडेल या दृष्टीनेच चौकशी अधिकाऱ्यांबद्दल कोणत्याही प्रकारचा पुर्वग्रह दूषीत दृष्टिकोन न ठेवता त्याचेशी सपूर्ण सहकार्य करण्याचेच धोरण मी सुरुवातीपासून ठेवले. एवढेच नव्हे तर इतर सदस्यानासुद्धा तसे करण्यास प्रवृत्त केले. पण चौकशी सुरू झाल्यानंतर लौकरच माझा आणि माझ्याबरोबरच इतरांचाही भ्रमनिरास व्हावयास सुरुवात झाली. आता चौकशी सपली आहे. चौकशी अधिकाऱ्याचा रिपोर्ट सहकार विभागाकडे आला आहे. कदाचित त्याची प्रत माझ्या हाती एक दोन दिवसात पडेलही. त्यात काय असेल याबद्दल आज तरी मी सपूर्णपणे अधारात आहे. परतु चौकशी चालू असतानाचे सपूर्ण चित्र जनतेसाठी उभे करण्यात जर मी यशस्वी झालो तर तो रिपोर्ट कसा असेल याचा अदाज बसल्या जागेवरूनही कोणी करू शकेल. ते चित्र रेखाटण्यासाठीच या लेखाचा प्रपंच आहे.

चौकशी अधिकारी अॅडव्होकेट श्री. गुलाबराव बारई यांनी प्रत्यक्ष चौकशीला यवतमाळ येथे २८ जानेवारी, १९७४ रोजी सुरुवात केली. चौकशीचे हे काम सलगपणे चार दिवस चालले. व या काळात संपूर्ण साक्षीपुरावा नोदला गेला. सहकारी कायद्याच्या कलम ८३ खाली सुरू झालेली ही चोकशी नियमानुसार न चालता विशिष्ट पूर्व नियोजित दिशेनेच चालवून पूर्ण करण्यात आली. हे खालील उदाहरणावरून पुरेसे स्पष्ट होऊ शकेल.

१ : आदर्श गृह निर्माण सहकारी सस्थेच्या सदस्यांनी ही चौकशी चालू असताना आपल्या वकिलांना हजर राहू दिले जावे अशी केलेली मागणी कारण न दाखविता चौकशी अधिकाऱ्यांनी फेटाळून लावली.

२ : साक्षीदारांची उलट तपासणी घेण्याची सधी अर्जदाराना नाकारण्यात आली.

३ : साक्षीची नोंदणी चौकशी अधिकाऱ्यांनी इंग्रजी भाषेतच केली. नोंदलेली साक्ष आम्हाला वाचून दाखवावी अशी साक्षीदारांनी केलेली मागणी विचारात न घेता फेटाळली गेली. त्यामुळे चिडून जाऊन काही साक्षीदारानी (उदा. श्री. वालजी धरमसी) साक्षीपत्रावर सही न करताच ते परत केले. याबद्दलची लेखी तक्रारही चौकशी अधिकाऱ्यांकडे लगोलग करण्यात आली. पण तोंडी वा लेखी कोणत्याही तक्रारी विचारात घेण्याची आवश्यकता चौकशी अधिकाऱ्याना वाटली नाही.

४ : अर्जदाराने केलेले आरोप सिद्ध करण्याच्या दृष्टीने मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ, कार्यपालन यंत्री, बांधकाम विभाग, नझुल अधिकारी, असिस्टंट रजिस्ट्रार, स्पेशल ऑडिटर, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, टाऊन प्लॅनिंग ऑफिसर, कमिशनर, विदर्भ हाऊसिंग बोर्ड, वगैरे अधिकाऱ्यांच्या साक्षी मोलाच्या ठरल्या असत्या. पण यापैकी कोणालाही बोलविण्याची चौकशी अधिकाऱ्यांनी परवानगी दिली नाही. यामुळे चौकशीतील हवाच एकदम काढून टाकली गेली.

५ : ज्या श्री. दर्डांचेविरुद्ध या संपूर्ण चौकशीचा रोख होता त्या श्री. दर्डा याना संपूर्ण चौकशीचे काळात चौकशी अधिकाऱ्याचे शेजारील कोचावर मानाची जागा दिली गेली होती. साहाजिकच त्यामुळे साक्षीदारांवर मानसिक दडपण आले आणि अनेक साक्षीदार वेळेवर घाबरून गेल्यामुळे बरोबर साक्ष देऊ शकले नाहीत.

६ . आदर्श गृह निर्माण सहकारी सस्थेचे अध्यक्ष श्री. दर्डा यांनी सस्थेच्या पैशाची अफरातफर केली असे वाक्य स्पष्टपणे नोंदावे असे साक्षीदाराने वारवार सागूनही, एवढेच नव्हे तर तसा लेखी अर्ज देऊनही चौकशी अधिकाऱ्यानी तशी नोंद केली नाही. साक्षीदारांनाच धाकधपटशा दाखून त्यांचा अर्ज परत केला.

७ : चौकशी अधिकाऱ्यांनी आपल्या चार दिवसांच्या चौकशीच्या काळात फक्त तोंडी साक्षी पुराव्याचीच नोंद केली. वास्तविक सस्थेच्या १९५६ पासूनच्या सपूर्ण रेकॉर्डची तपासणी व्हावयास हवी होती. ती न झाल्यामुळे ही चौकशीच एकांगी ठरते.

८ . सदरहू चौकशी श्री. बारई याचेकडून काढून घेऊन दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपविली जावी अशा आशयाचा विनंती अर्ज सर्व सदस्यांनी डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार याचेकडे चौकशी सुरू होण्याचे पूर्वीच केला होता.पण त्यावर कोणतीच कारवाई करण्यास आली नाही.

चौकशी अधिकारी श्री. गुलाबराव वारई यांचा चौकशी काळातील मुक्काम सर्किट हाऊसवर आहे असे भासविण्याची योग्य ती काळजी घेतली गेली होती हे खरे; परतु चौकशी व्यतिरिक्त त्याचा सपूर्ण वेळ दर्डा उद्यानातील त्यांचे हवेलीतच जात असे हेही खरे. एवढेच नव्हे तर चौकशीच्या काळात श्री. वारई याचे दिमतीला श्री. दर्डा याचीच गाडी कायमची दिली गेली होती.

१० : चौकशी अधिकारी श्री. बारई हे पूर्वी यवतमाळ येथून निघणाऱ्या श्री. दर्डा यांच्या मालकीच्या 'नवे जग' या नियत कालिकाच्या संचालक मडळावर होते व साहाजिकच त्याचा व दर्डा यांचा संबंध घनिष्ठ स्वरुपाचा होता.

या व इतर उदाहरणावरून या चौकशीतून काय निष्पन्न होणार याची अगोदरच कल्पना येऊ शकते. चौकशी अधिकाऱ्यानी चौकशी पूर्ण केल्यानतर काही दिवसातच आपला अहवाल सहकार विभागाकडे सादर केला. या अहवालामुळे आमचे समाधान होणार नाही ही आमची अगोदरपासूनच धारणा असल्यामुळे या चौकशीविरुद्ध वर दाद मागण्याची तयारी आम्ही ठेवली होतीच. त्याकरिता या अहवालाच्या प्रतिलिपीची आवश्यकता होती व म्हणून त्याकरिता मी स्वतः डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार यवतमाळ यांची भेट घेतली. त्यांनी स्वतः अहवालाची प्रत देण्यासबधी असमर्थता दर्शविली. पण अहवाल आला आहे व तो आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेकडे पाठविण्यात आला आहे व त्यांचेकडूनच तुम्हाला अहवालाची प्रत मिळेल असे सागितले. त्याच्या सूचनेप्रमाणे सस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. धनराज गांधी यांची आजपावेतो अनेकदा भेट घेतली व त्यांच्या कार्यालयातही कित्येक चकरा टाकल्या. परंतु आजपर्यंत तरी अहवालाची प्रत माझ्या हाती आली नाही या सपूर्ण प्रकरणाकडे कशा रीतीने पाहिले जात आहे याची यथार्थ कल्पना अध्यक्ष श्री. गाधी यांच्या सहीने सहकार विभागाला पाठविलेल्या दिनाक १५-४-७४ च्या पत्रावरून येऊ शकते. सर्वांच्या माहितीसाठी त्या पत्राची नक्कलच खाली देत आहे.

आदर्श गृह निर्माण सहकारी सस्था म. यवतमाळ

अध्यक्ष र. नं. ८२९
धनराज गांधी यवतमाळ
जावक क्र. १०१/७४ दि. १५-४-७४

To

The District Deputy Registar,
Co-Operative Societies, Yaotmal

Dear Sir,

Ref :– Your Memo No. RGL/83|3156|74 dated 11–4–74.

Received with thanks the letter said above, advising us to supply copy of your order in the proceeding under section 83, and also informing Shri Zumberlal Bharut to obtain the copy from us.

I very much regret to inform you that, the copy of the order Supplied by your office is not available in our record as it has been misplaced somewhere.

Therefore herewith request you to supply us a copy of the order to us at your earliest, so that further action in case of your letter can be feasible.

Trust you will supply the copy soon and oblige.

Thanking you,

Yours faithfully,
Sd/– DHANRAJ GANDHI
President
A. G. N. S. Sanstha Limited
Yaotmal

अहवाल प्राप्त होऊन दोन महिन्याच्यावर कालावधी लोटला असूनही यवतमाळातल्या यवतमाळात मला हक्काने प्राप्त व्हावयास हवी असलेली त्याची प्रत मिळू शकलेली नाही. अहवालाची दुसरी प्रत आता पुन्हा सस्थेकडे पाठविली असून त्याचेकडूनच ती तुम्हाला मिळेल असे पुन्हा डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार यांनी मला सागितले आहे. पाहू ती केव्हा मिळते ते.

**झुंबरलाल भरुट,**
**सदस्य, आदर्श गृहनिर्माण सह. संस्था, यवतमाळ.**



# कलोपासक—मे
# चित्र

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या ' प्रयोग ' उपक्रमाचे दुसरे वर्ष मे ७४ पासून सुरू झाले. सदानन्द रेगे अनुवादित ' चित्र ' ही एकांकिका सादर करण्यात आली.

' चित्र ' ही एकांकिका युजिन आयनेस्कोच्या ' पेन्टिंग ' या एकांकिकेवरून अनुवादित केलेली आहे. अनुवाद करताना आपल्याकडील काही स्थानिक संदर्भही दिलेले आहेत. त्यामुळे काही ठिकाणी अनुवाद आणि काही ठिकाणी स्वैर रूपांतर असे स्वरूप झालेले आहे. एक शेटजी एका दरिद्री चित्रकाराकडून किमतीची रूक्ष चर्चा करून एक चित्र खरीदतो. चित्रकार पैसे मागायला आल्यानंतर शेटजी त्याचा जीव घेतो. शेटजीच्या घरात असणारी वृद्ध स्त्री शेटजीच्या उधळधावृत्तीला, चित्राला विरोध करते. तिचाही शेटजी जीव घेतो. एकांकिकेत कथेला फारसे महत्त्व नाही. तिन्हीही व्यक्ती प्रतिकात्मक आहेत. सृजनशीलता आणि संपत्ती यांची ती प्रतीके आहेत. परंतु ही प्रतीके सदानन्द रेग्यांच्या अनुवादित संवादातून पुरेशा सामर्थ्यानिशी प्रकट होऊ शकलेली नाहीत. एकांकिकेतील संवाद-भाषा ही विस्कळीत, परिणामशून्यतेच्या जवळची अशी आहे. त्यामुळे अखेरपर्यंत त्या संवादातून आवश्यक तो नाटय परिणाम साधला जात नाही.

एकांकिकेचा अनुवाद जितका निराशाजनक आहे तितकाच प्रयोगदेखील असमाधानकारक आहे. एकांकिकेतील तिन्हीही कलाकार (किल्लेदार, गयावळ, सौ. सहस्रबुद्धे ) अभिनयाच्या दृष्टीने सुमार ताकदीचे होते. स्पष्ट शब्दोच्चार आणि वाक्यातील–शब्दातील विराम अभिनयाने व्यक्त करण्याच्या समजुतीचा त्यांच्याकडे अभाव होता. अर्थात ते करवून घेण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची अधिक प्रमाणात आहे. दिग्दर्शक होते मधू जोशी. दिग्दर्शनाचा विपुल अनुभव गाठी असूनही त्यांनी ही एकांकिका सदोषपणाने दिग्दर्शित केल्याचे जाणवले. संपूर्ण एकांकिका भडक (मेलोड्रॅमॅटिक) स्वरूपात बसवली. त्यामुळे ती प्रतिकात्मक अर्थापर्यंत पोहोचू शकली नाही. चित्रकाराच्या डोळयांची अतिरिक्त हालचाल आणि शेटजीच्या संवाद फेकीतील आत्मविश्वासाचा अभाव, परिणामी अस्पष्ट-तुटक स्वरूपाचे ऐकू येणारे संवाद संपूर्ण एकांकिका होईस्तोवर त्रासदायक वाटत होते.

या एकांकिकेने ' प्रयोग ' उपक्रमाचा दुसऱ्या वर्षाचा प्रारंभ होता. खूप अपेक्षा मनात बाळगून प्रेक्षक आलेला होता. पण या एकांकिका प्रयोग दर्शनाने त्यांच्यावर कोणताच परिणाम झालेला दिसला नाही. हे फारसे चांगले झाले नाही. कारण गतवर्षीच्या काही चांगल्या प्रयोगांच्या स्मृती आमच्या मनात रेंगाळत आहेत. गतवर्षीपेक्षा अधिक जाणतेपणाने, साक्षेपाने, परिश्रमाने नवनवीन प्रयोग सादर केलेले आपल्याला पाहावयास मिळतील अशी अपेक्षा आहे. पण ' प्रथमग्रासे ' अशी निराशा व्हावी, हे उपक्रमाच्या भवितव्याच्या दृष्टीने योग्य नाही. गतवर्षीच्या उपक्रमाचे सिंहावलोकन करताना मी (' माणूस 'मध्येच) म्हटले होते की एकांकिका निवडीपासून तिच्या प्रयोग दर्शनापर्यंत कलात्मक जाणीव-दृष्टी अपेक्षित आहे. तिचा जर अभाव जाणवू लागला तर उपक्रमाचे वैयर्थ्य काय ? असा प्रश्न निर्माण होतो. निदान पुढील एकांकिका अधिक काही समाधान करू शकेल अशी आशा करू या ! □

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. ८ जून ७४ ते १४ जून ७४**

## भारताच्या आर्थिक क्षेत्रात आश्चर्यकारक ' स्फोट '

मिथून राशीत आठवड्याच्या अखेरीस रवीसारखा ग्रह प्रवेश करीत आहे. मिथून हे भारताचे लग्न आहे. तेथेच सध्या शनी आहे. म्हणजे साडेसाती आहेच. तसेच मकर या राशीवर मंगळाची दृष्टी पडलेली आहे. रवी-शनी यांची लग्नी होणारी ही मैत्री व मंगळाची उग्र दृष्टी यातून या आठवड्यात काही खळबळजनक व भारतीय जनतेला धक्का बसावा असे घडले तर आश्चर्य नको. विशेषत: आर्थिक धोरणाला विलक्षण कलाटणी मिळू शकेल. भारी किमतीच्या नोटा रद्द करण्याचा निर्णयदेखील घडणारच नाही असे नव्हे. केंद्र मंत्रीमंडळात तसेच राज्यात स्थित्यंतर असे काही तरी घडावे. संशोधनात प्रगतीकारक नवी घटना. महाराष्ट्रात सत्तारुढ पक्षात पुन्हा वादळाची शक्यता. पुण्याच्या निवडणुकीत सर्वच पक्षाना धक्का बसेल.

### मेष : आर्थिक पेच

मंगळ या समर्थ व सामर्थ्यवान ग्रहाचे वरदान असलेली तुमची रास आहे. तेव्हा तुम्ही कोणत्याही संकटाला डगमगून जाणार नाही, शरण जाणार नाही आणि तसे जाऊही नका. व्ययस्थानी दि. १२ च्या सुमारास चंद्र गुरूची युती होत आहे. सुखस्थानी मंगळ आहे. मंगळ हा तुमचा त्राता पण तो अशा ठिकाणी आहे की तुमचे मनस्वास्थ्य कोणत्या ना कोणत्या कारणाने तो बिघडवल्याखेरीज राहाणार नाही. सोमवार ते गुरूवार नोकरीत काही चांगले घडेल. दुखावलेला एखादा वरिष्ठ त्यात मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करील. विशेषत: पैशाच्या व्यवहारात सावध राहावे. पैसे देता घेतांना चित्त स्थिर ठेवावे व्यापारी क्षेत्रात धाडस नको. **महिलांस** : कल्पनेभोवती मन रुंजी घालीत बसण्यापलीकडे यावेळी दुसरे काही घडणे नाही.

### वृषभ : धंद्यात यश

या आठवड्यात बुधवारी चंद्र-गुरूची युती तुमच्या कर्मस्थानी म्हणजे दशमस्थानी होत आहे ही एकच गोष्ट यावेळी तुमच्या मनोरथाला गती द्यायला पुरेशी आहे. आजवर सुप्त राहिलेल्या आशाआकांक्षा यावेळी आकारास येऊ लागतील. कापड, सौंदर्यप्रसाधने, उंची चैनीच्या वस्तूंचा तुम्ही जर व्यापार करीत असाल किंवा तुम्हाला तो करायचा असेल तर इतका छान काळ दुसरा नाही. आर्थिक क्षेत्रातील एखाद्या ' बड्या ' व्यक्तिचे सहकार्य, मदत तुम्हाला मिळणार आहे. शनिवार ते मंगळवार प्रवासाचे जोरदार योग आहेत. प्रामुख्याने परदेशी प्रवासाचा अकस्मात योग येईल. नोकरीत वरिष्ठांचे गैरसमज दूर होतील व तुमच्या हिताचा ते विचार करतील. **महिलांस** : प्रेम, माया इत्यादी भावनांचा लाभ होईल. लॉटरीची तिकिटे अवश्य घ्या.

### मिथून : संसारात सुखवृद्धी

धनू राशीत चंद्र असताना आज आठवड्याची सुरुवात होत आहे. ही संसाराच्या दृष्टीने एक शुभसूचक घटनाच होय. तुमचे जर लग्न झाले नसेल किंवा ते ठरत नसेल तर यावेळी तुम्ही आनंदात राहायला हरकत नाही. कारण तुमचा संसार सुरू होणार आहे. तुमचा जर ' नया संसार ' सुरू झाला असेल तर तुम्हा दांपत्याची मने गुलाबी स्वप्नात दंग होतील. सोमवार ते गुरुवार नोकरीत अपेक्षापूर्ती होईल. बढती–प्रमोशनचे जमावे. बदलीचा मात्र योग नाही. नवा कोणताही व्यवसाय सुरू करा. पैसा मिळेल. **महिलांस** : कुमारिका व विवाहेच्छू महिलांची मनोकामना सफल होईल. नोकरीत आशादायक काळ.

### कर्क : सत्काराचा योग

मंगळासारखा एक जबर सामर्थ्याचा ग्रह चंद्रावर आहे ही एकच गोष्ट या आठवड्यात तुमच्याबाबतीत पुरेशी समाधानकारक आहे यात शंका नाही. तेजस्वी प्रतिभा, अद्वितीय कर्तृत्व हा मंगळ घडवतो. यावेळी रवीसारखा ग्रह तर तुमच्या लाभस्थानी आहेच. हातून काही तरी दिव्यभव्य घडेल असा संकेत दिसतो. नोकरी, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, व्यापार कोणतेही क्षेत्र असो तुमच्या समर्थ कर्तबगारीचा तेथे ठसा उमटल्याखेरीज राहाणार नाही. नोकरीत एखादी महत्त्वपूर्ण कामगिरी करण्यासाठी तुमची खास नेमणूक झाल्यास आश्चर्य वाटू नये. **महिलांस** : नोकरीत असल्यास तुमचा सत्कार होईल. मोठी जबाबदारीची वरिष्ठ जागा मिळावी.

### सिंह : परीक्षेत यश

गेल्या एक दोन महिन्यात जर शैक्षणिक स्वरूपाच्या एखाद्या परीक्षेला तुम्ही बसला असाल तर त्यात नवल वाटावे एवढे यश यावेळी निर्णय लागून तुम्हाला मिळेल. तुम्ही नोकरीत असाल तर महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस अगर युनियन पब्लिक सर्व्हिसच्या वरिष्ठ जागेचा इंटरव्ह्यू तुम्ही यावेळी द्या. तुमची नेमणूक नक्कीच होईल. शनिवार ते बुधवार या दिवसाची नोंद करून ठेवा.

तुम्ही राजकारणात असाल तर महत्त्वाची घटना तुमच्याबाबतीत घडेल. तुम्ही जर एखादा स्वतंत्र व्यवसाय करणार असाल तर औषधी उद्योग करा. लॉटरीत यश. महिलांस : यावेळी निवडणुकीचा निकाल असेल व तुम्ही उभे असाल तर तुमचे यश निश्चित आहे.

**कन्या : आर्थिक बळ वाढेल**

दशमस्थानी शनी तर लाभस्थानी मंगळ. दोन्ही ग्रह समृद्धी, कर्तृत्व व वैभव याचे दाते आहेत. तुम्ही तर बुद्धीचा वरदहस्त असलेले लोक. मग काय विचारता ? यावेळी तुम्ही जे जे ठरवाल व जे जे मनात आणाल ते ते यश घेऊनच प्रकाशणार आहे. दुय्यमची वृत्ती नोकरीची. पण तुम्ही जर एखादा व्यवसाय नुकताच नव्याने सुरू केला असेल तर तुम्हाला नवल वाटावे असा पैसा मिळू शकेल. तुम्ही किराणा–भुसार व्यापारी असाल, तुमचा कागद व्यापार असेल तर कोणतेही धाडस करा. रेस, लॉटरी वगैरे मार्गाने पैसा हाती येईल. महिलांस : या आठवड्यात तुम्ही लेखिका वा कवियित्री म्हणून प्रथमच प्रकाशात याल. बेकारांना काम मिळेल.

**तूळ : विजयाचा काळ**

राशीत हर्शल आहे. अद्भूत व अद्वितीय वाटावे असे सामर्थ्य तुम्हाला यावेळी लाभणार आहे. कला हा तुमचा धर्म आहे. चित्रपट, गायन इत्यादी मार्गांनी तुम्हाला दशदिशातून यश लाभावे असेच हे योग आहेत. तुम्ही संशोधनाच्या क्षेत्रात असाल किंवा विज्ञानाच्या क्षेत्रात काम करीत असाल तर तुमचे नाव गाजून जाईल. अनेक दिवस मनात धरलेली एखादी महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित होईल. मोठा उद्योग मोठा प्रकल्प-प्रामुख्याने पोलादाशी संबंधीत असा तुमच्या हातून स्थापन व्हावा. नोकरीत भव्य यश मिळेल. महिलास : निराश झालेल्या विवाहेच्छू कुमारिकांचे संसार या आठवड्यात सुरू व्हावेत.

**वृश्चिक : भाग्यचक्राला गती**

राशीस्वामी मंगळ भाग्यस्थानी ही एक वैभवसंपन्न घटना होय असेच तुम्हाला मानावे लागेल. हर्शल व्ययस्थानी आहे हे खरे. अचानक व ध्यानीमनी नसताना एखादा खर्च उभा राहिला तर तुम्ही आश्चर्य मानू नये. पण यावेळी तुमचा प्रभाव व व्यक्तिमत्त्व एवढे उचावणार आहे की अनेक क्षेत्रात तुमच्या आकर्षणाचा प्रभाव पडणार आहे. तुम्ही जमिनदार, बागायतदार असाल तर यातून तुम्हाला प्रचंड पैसा मिळणार आहे. तुम्ही जर बंगल्यात राहाण्याची इच्छा करीत असाल तर ती बुधवारनंतर पुरी होणार आहे. आर्थिकदृष्ट्या जीवन उंचावणार आहे. राहाणी श्रीमंती बनेल. उंची कापड व वस्तू खरेदी कराल. महिलांस : तुम्ही तरुण कुमारिका असाल तर तुमच्या प्रेमात तरुण पडणार आहेत. प्रेमपत्र येतील.

**धनू : फक्त तब्येतीला जपा**

कर्क राशीत चंद्राच्या जवळ मंगळ येऊन बसला आहे तर सप्तमस्थानी मिथून राशीत शनी आहे. त्याला भेटण्यासाठी रवीदेखील आठवड्याच्या शेवटी तेथे येत आहे. गुरू चंद्राची युती दि. १२ म्हणजे बुधवारी तुमच्या पराक्रमात होत आहे. ती तुमचा व्याप वाढवील, नव्या क्षेत्रात प्रवेश देईल. नातेवाईक, मित्र मदतीसाठी पुढे येतील. प्रामुख्याने शनिवार ते गुरूवार हे दिवस *आर्थिक समृद्धीचे, उलाढालीचे आहेत.* लॉटरी, रेस भाग्यवृद्धी करील. पण हे सारे असले तरी तब्येतीला मात्र दुर्लक्षून चालणार नाही. तब्येतीला त्रास या ना त्या मार्गाने होत राहील. रक्तदाब, हृदयविकार, पित्त, कफ, दमा वगैरे आजाराला आमंत्रण मिळणार नाही याची काळजी घ्या. महिलांस : काही झाले तरी संताप, चिडाचीड करू नका. तब्येत नाजूक राहील.

**मकर : मानसिक चिंता**

धनस्थानी दि. १२ रोजी चंद्र व गुरूची युती होत आहे तर आठवड्याच्या शेवटी रवी शत्रुस्थानी प्रवेश करीत आहे. सामान्यत. ही परिस्थिती तशी वाईट नाही. राजकारणी नेते, नुकताच राजकारणात ज्यानी प्रवेश केला आहे अशा व्यक्ती याच्यादृष्टीने हा सारा सप्ताह ऐतिहासिक परिणामाचा ठरावा. राजयोग, उच्चपदाचा लाभ घडावा. नोकरीत अनाहूतपणे वरिष्ठ जागा तुमच्या पदरी पडावी. पण हे सारे असले तरी मानसिक स्थिती मात्र नाजूकच राहील. विरोधक बळावतील. मित्राचे शत्रू होतील. राहात्या घराच्या बाबतीत अडचणी उभ्या राहातील. पैशाची आवक वाढली तरी ती टिकणे फारच कठीण आहे. सोमवार, बुधवार व गुरूवार विशेष महत्त्वाचे आहेत. महिलांस : पतिराजांच्या आजाराची उगीचच चिंता वाढत राहील. पण काळजीचे मुळीच कारण नाही. नोकरी नसल्यास ती मिळेल.

**कुंभ : दैवाचे वरदान**

काही माणसे भाग्यवानच असतात. ती जन्मत च काही भव्यदिव्य चमत्कार घेऊन येतात. विश्वाच्या प्रशांत रंगमचावर चमकतात. त्यापैकी तुम्ही एक आहात. शनीचा धर्म व स्वामित्व तुम्हाला लाभलेले आहे. गुरूसारख्या सात्त्विक व नैतिक श्रेष्ठतेचा ग्रह राशीत आहे. त्याच्याबरोबर चंद्राची बुधवारी युती होत आहे. मंगळ, विरोधकाचे कंबरडे मोडायला बसला आहेच. एक आनंदाची बातमी सांगून ठेवतो. तुम्ही सरकार पक्षाचे खासदार वा आमदार असाल तर सत्तेतील मंत्रिपदासारख्या जागेवर तुमची नियुक्ती निश्चित होईल. तुमचे नाव तुमच्या नेत्याच्या विचाराधीन यावेळी प्रामुख्याने असेल. रविवार ते बुधवार वैशिष्ट्यपूर्ण घटनानी गाजतील. आर्थिक स्थिती उत्तम राहील. महिलांस: तुम्ही पदवीधर असाल तर नोकरीत वरिष्ठ स्थान मिळेल. निवडणुकीत प्रचंड यश.

**मीन : आश्चर्यकारक धक्के**

कर्केत मंगळ, वृषभेत रवी, व्ययस्थानी गुरू अशी या आठवड्याची एकंदर ग्रहरचना आहे. बुधवारी चंद्र-गुरूची युती कुंभ राशीत व्ययस्थानी घडत आहे. ही सारी ग्रहस्थिती तुम्हाला काही मोठीशी अनुकूल आहे असे म्हणता येणार नाही. सुखस्थान तर वादळातच सापडले आहे. यावेळी वर्तमानकाळाच्या परिस्थितीबरोबर तडजोड करून संयम राखून दिवस निभावून न्यायला हवेत. बरे व वाईट असे काही आश्चर्यकारक धक्के बसू शकतील. आठवड्याची सुरुवात भाग्यस्थ चंद्राने होत आहे. शनिवार, रविवार नोकरीच्या क्षेत्रात काही चांगले घडू शकेल. महिलांस : मोठेपणाच्या महत्त्वाकांक्षेला आळा घाला. संयमाने वागा. ☐ ☐

मुक्काम धुळे

## राज्यमंत्री सरनायक यांच्या भावाने....

# एका फौजदाराने....

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला ! या उक्तीप्रमाणे आधीच फौजदार आणि त्यातून तो मऱ्याचा भाऊ असला की कसा बेफाम वागू शकतो त्याचा हा किस्सा !

या फौजदाराचे नाव आहे अशोक सरनायक. नाशिकरोड पोलीस स्टेशनचा हा फौजदार. राज्यमंत्री गोविंदराव सरनायक यांचा लहान भाऊ.

त्याचं अस झालं. दि. २६–३–७४ रोजी दुपारी एक वाजता मी शाळेतून घरी आलो आणि हातपाय धुवून जेवायला बसलो, पत्नी इतर कामात होती. एक तरुण, शिडशिडीत व ठेंगणीशी मुलगी मला वाढायला आली. अनोळखी मुलगी असल्यामुळे मी तिला विचारले, 'बेटा, कोण तू ?'

'मी सुरेखा सरनाईक. बाबासाहेब सरनायकांची मुलगी.'

'म्हणजे राज्यमंत्री सरनायक ?'

'होय'

'मग आज आमच्याकडे कशी ?'

'मी डॉ. कमळाकर पगार याच्याशी लग्न करून आले आहे. तुमचा प्रकाश आमचा मित्र आहे.'

'मग ही मुल कुठ गेली ?'

'आताच जेवण करून बाहेर फिरायला गेली.'

'ठीक आहे. आपलच घर समजून आनंदात रहा.'

आणि ती मुलगी आमच्या घरात घरच्यासारखी रुळली.

सायंकाळी आठ वाजता मी नेहमीप्रमाणे फिरून घरी आलो. चहा वगैरे घेऊन छापखान्याकडे फेरफटका मारला. तेवढयात एक खाजगी मोटर आमच्या घरासमोर थांबली. त्यातून चारपाच माणसे भराभर खाली उतरली आणि एकदम आमच्या घरात घुसली. त्यातील दोघांजवळ दंडुके होते. आत आल्याबरोबर त्यांनी विचारले, 'कुठे आहे ती मुलगी ?'

'कोण मुलगी ?' मी शांतपणे विचारले.

'भडव्या, बऱ्या बोलानं मुलगी बाहेर आण. नाहीतर गोळी घालीन.' पिस्तुल दाखवीत त्यातील एक म्हणाला.

'तुम्ही कोण ?'

'मी त्या मुलीचा काका आहे. पोलीस ऑफिसर आहे मी. लोकांच्या पोरीबाळी पळवून आणता, शरम नाही वाटत ?'

'भल्या माणसा, जरा सभ्यपणे बोल.'

'आधी मुलगी बाहेर आण. नाहीतर थोबाड फोडीन.'

'आधी बाहेर व्हा माझ्या घरातून' मी संतापलो.

तेवढयात तो उठला. मला दूर ढकलून तो पायातील बुटासह आमच्या स्वयपाक घरात घुसला. माझ्या पत्नीलाही बाजूस ढकलून त्याने त्या मुलीस पकडले व तिच्या झिज्या धरून फराफरा ओढून आणले फटाफट तिच्या थोबाडीत मारून तो तिच्यावर ओरडला 'म्हारा-मागाबरोबर पळून आलीस गधडे. लाज नाही वाटत तुला ? थांब तू कशी जिवत रहातेस ते पहातो आता.'

'हे पहा मिस्टर, ती मुलगी माझ्या पालकत्वाखाली आहे. तिला मारझोड करू नका.'

तेवढयात त्या दोघातिघानी मला धक्का-बुक्की सुरू केली. आणि मला व त्या मुलीला फरफटत ओढीत नेऊन मोटारीत घातले. आणि शहर पोलीस ठाण्यावर आम्हास पकडून नेले.

माझे तर डोके फिरायची पाळी आली. कोण कुठला सरनायक ? ज्याच थोबाड मी कधी पाहिलेल नाही, त्याची मुलगी अकस्मात माझ्या घरात येते काय नी तिचा तो बेवकूफ काका माझ्या घरात घुसून मारझोड करतो काय ! अर्वाच्य शिव्या देतो काय ! सारेच अघटित !

धुळे पोलीस स्टेशनवर आल्याबरोबर पोलिस इन्स्पेक्टर देशमुख यानी मला शातपणे विचारले, काय भानगड आहे गुरुजी ?

'आज एका फौजदाराने माझ्या घरात घुसून मला मारझोड केली साहेब. आणि काही गुन्हा नसताना मला पोलीस ठाण्यावर पकडून आणले.'

देशमुख बाहेर गेले. फौजदार सरनायकालाही त्यानी बाहेर नेले. बाहेर बराच वेळ त्यांची चर्चा झाली. थोडया वेळाने देशमुख परत आले. माझ्यापुढे हात जोडून देशमुख म्हणाले, 'गुरुजी, तो फौजदार राज्यमंत्री बाबासाहेब सरनायक याचा भाऊ आहे ती मुलगी त्याची पुतणी आहे. त्याने तुम्हास पकडून आणण्यात चूक केली आहे. मी त्याच्यातर्फे तुमची क्षमा मागतो; आणि तुम्हाला आपल्या घरी पोहोचवतो.'

'अहो पण माझ्या तक्रारीच काय ? मंत्र्याचा भाऊ म्हणून त्या फडतूस फौजदाराला माझ्यासारख्या गरीब नागरिकाच्या घरात घुसून, मला मारझोड करून पोलीस ठाण्यावर पकडून नेण्याचा काय परवाना मिळाला आहे ?'

'जाऊ द्या गुरुजी; हे प्रकरण जरा नाजूक आहे. त्याची पुतणी घरातून पळून गेली आहे. म्हणून त्याचं डोकं फिरलं. कोणाचही फिरल असतं.'

'अहो पण ती मेजर आहे. लग्न करून आली आहे. माझ्या-जवळ पुरावा आहे.' (या लग्नाचा नोंदणी क्र. १२२७९९, दि. २५-३-७४, अकोला, असा आहे.)

'ते सगळं खोटं नी बनावट आहे. तरुण पोरं बिघडली आहेत आजकाल. जाऊं द्या झाल. तुम्ही कशाला अडकता या लफड्यात? चला गाडी तयार आहे.'

'पण साहेब, हा अपमान नाही सहन होत आपल्याला.'

'जाऊ द्या साहेब, आपलेच दात नी आपलेच ओठ.

बाबासाहेब सरनायक आमच्याच भागातले. त्यांची अब्रू चव्हाट्यावर आणू नका' असे म्हणून त्यांनी माझा हात धरून उठविले आणि पोलिस जीपमध्ये बसवून मला घरी रवाना केले.

आणि इकडे फौजदार सरनायक त्या मुलीला घेऊन मुबईकडे पसार झाला.

माझ्या उभ्या आयुष्यात असा अपमान मी सहन केला नाही. माझे तर डोके फुटायची पाळी आली. माझी दोन्ही तरणीबांड पोरं त्यावेळी नव्हती. नाही तर त्यानी त्या फौजदाराचा खिमा केला असता. मी रात्रभर तळमळत राहिलो. डोळ्याला डोळा लागला नाही.

सकाळी उठून डी. एस्. पी.ना फोन केला. कळले की, ते साक्रीला गेले आहेत. डी. वाय्. एस्. पी.ना भेटलो. त्यांनीही कानावर हात ठेवले. शेवटी ऑफिसात लेखी तक्रार पाठविली मुद्दाम शाळेच्या बुकातून. त्याची प्रत 'आपला महाराष्ट्र' या दैनिकाला पाठवून दिली. मुबईच्या 'मराठा'मध्येही बातमी झळकली '–लग्न झाल्यानंतर काही तासातच काकाने पुतणीस पळविले.'

धुळ्याच्या दैनिकातही विस्तृत बातमी आली.

आता पोलिसखाते जागे झाले. डी. एस्. पीनी मला रात्री ८ वाजता पोलीस ठाण्यावर बोलवणे पाठविले. सायकल घेऊन मी ठाण्यावर गेलो. पोलीस इन्स्पेक्टर देशमुख बाहेरच उभे असलेले दिसले. त्यांनी मला बाजूला नेले आणि नम्र शब्दात विनती केली, 'गुरुजी, मी तुमची कालरात्री कंप्लेंट घेतली नाही असे साहेबांना सांगू नका.'

'का?'

'मी तुमची क्षमा मागितली होती त्या सरनायकातर्फे आता माझ्या नोकरीचा प्रश्न आहे. माझ्या कर्तव्यास मी चुकलो असे साहेबाना वाटायला नको.'

'अहो पण मी तोंडी का होईना तक्रार केली होती. आणि त्या मूर्ख माणसाच्या चुकीबद्दल तुम्ही क्षमा का मागता?'

'ते जाऊ द्या. पण माझ्यासाठी येवढे करा.'

'ठीक आहे. पाहीन मी.'

डी. एस्. पीच्यासमोर मला नेण्यात आले. ते फोन लाऊनच बसले होते. ते मला म्हणाले,

'तुम्ही प्रेसकडे जायला नको होते.'

'मला दुसरा मार्ग नव्हता. नाही तरी मी प्रेसवालाच आहे.'

'बाबासाहेब सरनायकांचा फोन आला आहे. ते मुलीला डॉ. कमलाकर पगारकडे पाठविण्यास तयार आहेत.'

'ठीक आहे. चांगली गोष्ट आहे.'

'मग आता तुमची काही तक्रार नाही ना?'

'माझ्या फिर्यादीचा नी सरनायकांच्या फोनचा काय संबंध? माझी फिर्याद अशोक सरनायक या फौजदाराविरुद्ध आहे. ती कायमच आहे.'

'ती टिकायची नाही. ती मुलगी आता तुमच्या बाजूने काकाच्या विरुद्ध साक्ष देणार नाही. तोंडघशी पडणार तुम्ही.'

'ते मी माझे पाहून घेईन.'

'कशाला लफड्यात पडता तुम्ही? आपला उद्योग सोडून नसता ताप कशाला करून घेता.'

'बघू या. हाही एक नवा अनुभव मिळेल.'

मी ताठ आहे हे पाहिल्यावर डी. एस्. पी. साहेबानी इन्स्पेक्टर देशमुखांना फर्मावले 'यांचा जबाब घ्या.'

देशमुखांनी त्यांच्या पोलिसी खाक्याप्रमाणे जबाब लिहिला. माझी सही घेतली व मला सोडून दिले.

घरी आलो. अवघ्या पाचच मिनिटात एक सरकारी काळी गाडी माझ्या घरासमोर उभी राहिली. वाटल कोणी मंत्री–बिंत्री आला की काय?

गाडीतून उतरले आमदार उत्तमराव पाटील. जनसंघाचे पुढारी. विरोधी पक्षनेते. त्यांना आता मंत्र्याचा दर्जा आहे. म्हणजे बंगला आहे, पगार आहे, गाडी आहे.

आल्याबरोबर ते म्हणाले, काय अण्णा, काय धमाल उडवून दिलीत! मी त्याना सर्व हकीकत जशी घडली तशी सांगितली. ते म्हणाले, 'मराठात बातमी आली तिने बाबासाहेब सरनायक हादरलेच! ते आणि शरद पवार माझ्या बगल्यात आले. सरनायकाचा बगला आमच्या शेजारीच आहे. सरनायक म्हणाले, उत्तमराव, आत्ताचे आत्ता निदानी हे प्रकरण जेथल्या तेथेच दाबा.'

'उद्या आपल्याला कमलाकर पगारच्या गावाला जायचे आहे.' तुम्ही तयार रहा.'

'माझा काय सबंध?' मी म्हणालो.

'त्या मुला-मुलीसाठी.'

'पण त्या फौजदाराच काय?'

त्या हरामखोराला असा सोडायचा नाही. अण्णा, त्याचा पट्टा आपल्याला उतरायचाच आहे.' उत्तमराव म्हणाले.

उत्तमराव माझे मित्र आहेत. माझ्या अपमानाचा बदला घेतल्या-शिवाय ते सोडणार नाहीत असा मला विश्वास वाटला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सरकारी गाडीने उम्राणे येथे गेलो. रात्री आठ वाजले होते. डॉ. पगारचे वडील पी. टी. पाटील घरीच होते. पी. टी. पाटील हे रिटायर्ड जज्ज. गरीब स्वभावाचे नी शांत वृत्तीचे गृहस्थ. मुलाचा हा 'प्रताप' काही त्यांना आवडला नाही. ते फारसे बोलले नाहीत.

उत्तमराव पाटलांनी सरनायकांचा निरोप त्यांना दिला. तेवढ्यात कमलाकर पगारची आई बाहेर आली. म्हणाली,

'मी अडाणी बाई. जरा दोन शब्द बोलू का?'

'वा वा! का नाही? बसा समोरच्या खुर्चीवर' उत्तमराव

म्हणाले. बाई बोलली, 'त्या सरनायकाची मुलगी मी घरात घेणार नाही.'

आम्ही हादरलोच ! काय बोलणार यावर? बाई पुढे म्हणाली, 'असेल तो सरनाईक मोठा मंत्री ! मी काय ओळखत नाही त्याला ! समोरासमोरच बंगले होते आमचे अकोल्याला. त्याची पत्नी रोज येऊन बसत असे आमच्याकडे. लहानपणापासून एकत्र खेळली आहेत ही मुलं. पण आता ते मंत्री झालेत. आणि देशमुख ! आम्हीही पाटील आहोत. वतनदार. आम्ही काय हलकेसलके आहोत ?'

एवढ्यात त्यांची मुलगी ज्योत्स्ना बाहेर आली. म्हणाली, 'हा फौजदार झालेला अशोक काका आमच्या बरोबर खेळत होता. लहानपणापासून असाच तो उडाणटप्पू आणि द्वाड आहे. भावाच्या वशिल्यानं फौजदार झाला. नाहीतर काय अक्कल आहे त्याला ?

हे मात्र मला पटले !

उत्तमराव पाटील आजीजीने म्हणाले, 'आता झालं गेलं विसरून आपण गोडीने एकत्र येऊ.'

'एका अटीवर मी त्या पोरीला घरात घेईन.' बाई कडाडल्या.

'कोणती ?'

'त्या सरनायकाने हुंडा म्हणून २५ तोळे सोने आणि पन्नास हजार रुपये माझ्या पोराला दिले पाहिजेत.'

'हे ब्लॅकमेलींग होईल आई. आपणाला काही नको त्याचं' कमळाकरचा एक भाऊ म्हणाला.

शेवटी भवती न भवती होऊन समेट करायचे ठरले. कमळाकर पगार मात्र आम्हास भेटला नाही. आमची गाडी पाहून तो जो घरात लपला तो शेवटपर्यंत बाहेर आलाच नाही.

'शेळपट निघाला लेकाचा' मी उद्गारलो.

'तसं नाही साहेब' कमळाकरचा भाऊ म्हणाला.

'फौजदार सरनायकबरोबर तुम्हीच आला होता काय ?'

मी त्याला विचारले. कारण चेहरा मला ओळखीचा वाटला.

'होय साहेब सांगतो. सगळे अगदी पहिल्यापासून सांगतो. अकोल्यास दि. २५-३-७४ रोजी कमळाकरने रजिस्टर कचेरीत जाऊन लग्न रजिस्टर करून घेतले. त्याआधी दहा-बारा दिवस त्यानी एका भटजीकडून लग्न लाऊन घेतले होते. २५ च्या रात्रीच एक वाजता सुरेखा आपल्या काकाच्या बंगल्यातून बाहेर पडली. रस्त्यावर दोन मोटर सायकली तयार होत्याच. सुरेखा, कमळाकर आणि त्याचे दोन मित्र रात्रीच्या रात्री मोटर सायकलने निघाले. दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता ते धुळ्यास पोहोचले. तिकडे सुरेखाच्या काकाला हे समजल्याबरोबर त्यानी मुंबईला बाबासाहेब सरनायकांना फोनने कळवले की सुरेखा पळून गेली. बाबासाहेबानी नाशिकच्या फौजदार सरनायकाला फोन केला की सुरेखाला असेल तेथून पकडून आणा. अशोक सरनायकने एक खाजगी गाडी केली. पिस्तुल भरले. गुलाबराव दगडू सावत या नाशिकरोडच्या हेड कॉन्स्टेबलला सोबत घेतले आणि प्रथम ते उत्राणे येथे आले. मी घरीच सापडलो. मला पिस्तूल दाखवून त्याने गाडीत कोंबले आणि दरडावले, 'बोल कुठे सापडेल तो भडवा ?'

'बहुतेक धुळ्याला' मी घाबरून म्हणालो. आणि मला घेऊन त्यानी गाडी धुळ्याकडे दामटली. नाइलाजाने मला तुमचे घर दाखवावे लागले.'

'भ्याड आहात तुम्ही सगळे' मी कडवटपणे म्हणालो.

'नाही साहेब. तुम्हाला कल्पना नाही. ही सरनाईक मंडळी महाभयंकर आहे. लहानपणापासून माहीत आहे हे मला, आमचे वडील अकोल्याला जज्ज होते तेव्हापासून. सारे अकोले यांच्या दादागिरीपुढे वचकून असते त्या अशोकने गोळी मारायलाही कमी केले नसते.' तो कळवळून म्हणाला.

कमळाकरने तोंड का काळे केले ते आता मला पटले. मनातल्या मनात मी त्या भित्र्या पोऱ्याला क्षमा केली.

घरी आलो. मुलास समोर बोलावले. झाला प्रकार त्याला सांगितला आणि शेवटी म्हणालो;

'अशा भित्र्याचा वऱ्हाडी पुन्हा होऊ नकोस. लक्षात ठेव.' असा आहे हा किस्सा !

या गोष्टीला दोन महिने होत आले. पोलिस खात्याने बहुतेक हे प्रकरण दाबलेले दिसते. उत्तमराव पाटलांकडूनही काही हालचाल झालेली दिसत नाही.

त्यातल्या त्यात एक गोष्ट बरी घडली. एप्रिल महिन्यात आमदार मृणालताई गोरे धुळ्याला येऊन गेल्या. त्यांच्या कानावर सरनायक फौजदाराची ही दांडगाई कोणीतरी घातली. त्या म्हणाल्या, "या प्रश्नाची तड मी लावणार आहे. कमळाकर पगारचे पत्रही मला आले आहे. विधानसभेत हा प्रश्न मी उपस्थित करणार आहे. एका फडतूस फौजदाराची कोण ही मग्रुरी ! मंत्र्याचा भाऊ झाला म्हणून काय त्याने गरीब नागरिकांना मारझोड करावी ? हे कोणीही सहन करू नये."

परवा उत्तमराव भेटले. म्हणाले, 'बाबासाहेबानी या बाबत दिलगिरी व्यक्त करायला पाहिजे होती.'

आमचे उत्तमराव भोळे आहेत. त्याना मी म्हणालो, 'अहो, माझ्यासारख्या गरीब शिक्षकाला मंत्र्याच्या भावाने लाथेने मारले म्हणून काय मंत्र्याने दिलगिरी व्यक्त करायची ? आधी ते देशमुख ! उच्च कुलीन मराठे ! आणि त्यात मंत्री. मग काय विचारता ! सत्तेच्या नि कुळाच्या मदाने ते बेफाम झाले नाहीत तरच नवल."

उत्तमरावासारख्या कार्यकर्त्यांना का हे मी सांगायचे ?

—हिराजी पाटील

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर


सूडबुद्धीने वागविणार नाही, कदापी!
संप काळाचा पगार नाही.
नोकरीत खंड
बडतर्फ
अमेरिकन अध्यापक उपग्रह
या अध्यापकला आपल्याला जरी शिकवायला जमले नाही तरी तो स्वतः खूप शिकून जाईल!